**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सीआर/१०८
निर्णय दिनांक १९-०३-२००९

१ श्री. रविंद्र बापुराव कारके, : अपिलार्थी
रा. अंबड,जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता, जिल्हा परिषद, सिंचन उपविभाग
अंबड, जि.जालना
२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (सिंचन), जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०२.२००८ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच, अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. १६.८.२००८ रोजीचे पत्र सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.२.२००८ रोजी दाखल केलेले अपील हे, त्यांना आवश्यक ती माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झाली असल्याने, मागे घेत आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

- -

खुद्द अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.२.२००८ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.१०८/०८, दि.११.०२.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रविंद्र बापुराव कारके, संपादक,सा.सूर्योदय कलियुगाचा, कोट-बस स्थानक रोड,स.नं.८, बीएसएनएल टॉवरसमोर, अंबड ता.अंबड जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद सिंचन उपविभाग अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सिंचन विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र. १०९/०८ व ११०/०८**

निर्णय दिनांक १९-०३-२००९

१ श्री. किरण माणिकराव यादव, :अपिलार्थी
रा.आराधवाडी, तुळजापूर जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ **अपील क्र. १०९/२००८**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत अणदूर,<br>ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी,<br>पंचायत समिती, तुळजापूर<br>जि. उस्मानाबाद | :प्रतिवादी |

२ **अपील क्र. ११०/२००८**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत जळकोट,<br>ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी,<br>पंचायत समिती, तुळजापूर<br>जि. उस्मानाबाद |

**निर्णय**

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १९.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त दोन प्रकरणांमधील अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०४.०८.२००८ रोजीची राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०८.२००८ रोजी दाखल झालेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच उपरोक्त दोनही प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेली त्यांची दि. १०.२.२००९ व २०.२.२००९ रोजीची दोन स्वतंत्र पत्रे

- -

आयोगास सादर करण्यात आली असून या दोनही पत्रांमध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, उपरोक्त प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक असलेली माहिती संपूर्णपणे त्यांना दिली असून त्यावर त्यांचे पूर्णतः समाधान झाले आहे व ते विचाराधीन अपील मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेली त्यांची विचाराधीन दोन स्वतंत्र अपिले मागे घेत असल्याचे आयोगास लेखी पत्राद्वारे सादर केले असल्याने अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले खारीज करण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.१०९/२००८, दि. ०५.०८.२००८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्र.११०/२००८, दि. ०५.०८२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव,रा.आराधवाडी, तुळजापूर जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत अणदूर,ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत जळकोट,ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,पंचायत समिती, तुळजापूर जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/२५३२
निर्णय दिनांक    १९-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ सौ. वर्षा विठ्ठलराव परतवाघ,<br>रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,<br>नांदेड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,<br>नांदेड. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १९.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३०.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती पुरविली गेली नसल्याने व यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.७.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती गोपनीय स्वरुपाची असल्याने ती त्यांना देता येत नसल्याचे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

-                                        -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्रयस्थपक्ष श्री. विठ्ठल लिंबाजी परतवाघ यांच्या मूळ सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठाच्या उताऱ्याच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन या पत्रास त्यांनी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्राची प्रत जोडली आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे असल्याने त्यांच्याकडून त्रयस्थ पक्षाची सेवापुस्तिका परत आल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्यात येईल, असे नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जान्वये प्रथम अपील केले असता, ही माहिती गोपनीय असल्याचे कारण दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस उघड करण्यास नकार दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाचे वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती असल्याचे आयोगास आढळून आले नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.८.२००७ रोजी अपिलार्थीचा अपील अर्ज प्रथमतः प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या अर्जाची प्रत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती गोपनीय असल्याच्या कारणावरुन उघड करण्याचे नाकारले. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती सर्वथा चुकीची असून कोणत्याही कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तिकेच्या

-                                                    -

संदर्भातील माहिती ही गोपनीय असू  शकत नाही. कारण सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठावर संबंधित कर्मचाऱ्याने दिलेली माहिती ही सार्वजनिक स्वरपाची असून त्यांनी नोकरीत रुजू होताना दिलेली माहिती ही अन्य अनेक प्रकारे शासनाच्या व वरिष्ठ शासकीय कार्यालयामध्ये अनेक नस्त्यामधून विविध प्रकारे उपलब्ध असते. तसेच सेवापुस्तिकेमध्ये कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या वेतन वा इतर बाबींचा तपशील नमूद केलेला असतो व या बाबीशी संबंधित प्रत्येक शासकीय आदेश हे जिल्हा कोषागार अधिकारी, संबंधित शासकीय कार्यालये, महालेखापाल इत्यादींना पाठविलेले असतात, त्यामुळे ही माहिती वैयक्तिक स्वरुपाची व खाजगी अशी राहत नाही. ही माहिती उघड केल्याने संबंधित कर्मचाऱ्यांच्या खाजगी बाबीत कोणताही आगंतुक हस्तक्षेप होईल, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नसल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून जन माहिती अधिकारी यांच्या स्वतःच्या चुकीमुळे वंचित ठेवल्याने आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून स्वतः प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

-          -

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. वर्षा विठ्ठलराव परतवाघ,शिवनिकेतन प्राथमिक शाळा, यशवंतनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २५३३/०७, २५३४/०७, २५३५/०७ व २५३६/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/२५३३,२५३४,२५३५ व २५३६

निर्णय दिनांक १९-०३-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
श्री निकेतन प्राथमिक शाळा,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशिक्षण प्रसारक
मंडळ, नांदेड.

**निर्णय**

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १९.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त चार प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.११.२००७ रोजी दाखल केलेली चार स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री निकेतन प्राथमिक विद्यालय, नांदेड यांना रजिस्टर्ड पोस्टाने दि. ७.८.२००७ रोजी माहितीसाठीचा प्रथम अर्ज पाठवून दिल्यानंतर जन माहिती अधिकारी

- -

यांनी सदर रजिस्टर्ड पत्र स्वीकार करण्यास नकार दिल्यामुळे त्यांनी दि. १७.८.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी नियमबाहय पत्रव्यवहार करुन माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी चारही प्रकरणात प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ३१.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विद्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने दि. १७.८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव डॉ.बाबासाहेब आंबेडकर लोकशिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड यांच्याकडे चार स्वतंत्र प्रथम अपिले केली. तथापि या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक:संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये जिल्हा परिषदांच्या शिक्षणाधिकारी यांची आता जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असल्याने, या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. १७.८.२००७ रोजीच्या चारही प्रथम अपील अर्जांवर सुनावणी घेणे योग्य राहील. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दि. १७.०८२००७ रोजीच्या चारही प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन त्यासंबंधी आपले निर्णय पारित करावेत.अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या दि. १७.८.२००७ रोजीच्या उपरोक्त चारही प्रकरणांशी संबंधित प्रथम अपील अर्ज प्रथमतः शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जासह सादर करावा. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणारा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार सदर निर्णय त्यांना

-                                                  -

प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची उपरोक्त चारही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. २५३३/०७, २५३४/०७, २५३५/०७ व २५३६/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या उपस्थितीत अपिलार्थीच्या दि. १७.०८.२००७ रोजीच्या चारही प्रथम अपील अर्जांवर हे आदेश निर्गमित होताच,झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल रा.समिरा बाग, खडकपूराच्या पाठीमागे,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री निकेतन प्राथमिक शाळा, नांदेड जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना अपिलार्थीच्या दि. १७.८.२००७ रोजीची चारही प्रथम अपील अर्जाच्या प्रतींसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र. २५३७/०७, २५३८/०७ व २५३९/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/२५३७,२५३८ व २५३९
निर्णय दिनांक १९-०३-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, :अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१. **अपील क्रमांक २५३७/०७**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>कुसुमताई चव्हाण प्राथमिक शाळा, नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, सेवालाल शिक्षण संस्था<br>देगलूर जि. नांदेड. | :प्रतिवादी |

२. **अपील क्रमांक २५३८/०७ व २५३९/०७**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक सम्राट अशोक प्राथमिक<br>विद्यालय,देगलूर जि.नांदेड. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, सेवालाल शिक्षण संस्था<br>देगलूर जि. नांदेड. |

अपील क्र. २५३७/०७,२५३८/०७ व २५३९/०७ : अध्यक्ष,
प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी सेवालाल शिक्षण संस्था,
सेवादासनगर,हणेगाव
ता. देगलूर जि. नांदेड.

**निर्णय**

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १९.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपील क्रमांक २५३७/०७ या प्रकरणातील जन माहिती अधिकारी , संबंधित संस्थेचे अध्यक्ष उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त तीन प्रकरणांमधील अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १३.११.२००७ रोजीची राज्य माहिती आयोगाकडे दि.

- -

०३.१२.२००७ रोजी नोंदविलेली तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीन अपील अर्जांपैकी अपील क्र. २५३७/०७ मध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुसुमताई चव्हाण प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडे दि. ४.७.२००७ रोजी माहितीसाठीचा प्रथम अर्ज पाठविला असता, त्यांनी माहिती देण्यासाठी जाणूनबुजून जास्तीचे शुल्क आकारले व नियमबाहय पत्रव्यवहार करुन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लावला व टाळाटाळ केली त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. तसेच अपील क्र. २५३८/०७ व २५३९/०७ या दोनही अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सम्राट अशोक प्राथमिक विद्यालय, देगलूर, जि. नांदेड यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने माहितीचा अर्ज पाठवूनही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने,जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३.८.२००७ रोजी प्रथम अपील करुनही त्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील केले आहे.

**अपील क्रमांक २५३७/२००७:**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ०४.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेविषयी व शाळेतील पोषण आहाराविषयी वर्ष २००० ते जून २००७ अशा सात वर्षांशी संबंधित माहिती मागविली होती. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १९.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ६६००/- इतके त्यांच्या संस्थेच्या, मराठवाडा ग्रामीण बँक,शाखा तरोडा येथे भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि सदर शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने जन अपिलीय

-                -

अधिकारी तथा सचिव, सेवालाल शिक्षण संस्था,देगलूर जि. नांदेड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अनुसार दि. ३.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये दि. २१.९.२००७ रोजी सुनावणीस हजर राहण्यासाठी कळविले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याचा योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. या सुनावणीसाठी अपिलार्थी हे हजर राहिले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या अनुपस्थितीत जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस या निर्णयाची प्रत पाठविल्याचा पुरावा जन अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर सादर करु शकले नाहीत.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. ४.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जास त्यांच्याकडील दि.१९.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची अंदाजे एकूण ३३०० पृष्ठे होत असल्याने, या माहितीपोटीचे शुल्क रु. ६६००/- इतके त्यांच्या शाळेच्या मराठवाडा ग्रामीण बँक, शाखा तरोडा (बू) येथे भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा केलेला नसल्यामुळे त्या अपिलार्थीस सदर माहिती पुरवू शकल्या नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांच्या कार्यालयामध्ये दि. २१.९.२००७ रोजी ठेवलेल्या सुनावणीस हजर राहण्यासाठी त्यांनी त्यांच्याकडील दि. १२.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले होते. तथापि या सुनावणीसाठी अपिलार्थी हे हजर राहिले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, संबंधित जन

- -

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ४.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ६६००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. मात्र अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अथवा या संदर्भात शुल्काची रक्कम भरण्याची कोणत्याही प्रकारे तयारी न दर्शविता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीस गैरहजर राहिले. या प्रकरणातील अपिलार्थीचे एकूण वर्तन पाहता, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत ज्ञात होऊनही अपिलार्थीचे हे शुल्क भरण्याची तयारी नसल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीने त्यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यास जन माहिती अधिकारी ही माहिती अपिलार्थीस देण्यास तयार असल्याचे, असे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर सुनावणीस उपस्थित नाहीत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**अपील क्र. २५३८/०७ व २५३९/०७:**

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. उपस्थित जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, सेवालाल शिक्षण संस्था, ता.देगलूर जि. नांदेड यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या सम्राट अशोक प्राथमिक विद्यालयासंदर्भात माहिती मागविली आहे, ते प्राथमिक विद्यालय जून २००४ पासून बंद करण्यात आले आहे. अपिलार्थीच्या दि. ३.८.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर दि. २१.९.२००७ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती.सदर

-　　　-

प्रस्तावित सुनावणीबाबत त्यांनी दि. १२.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले होते. तथापि अपिलार्थी हे सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्या अपिलावर अंतिम निर्णय झाला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या वरील विधानापृष्ठयर्थ अपिलार्थीस त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेल्या दि. १२.९.२००७ रोजीच्या पत्राची पावती क्र. ५९९८ या क्रमांकाची नांदेड येथील पोस्टाची पावती सादर केली आहे. यावरुन त्यांनी अपिलार्थीस सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे पत्र दिले असल्याचे दिसून येते. तसेच अपिलार्थीने ज्या संस्थेकडे त्यांच्या दोनही मूळ अर्जाद्वारे माहितीची मागणी केली आहे, ती संस्था अपिलार्थीने अर्ज करतेवेळी अस्तित्त्वातच नसल्याने, अपिलार्थीची विचाराधीन अपिले तथ्यहीन ठरत आहेत. त्यामुळे अपिलार्थीची अपिले खारीज करण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्र. २५३७/०७ निकाली काढण्यात व अपील क्र.२५३८/०७ व क्र.२५३९/०७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. २५३७/०७ निकाली काढण्यात येत आहे.

२. अपील क्र. २५३७/०७ या प्रकरणातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

३. अपील क्र.२५३८/०७ व २५३९/०७ दि. ०३.१२.२००७ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुसुमताई चव्हाण प्राथमिक शाळा, ज्ञानेश्वरनगर नांदेड जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, सेवालाल शिक्षण संस्था, देगलूर,सेवादासनगर, हणेगाव, ता.देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २५३३/०७, २५३४/०७, २५३५/०७ व २५३६/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/२५४०
निर्णय दिनांक १९-०३-२००९

१ श्री. रुखसाना हमीदखान, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सचिव, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी
पतसंस्था, औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी
पतसंस्था, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व संबंधित संस्थेचे अध्यक्ष उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १४.१२.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणताही निर्णय प्राप्त झाला नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आजही आवश्यक असल्याचे आयोगासमोर सादर केले. संबंधित संस्थेचे जन माहिती अधिकारी, त्यांना आयोगाच्या कार्यालयातून दि. १२.०२.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राद्वारे तसेच

संस्थेमधील श्रीमती खानमॅडम यांच्यामार्फत दि.१८.०३.२००९ रोजी दुपारी ०५.०० वाजता आयोगाच्या सुनावणीस हजर राहण्याचे सूचित करुनही अनुपस्थित आहेत

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रकरणात प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ०१.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे तलत शिक्षण संस्था सेवक सहकारी पतसंस्था, औरंगाबाद या संस्थेच्या सचिवांकडे दि. १.८.१९९४ ते ३१.३.२००७ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयाची काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने संबंधित सचिवांकडे अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असून हा अर्ज संबंधित सचिवांस दि. १३.९.२००७ रोजी प्राप्त झालेल्या रजिस्टर्ड पत्राची पोचप्रत अपिलार्थीस सादर केली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार संबंधित संस्थेच्या अध्यक्षांकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीचा अपील अर्ज संस्थेच्या अध्यक्षांना दि. २३.१०.२००७ रोजी प्राप्त झाल्याचा पुरावा अपिलार्थीने आज रोजी आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये केलेले प्रथम अपील अर्ज अनुक्रमे संबंधित संस्थेचे सचिव व अध्यक्षांना प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने संबंधित सचिवांनी अपिलार्थीस ही माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देणे भाग आहे. मात्र उपरोक्त प्रकरणी संबंधित सचिव व अध्यक्ष यांनी आपल्या अपिलार्थीस माहिती देण्याचे व त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय देण्याचे विहित कर्तव्य वेळेत पार न पाडून अधिनियमातील कलम ६(३) व १९(६) चा भंग केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब सचिव, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

- -

उपरोक्त प्रकरणी संबंधित संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केल्याबद्दल त्यांनी अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे एकूण २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. या मुदतीत त्यांच्या खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती देण्याचे त्यांनी नाकारली असल्याचे त्यांना मान्य आहे, असे गृहित धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहेत.

२. सचिव, तलत शिक्षण संस्था,औरंगाबाद यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव, तलत शिक्षण संस्था,औरंगाबाद यांनी अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केल्याबद्दल त्यांनी अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे एकूण २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रुखसाना हमीद खान,घ.नं.११०, म्हाडा कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी सचिव, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी सचिव, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/२५४१
निर्णय दिनांक १९-०३-२००९

१ श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, : अपिलार्थी
रा. परळी वैजनाथ,जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
संचालक (बी.सी.यु.डी.)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप कुलसचिव (शैक्षणिक विभाग), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

या अपील अर्जामध्ये  अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय न देता त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ०७.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण सहा मुद्यांद्वारे काही माहिती विचारली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अनुसार दि.९.७.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.७.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. जन अपिलीय अधिकारी यांनी ही सुनावणी ठेवल्याचे पत्र अपिलार्थीस दि. १६.७.२००७ रोजी तयार करुन ठेवले होते. अपिलार्थीस सुनावणीसाठी बोलाविले आहे, हे कळल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २३.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती पुरविली. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी नंतर दि. २४.७.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, परंतु अपिलार्थी हे या सुनावणीस गैरहजर राहिल्याच्या कारणाने व अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.७.२००७ रोजी पुरविल्याचा निष्कर्ष काढून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी , जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयाकडून दि.१२.२.२००९ रोजीच्या सूचनापत्राद्वारे तसेच कार्यालयीन

-                -

दूरध्वनीद्वारे दि.१९.०३.२००९ रोजी सकाळी ११.१० वा. श्री. आडे, सहायक प्रबंधक यांच्यामार्फत सुनावणीस उपस्थित राहण्याच्या सूचना देऊनही,संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा विद्यापीठातील त्यांचा कोणताही प्रतिनिधी आज रोजी उपस्थित नाही, याची सखेद नोंद आयोगाने घेतली असून, कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येते की, राज्य माहिती आयोगाकडे सुनावणीसाठी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर राहू नये, अशा अर्थाच्या सूचना पारित करणारे पत्र त्यांनी त्वरित जारी करावे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी विशेषतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २३.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करुन दिलेली माहिती पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दप्तर दिरंगाई कायद्याची प्रत अपिलार्थीस देणे अपेक्षित होते. तथापि या मुद्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, "खुलासेवजा माहिती देणे बंधनकारक नाही" असे मोघम उत्तर दिले आहे. उर्वरित चार मुद्यावरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२३.७.२००७ रोजीच्या पत्रामध्ये संबंधित माहितीच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे, असे नमूद केले आहे, परंतु प्रत्यक्षात त्यांनी अपिलार्थीच्या मागणीच्या अनुषंगाने आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती त्यांनी या पत्रासोबत जोडल्या होत्या किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही, तसेच ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी हे आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. तेव्हा ही वस्तुस्थिती पाहता एकूण दोन बाबी प्रामुख्याने निदर्शनास येत आहेत, त्यापैकी पहिली म्हणजे अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज करताना कोणत्याही विशिष्ट जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, "शासकीय माहिती अधिकारी,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद" या मोघम पदनामाने केला आहे. एवढे जरी असले तरी अपिलार्थीचा हा अर्ज ज्यांना प्राप्त झाला होता, त्यांनी तो संबंधित प्राधिकरणाकडे पाच दिवसांच्या आत अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे

-                                                        -

पाठविणे अपेक्षित आहे. अशाप्रकारची त्यांनी कृती केली किंवा कसे हे आयोगास संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने मूळात माहितीसाठीचा प्रथम केलेला अर्ज नेमलेल्या माहिती अधिकाऱ्याकडे केला नसल्याने, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दि. १२.७.२००७ अगर तत्पूर्वी देय होते, असे असताना त्यांना ही माहिती विद्यापीठातील संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २३.७.२००७ रोजी म्हणजेच एकूण दहा दिवस विलंबाने दिली गेली असल्याचे सप्रमाण सिध्द होत आहे. तसेच अपिलार्थीस या पत्राद्वारे दिल्या गेलेल्या माहितीमध्ये मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस न देता अपिलार्थीस, खुलासेवजा माहिती देणे बंधनकारक नाही, असे मोघम उत्तर दिले आहे. त्यामुळे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती दिल्याचे अशाप्रकारे नि:संशयपणे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस दहा दिवस इतक्या विलंबाने अपूर्ण माहिती पुरविल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२,५००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ सादर करावा. सदर कालावधीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास याबाबत त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेली मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन

- -

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस दहा दिवस इतक्या विलंबाने अपूर्ण माहिती पुरविल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२,५००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हनुमंत वसंतराव देशमुख, द्वारा कनकदंडे निवास, सरकारवाडा,अंबावेस, परळी वैजनाथ, ता.परळी वै. जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (शैक्षणिक विभाग), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

-                -

४. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/२५४२
निर्णय दिनांक १९-०३-२००९

१ श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, : अपिलार्थी
रा. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप कुलसचिव (शैक्षणिक विभाग),
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ मंडळ
(बी.सी.यु.डी.)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ,औरंगाबाद

त्रयस्थ पक्षः श्री. दिलीप मस्के,
श्री.एच.व्ही. देशमुख,
श्री. बावणे एस.जी.,
श्री. राम बाहेती,
श्रीमती निलीमा पांडे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

- -

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय न देता त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित त्रयस्थ पक्ष श्री. दिलीप मस्के,प्रा.एच.व्ही. देशमुख,प्रा.बावणे एस.जी., डॉ. राम बाहेती व डॉ. निलीमा पांडे यांच्या आणि विद्यापीठाच्या कार्यालयासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५९२/- इतके विद्यापीठाच्या लेखा विभागात जमा करुन पावती त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरणा न करता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अनुसार दि. २१.९.२००७ रोजी अपील केले. अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा न करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २०.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती दिल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही.

\- -

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी , जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयाकडून दि.१२.२.२००९ रोजीच्या सूचनापत्राद्वारे तसेच कार्यालयीन दूरध्वनीद्वारे दि.१९.०३.२००९ रोजी सकाळी ११.१० वा. श्री. आडे, सहायक प्रबंधक यांच्यामार्फत सुनावणीस उपस्थित राहण्याच्या सूचना देऊनही, जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचा विद्यापीठातील कोणताही प्रतिनिधी आज रोजी उपस्थित नाही, याची सखेद नोंद आयोगाने घेतली असून, कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येते की, राज्य माहिती आयोगाकडे सुनावणीसाठी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या परवानगीशिवाय गैरहजर राहू नये, अशा अर्थाच्या सूचना पारित करणारे पत्र त्यांनी त्वरित जारी करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांना मागणी केलेली माहिती काहीशा प्रमाणात सदोष आहे. अपिलार्थीच्या अर्जातील प्रत्येक मुद्यामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वयंस्पष्ट खुलासा अपेक्षित केला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने खुलासा अपेक्षित करणारी माहिती विचारल्यास अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदारास देय होत नाही. अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अर्जदारास अधिनियमातील तरतुदींचे पालन करुन देण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करणे अशाप्रकारची सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे.त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील प्रत्येक मुद्यावरील 'लेखी स्वयंस्पष्ट खुलासा'ही माहिती अपिलार्थीस मूळातच जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, हे आयोगास स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोरील आजच्या सुनावणीस उपस्थित नाहीत, तसेच अपिलार्थीच्या दि. १७.०८.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.८.२००७ रोजी म्हणजेच अधिनियमाद्वारे

-                                                            -

विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटी आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे. अपिलार्थीने शुल्काचा भरणा न करताही, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २०.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती दिली आहे. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हनुमंत वसंतराव देशमुख, द्वारा कनकदंडे निवास, सरकारवाडा,अंबावेस, परळी वैजनाथ, ता.परळी वै. जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (शैक्षणिक विभाग), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/२५४३
निर्णय दिनांक १९-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजेंद्र हरीनारायण शर्मा,<br>रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.११.२००७ रोजी नोंदविलेले दि. ११.१०.२००७ रोजीचे द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चार महिन्यांनंतर अपूरी व दिशाभूल करणारी माहिती दिली. त्यांना माहितीसाठीच्या मूळ अर्जाप्रमाणे अभियंत्यांची नावे व दिलेल्या कामांची नावे, याबाबतची सविस्तर माहिती अपिलार्थीस दिलेली नाही तर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त विभागाची नावे, झालेल्या कामाची संख्या व कामाची एकूण रक्कम एवढीच माहिती प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी

यांच्याकडून त्यांना चुकीची माहिती व ती देखील विलंबाने दिली असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व विभागीय चौकशी करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. २५.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - दि. १.४.२००६ ते १.४.२००७ या कालावधीमध्ये सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना देण्यात आलेल्या कामांची नावे, किंमत व विभागाचे नाव - ही माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.०५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३४/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करावयाचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि. १३.०८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३.९.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले कथित आदेश दि. १७.९.२००७ रोजी पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. २५.४.२००७ रोजीच्या मूळ अर्जास दि. २३.५.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३४/- भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात न केल्याने अपिलार्थीस ते त्यांना आवश्यक ती माहिती पुरवू शकले नाहीत. मात्र तत्कालीन अधीक्षक अभियंता श्री. केडगे यांच्या निर्देशनानुसार त्यांनी अपिलार्थीस दि. १०.८.२००७ रोजी काही माहिती विनामूल्य पुरविली. या माहितीमध्ये विभागाचे नाव व कामाची एकूण रक्कम यांचा

समावेश होता. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २५.४.२००७ रोजीच्या मूळ अर्जास दि. २३.५.२००७ रोजी म्हणजेच अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद दिला आहे. मात्र आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थीस त्यांनी दि. २३.५.२००७ रोजी शुल्काचा भरणा करण्याचे सूचित करणारे पत्र पाठविल्याचा कोणताही ठोस पुरावा त्यांना आयोगासमोर सादर करता आला नाही. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले आहे, परंतु रजिस्टर्ड पोस्टाची पावती अथवा त्यांच्या कार्यालयाची जावक नोंदवहीची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केली नाही व त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांचा दि. १७.९.२००७ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस उपलब्ध माहिती पुरविण्यात आली असल्याचा निष्कर्ष काढला आहे परंतु तो निष्कर्ष त्यांनी कसा काढला, याचे विवेचन यामध्ये केलेले नाही. जन अपिलीय अधिकारी यांचा या प्रकरणी दिलेला अपील निर्णय म्हणजे अपिलीय अधिकाऱ्याने कोणत्याही अपील प्रकरणी कसा निर्णय देऊ नये, याचे मुर्तीमंत उदाहरण आहे, असे येथे नमूद केल्यास ते वावगे ठरणार नाही. या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही स्पष्ट निर्णय दिलेला नसून फक्त सुनावणीचे इतिवृत्त प्रथम अपिलावरील निर्णय म्हणून नोंदवून ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केला नाही व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिली, हे दोनही मुद्दे निःसंशयपणे सिध्द होत आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत

-                                                            -

असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे पुरविणे भाग आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस शुल्क कळविल्याबाबतचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांना आज सुनावणीच्या वेळी उपलब्ध करुन देता आला नाही, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य देय ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस देण्यासाठी तयार असलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.८.२००७ रोजी पाठविलेली उर्वरित माहिती पाहता या माहितीमध्ये कामाच्या नावाचा समावेश नसल्याचे दिसून येते व या मुद्यावर ही माहिती अपूर्ण ठरत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अभियंत्यांचे नाव प्राप्त झाले नाही, असा उल्लेख केला आहे, या संदर्भात आपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता त्या अर्जामध्ये अपिलार्थीने अभियंत्यांची नावे या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात माहिती मागितली नसल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.यासाठी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्जाद्वारे माहितीची मागणी करावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही दुष्ट हेतूने अथवा असद्हेतूने माहिती नाकारली अथवा ती देण्यास टाळाटाळ केली असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत त्यांच्यातर्फे केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहाराबाबत सतर्क राहावे, अशा सूचना त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहेत.

-                    -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र हरीनारायण शर्मा,संपादक, नांदेड पोलखोल, एस.पी.ऑफीसच्या मागे,वजिराबाद, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४८०

निर्णय दिनांक २०-०३-२००९

१ श्री. प्रमोद आबासाहेब देशमुख, ग्रामपंचायत सदस्य, उंचेगाव (बु.), तालुका हदगांव, जिल्हा नांदेड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव, जिल्हा नांदेड — प्रतिवादी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, उंचेगाव (बु.), तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव यांच्या कार्यालयातर्फे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १९-०३-२००९ रोजीचे पत्र सादर करण्यात आले असून त्यासोबत अपिलार्थी यांचे पत्र जोडले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना विचाराधीन अपिलाशी संबंधीत माहिती दिनांक २०-०८-२००७ रोजी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झ

- -

ााली आहे. तथापि ही माहिती त्यांच्या आईने अडचणीच्या ठिकाणी ठेवली असल्याने ती त्यांच्या निदर्शनास आली नाही व त्यांनी चुकीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती प्राप्त झाली त्याचा यासंदर्भातील तपशील आयोगास दिला असून हा तपशील व अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ११-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे सादर केलेला तपशील एकसारखाच असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी दिनांक ११-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थीस मिळाली असल्याचे अनुमान आयोग काढत आहे. मात्र अपिलार्थीने दिनांक ११-०९-२००७ रोजीच्या केलेल्या प्रथम अर्जासंदर्भातील माहिती अपिलार्थीस दिनांक २०-०८-२००७ रोजी कशी प्राप्त होऊ शकते हे आयोगाच्या काय परंतु कोणत्याही जनसामान्याच्या कल्पनाशक्तीच्या पलीकडचे आहे असे आयोगास वाटते. अपिलार्थीने त्यांना ही माहिती प्राप्त झाल्याचे सरपंच, ग्रामपंचायत उंचेगाव यांच्या समक्ष व वीस रुपये इतक्या किंमतीच्या कोर्ट स्टॅम्प डकवून कबूल केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. अपिलार्थीने माहितीसाठीचा केलेला मूळ अर्ज व अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याची तारीख यातील विसंगती उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर स्पष्ट करु शकले नाहीत. हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर निर्णय घेण्याने विशेषतः अपिलार्थीच्या आयोगा-समोरील अनुपस्थितीमुळे, कोणतेही जनहीत साध्य होईल असे आयोगास वाटत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येत आहे. मात्र या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दिलेल्या अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या विसंगत पत्रामुळे ते, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यशैलीमधील नितांत सचोटीच्या अभावाबद्दल कार्यवाहीसाठी पात्र ठरत आहेत. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर व तसेच तारखेच्या विसंगतीमुळे संबंधित ग्रामसेवक व गट विकास अधिकारी पंचायत समिती हदगांव यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

- -

| | |
|---|---|
| औरंगाबाद | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक २०-०३-२००९ | राज्य माहिती आयुक्त |
| | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ श्री. प्रमोद आबासाहेब देशमुख, ग्रामपंचायत सदस्य, उंचेगाव (बु.), तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, उंचेगाव (बु.), तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४८३

निर्णय दिनांक २०-०३-२००९

१ श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, अपिलार्थी
"निशांत", वैभवनगर, जिंतूर रोड,
परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली,
जिल्हा हिंगोली

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०४-२००८ रोजी फेर नोंदणी केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १३-१०-२००६ रोजीच्या निर्णयाविरुध्द दाखल केले असून यामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांना देण्यात आलेली खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती ग्राह्य समजून एकतर्फी निर्णय दिल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च,

एप्रिल १९८३ या कालावधीतील त्यांच्या प्रलंबीत प्रवास देयकाबाबत एकूण आठ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जाची दिनांक २८-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १३-१०-२००६ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना, ते नियोजित लोकसभा निवडणुकीच्या कामामध्ये व्यस्त असल्याने सुनावणीसाठी उपस्थित राहता येणे शक्य नसल्याचे त्यांच्या दिनांक १९-०३-२००९ रोजीच्या फॅक्स संदेशाव्दारे कळविले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे हजर आहेत. त्यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही अथवा आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची त्यांना कोणतीही कल्पना दिली नाही.

या प्रकरणाशी संबंधीत घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपिलार्थीच्या युक्तिवादामध्ये तथ्य असल्याचे आयोगास आढळून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील आठ मुद्दे पाहिले असता त्यामधील मुद्दा क्रमांक ५, ६, ७ व ८ या मुद्दयांसंदर्भात अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय होत नाही, कारण या मुद्दयांव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दल कारणे व खुलासे अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे, जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल कारणे अथवा खुलासे मागण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियमामध्ये नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता फक्त त्यांच्या

-                                                        -

मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ३ व ४ शी संबंधित माहिती, जी अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत आहे, ती देय आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रवास भत्त्याच्या बिलाची नस्ती तहसील कार्यालयातून गहाळ झाल्याचे दिसून येते, तथापि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना पुन्हा एक संधी देण्यात येऊन असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ४ मधील मुद्देनिहाय माहिती हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडून गहाळ झाली असेल तर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यामध्ये आहे, ते अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या लिपिकावर होती त्यांच्यावर त्यांनी आवश्यक वाटल्यास फौजदारी कारवाई करावी. या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईसाठी पात्र ठरत आहेत. सबब महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी त्यांच्या स्तरावर पाठपुरावा करुन अपिलार्थीची जुनी प्रलंबीत देयके, त्यांना देय असल्यास, ती लवकरात लवकर कशी अदा होतील याचा प्रयत्न करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ४ शी संबंधित मुद्देनिहाय माहिती हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

- -

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, "निशांत", वैभवनगर, जिंतूर रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४८४

निर्णय दिनांक २०-०३-२००९

१ श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, अपिलार्थी
"निशांत", वैभवनगर, जिंतूर रोड,
परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, जिल्हा लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०२-२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १४-०६-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात कोणताही निर्णय न दिल्याने केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०४-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे

त्यांना देण्यात आलेले सेवानिवृत्ती वेतन व इतर तदनुषंगिक आर्थिक सवलतीच्या संदर्भातील काही विसंगती जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणून या विसंगतीबद्दल त्यांचे स्पष्टीकरण मागितले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०५-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्याकडे मागितलेले स्पष्टीकरण माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले व या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस जर त्यांना महालेखाकार, नागपूर यांचे व्याज मंजूरी पत्र दिनांक १८-१२-२००३ ची प्रत व इतर माहितीच्या प्रती आवश्यक असतील तर त्याकरिता एकूण ४० रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय दिला. तथापि हा निर्णय त्यांनी स्वतंत्र आदेशाव्दारे पारित न करता त्यांच्या नस्तीवर नोंदवून ठेवल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी या निर्णयामध्ये संबंधितांना अपिलार्थीच्या सेवानिवृत्ती वेतनाच्या व्याजाची फेरगणना करण्याचे या आदेशाव्दारे सूचित केले व तदनंतर अपिलार्थीच्या दुस-या मुद्दयामध्ये तथ्य आढळल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस देय असलेल्या सर्व रकमेची अंतीमत: दिनांक १३-०८-२००७ रोजी फेरगणना करुन रुपये ६१०१ /- ही रक्कम धनादेशाव्दारे अपिलार्थीस अदा केली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस देय असलेल्या सर्व फरकाच्या रकमेचे त्यांना प्रदान करण्यात आले असून आता अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणी केलेल्या अर्जासंदर्भात कोणतीही रक्कम देय नाही.

वरील युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना प्राप्त झालेले निवृत्तीवेतन व तदनुषंगाने आर्थिक फायद्यामधील फरकाबाबत स्पष्टीकरण मागितले होते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशा प्रकारचे स्पष्टीकरण अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देण्यासंदर्भात

- -

कारवाई करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. हे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०५-२००६ रोजी दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य वाटतो. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपिलार्थीस सुनावणीच्या वेळी तोंडी निर्णय कळविल्याचे जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आज आयोगासमोर सांगत आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस देय असलेल्या रकमेबाबत कारवाई करुन अपिलार्थीस देय रक्कम देखील दिनांक १३-०८-२००७ रोजी दिली असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास दिसून येत नाही. या विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २०-०३-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, "निशांत", वैभवनगर, जिंतूर रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४८८

निर्णय दिनांक २०-०३-२००९

१ श्री. अशोक जॉर्ज वरघट, अपिलार्थी
शमिमनगर, पाचोड रोड, अंबड, तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०९-०३-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना संबंधितांकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक ०२-०७-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना

- -

आदेशित केले. तथापि त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे दिनांक ०१-०४-२००५ ते ३१-०३-२००६ व दिनांक ०१-०४-२००६ ते २८-०२-२००७ या कालावधीशी संबंधीत त्यांच्याकडील डांबर पुरवठ्यासंदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे ही माहिती उपलब्ध होताच अपिलार्थीस कळविण्यात येईल असे कळविले. तथापि बराच कालावधी व्यपगत होऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक ३०-०७-२००७ रोजी पारित केले. या आदेशान्वये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील गेटपास व संबधितांनी प्लॅन्ट शिफ्ट केले किंवा कसे व तपमान रजिस्टर, व तसेच अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही प्राप्त झाली नाही. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०७-२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पुरविली आहे. परंतु अद्यापही अपिलार्थीस काही माहिती देणे बाकी असल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे तसेच अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये

स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती प्राप्त होणे बाकी असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील काही माहिती उदा. Speciealised machinery च्या शर्तीप्रमाणे कामे करण्यात आली का ? प्लॅन्ट ४५ किलोमीटरच्या आत बसविण्यात येऊन कामे करण्यात आली काय ? अशा प्रकारची प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती असून अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीची कारणे व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी ती सुसंगत नसल्याने, जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस देय होणार नाही. मात्र या अर्जातील उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य देय होत आहे. हे पाहता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने व अर्धवट माहिती पुरविल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या निर्णयावर संबंधित अपिलीय अधिका-याने सही न करता सदर निर्णय त्यांच्या कार्यालयातील इतर कर्मचा-याच्या सहीने निर्गमित केला असल्याने हा निर्णय आयोगातर्फे अवैध ठरविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

- -

३. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी (श्री. शेख सलीम, सध्या कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, ठाणे या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोक जॉर्ज वरघट, शमिमनगर, पाचोड रोड, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक बांधकाम) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५४५

निर्णय दिनांक २०-०३-२००९

१ श्री. मनोहर पिल्लाप्पा भवानकर, अपिलार्थी
सचिव, महात्मा बसवेश्वर गृहनिर्माण सहकारी संस्था
मर्यादित, वसमतनगर, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद, वसमतनगर, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी, हिंगोली

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्यामार्फत अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १७-०३-२००९ रोजीचे पत्र फॅक्सव्दारे प्राप्त झाले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, या प्रकरणाच्या संबंधाने त्यांना आवश्यक असलेली माहिती नगर परिषद वसमतनगर यांनी उपलब्ध करुन दिली असल्याने व त्यांच्या बांधकामास परवाना देण्याविषयी संबंधितामार्फत त्वरित कारवाई होत असल्याने, त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची त्यांनी स्वखुषीने विनंती केली आहे.

- -

अपिलार्थीच्या आयोगास उद्देशून लिहिलेल्या व जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्यामार्फत प्राप्त झालेल्या पत्राच्या फॅक्स प्रतीवरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २५४५/२००७, दिनांक ३१-०७-२००६ खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २५४५/२००७, दिनांक ३१-०७-२००६ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनोहर पिल्लाप्पा भवानकर, सचिव, महात्मा बसवेश्वर गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, वसमतनगर, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५४६

निर्णय दिनांक २०-०३-२००९

१ श्री. रत्नाकर लक्ष्मणराव देशपांडे, अपिलार्थी
व्दारा - नंदनकर दलाल वाड्याजवळ,
देवगल्ली, मंगळवारा, हिंगोली, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता,
नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य अभियंता,
गोदावरी खोरे विकास महामंडळ, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, परभणी |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जिल्हा हिंगोली, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी मुख्य अभियंता, गोदावरी खोरे विकास महामंडळ यांच्याकडे दिनांक १७-१०-२००६ रोजी प्रथम अपील सादर केले असता त्यांनी अपिलार्थीचे अपील

- -

अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्याकडे दिनांक १८-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे हस्तांतरीत करुन अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्याशी संपर्क साधण्याचे अपिलार्थीस सूचित केले. यानंतर त्यांनी दिनांक १४-१२-२००६ रोजी अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना माहिती उपलब्ध करुन देण्याविषयी अर्ज दिला परंतु त्यांच्या अर्जावर अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त न झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

त्यांच्या अशा प्रकारच्या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या माहितीच्या अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत काही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद व अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्या कार्यालयामध्ये झालेल्या पत्रव्यवहाराच्या काही प्रती, शासन निर्णय व एकूण दहा कर्मचा-यांच्या काही विशिष्ट कालावधीतील हजेरीपत्रकाच्या प्रती** - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्य अभियंता, गोदावरी खोरे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १६-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी मुख्य अभियंता, गोदावरी खोरे विकास महामंडळ, औरंगाबाद हे जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक १८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्याकडे दाद मागण्याचे व संपर्क साधण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने परत दिनांक १४-१२-२००६ रोजी अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना यासंदर्भात स्मरणपत्र दिले. परंतु त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. सदरची माहिती त्यांना संबंधितांकडून लवकरात लवकर प्राप्त व्हावी अशी अपेक्षा त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये व्यक्त केली आहे.

- -

अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज ज्या अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्याकडे केला त्यांच्या कार्यालयाचे प्रतिनिधी आज सुनावणीसाठी उपस्थित असून त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या दिनांक २८-०७-२००६ रोजीच्या त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्जावर त्यांनी अद्यापपावेतो कोणतीही कारवाई केली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता शासनाच्या जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांच्या कार्यशैलीतील बेफिकीरीचा अनुभव पदोपदी प्रत्ययास येत असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मूळात त्यांचा माहितीसाठीचा अर्ज अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्याकडे केला होता. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, परभणी यांच्याकडे उपलब्ध आहे व त्यांची, अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्यावेळी, जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली होती. त्यामुळे अपिलार्थीचा अर्ज संबंधीत अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, परभणी यांच्याकडे, सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत, पाठविणे त्यांना भाग होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती त्यांनी केली नाही. अपिलार्थीने अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्याकडे त्यांच्या या माहितीसाठी वेळोवेळी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. मात्र अपिलार्थीच्या अर्जाची कोणतीही दखल अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्या कार्यालयाने घेतली नाही व त्याचा परिणाम म्हणजे अपिलार्थी हे त्यांचा कोणताही दोष नसतांना, आवश्यक ती माहिती मिळण्याचा त्यांना हक्क प्राप्त झाला असतांना देखील सदर माहिती प्राप्त होण्यापासून अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड व त्यांच्या कार्यालयातील त्यांचे सहकारी यांच्या निष्क्रीयतेमुळे वंचित राहिले हे निश्चित. त्यामुळे या प्रकरणी अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड व या प्रकरणाशी संबंधीत त्यांच्या कार्यालयातील सर्व कर्मचा-यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव दाखविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने सचिव (जलसंपदा) यांना अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड व या प्रकरणाशी संबंधीत त्यांच्या कार्यालयातील सर्व कर्मचारी / अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य माहिती

-                -

देण्याचे कबूल केले आहे.  हे पाहता अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी अपिलार्थीचा दिनांक २८-०७-२००६ रोजीचा मूळ अर्ज हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसाच्या आत कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, परभणी यांच्याकडे पाठवावा. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, परभणी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.  अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत याच कालावधीमध्ये अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.  अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, परभणी हे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या आदेशामध्ये विहित केलेल्या मर्यादेचे पालन करतील असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी (अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ नांदेड कार्यालय) यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, परभणी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. सचिव (जलसंपदा) यांना, संबधीत अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड (दिनांक २८-०७-२००६ रोजी कार्यरत असलेले) यांच्यावर व त्यांच्या कार्यालयातील या प्रकरणाशी संबंधीत सर्व कर्मचा-यांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

-                                   -

दिनांक २०-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रत्नाकर लक्ष्मणराव देशपांडे, व्दारा - नंदनकर दलाल वाड्याजवळ, देवगल्ली, मंगळवारा, हिंगोली, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य अभियंता, गोदावरी खोरे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५४७

निर्णय दिनांक २०-०३-२००९

१ श्री. हेमराज कचरुलाल समदरिया, अपिलार्थी
शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, बीड,
तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रकल्प संचालक, नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी
कार्यालय, बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : १ जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद प्रशासन,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
२ मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

-

-

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना प्रकल्प संचालकांनी अद्यापही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दिली नाही. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करतांना केलेल्या कथनाकडे जन अपिलीय अधिकारी यांनी गांभीर्याने न पाहता त्यांचे अपील फेटाळून लावल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अंतीमतः त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे व जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगर परिषद, बीड यांनी नगर परिषदेच्या हद्दीमध्ये बांधकाम केलेल्या सिध्दी विनायक कॉम्प्लेक्ससंदर्भात सात मुद्दयावर काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुख्याधिकारी, नगर परिषद यांच्याशी संबंधीत असल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जाची झेरॉक्स प्रत मुख्याधिकारी, नगर परिषद यांच्याकडे पाठवून या पत्राची एक प्रत अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये देखील अपिलार्थीने विनामूल्य माहितीची आपली मागणी कायम ठेऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०६-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०७-०६-२००७ रोजी पारित केले व अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ३० दिवसाच्या आत माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी २५० रुपये इतकी शास्ती लावावी व अधिनियमातील कलम २० (२) प्रमाणे

- -

त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात यावी. तसेच या प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसाच्या आत माहिती दिली नसल्याने आता त्यांना ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते सध्या मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड या पदावर कार्यरत असून त्यांच्याकडे प्रकल्प संचालक सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना या पदाचा अतिरिक्त कार्यभार आहे. या पदाचे नामाभिनाम आता जिल्हा प्रकल्प अधिकारी असे केले गेले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती नगर परिषदेशी संबंधीत असल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांनी दिनांक १९-०४-२००७ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांच्याकडे पाठवून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सूचित केले होते. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नाच्या स्वरुपात मागितली असल्याने त्यांनी यासंदर्भातील उत्तरे अपिलार्थीस दिली आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक पाच व्दारे फक्त कार्यालयीन पत्रांच्या प्रती मागितल्या आहेत आणि या मुद्दयासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार झाला नसल्याने ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, एम. आर. टी. पी. ॲक्ट १९६६ मधील कलम ४५ नुसार ते या नगर परिषदेच्या क्षेत्राचे विकास प्राधिकरण म्हणून नेमले गेले असल्याने नगर परिषदेशी संबंधीत बांधकामाकरिता त्यांना फक्त उपसंचालक नगर रचना यांच्याकडून बांधकामाच्या लाईन्स नकाशांना मंजूरी घ्यावी लागते व त्याप्रमाणे त्यांनी उपसंचालक नगर रचना यांच्याकडून संदर्भिय बांधकामाकरिता आवश्यक ती परवानगी प्राप्त करुन घेतली आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक सात चे अवलोकन त्यांनी आज प्रथमतः केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सात मुद्दयांवर माहिती विचारली होती. यापैकी मुद्दा क्रमांक एक मधील अंशतः व मुद्दा क्रमांक सात शी संबंधीत माहिती फक्त जिल्हा प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत होती. मात्र उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती नगर परिषदेशी संबंधीत होती. उपरोक्त प्रकरणी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती संबंधीत प्राधिकरणाच्या प्रत्यक्षतः ताब्यात नसल्यास ती माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधीत आहे त्या प्राधिकरणाकडे

- -

अर्जदाराचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे, अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक एक व मुद्दा क्रमांक सात याकडे दुर्लक्ष केले व त्यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद बीड यांच्याकडे अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्यासाठी अपिलार्थीचा अर्ज पाठविला ही त्यांच्या स्तरावर झालेली चूक आहे. अपिलार्थीस नगर परिषद, बीड यांनी दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक तीन शी संबंधीत माहिती त्यांना योग्य प्रकारे दिली नसून ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत नाही. आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी मुख्याधिकारी, नगरपरिषद, बीड यांनी आयोगास असा खुलासा केला की, ते स्वतः या क्षेत्राचे विकास प्राधिकरण असल्याने त्यांना लेआऊट मंजूर करुन घेण्याची आवश्यकता नाही. मात्र त्यांनी या प्रकल्पाचा लाईन रेखांकनाचा नकाशा उपसंचालक नगर रचना यांच्याकडून मंजूर करुन घेतला आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक सहा व्दारे अपिलार्थीने "अशा प्रकारचे कॉम्पलेक्स बांधण्यासाठी शासनाचे नेमके धोरण काय आहे हे धोरण ठरविणा-या शासन आदेशाची प्रत" मागितली आहे. मुख्याधिकारी नगर परिषद यांनी यासंदर्भात असे उत्तर दिले आहे की, शासनाच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षित जागा नगर परिषदेने विकसीत केली आहे. यासंदर्भात मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी आयोगास असे अवगत केले की, शासनाचे अशा प्रकारचे कोणतेही विशिष्ट धोरण असल्याचा शासन नियम अद्यापपर्यंत पारित झाला नाही. त्यामुळे या मुद्दयावर मुख्याधिका-यांनी तशी माहिती अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि या मुद्दयावर मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी अपिलार्थीस विसंगत माहिती पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक सात चे अवलोकन त्यांनी आता सुनावणीच्या दिवशी केले असल्यामुळे मुद्दा क्रमांक सातची माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी ते तयार आहेत. या मुद्दयासंदर्भात अपिलार्थीने दिनांक २६-०२-२००७ रोजी केलेला अर्ज व याविषयासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या पत्रव्यवहाराच्या सर्व प्रती त्यांनी आता हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस पुरवाव्या असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील तपशीलाचा सारांश लक्षात घेता जिल्हा प्रकल्प अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक एक व सात शी संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे व मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा

- -

क्रमांक तीनशी संबंधीत उप संचालक नगर रचना यांच्या मंजूर पत्राची प्रत व मुद्दा क्रमांक सहाशी संबंधीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने ज्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे, सर्वसाधारणपणे त्याच स्वरुपात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये विशिष्ट अशा कोणत्याही कागदपत्रांची मागणी न केल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी ती कागदपत्रे पुरविली नाहीत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस या संपूर्ण घटनाक्रमामध्ये माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतुने टाळले असल्याचे अथवा अपिलार्थीपासून कोणतीही माहिती दडविली असल्याचे आयोगास आढळून येत नाही, त्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे आदेश आयोग देत नाही. मात्र येथून पुढे अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कतेने कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व या प्रकरणी त्यांच्या हातून घडलेल्या अनियमिततेबाबत आयोगातर्फे त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी यांनी दोन स्वतंत्र पत्राव्दारे अपिलार्थीस अनुक्रमे मुद्दा क्रमांक एक व सात शी संबंधीत माहिती हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक तीन व सहा शी संबंधीत माहिती हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

- -

४. जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय व मुख्याधिकारी नगर परिषद, बीड यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमराज कचरुलाल समदरिया, शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, बीड, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५४८

निर्णय दिनांक २०-०३-२००९

१ श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, अपिलार्थी
व्दारा - कनकदंडे निवास, सरकारवाडा,
अंबावेस, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा
बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कुलसचिव, शैक्षणिक विषयक बाबी, स्वामी
रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१०-२००७ रोजी दाखल झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ शी विसंगत माहिती दिल्याचे, तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण,

चुकीची व दिशाभूल करणारी असल्याने त्यांच्यावर शास्ती व शिस्तभंगाची कारवाई करण्याची आणि अपिलार्थीस सत्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २२-०८-२००७ रोजी देण्यात आली. ही माहिती मान्य नसल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०९-२००७ रोजी प्रथम अपील सादर केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक १०-१२-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ३१-१२-२००७ व ०८-०२-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि अपिलार्थी हे सुनावणीसाठी अनुपस्थित राहिल्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी होऊ शकली नाही. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो सुनावणी होणे बाकी आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

या प्रकरणी सुनावणीची नोटीस अपिलार्थीस किमान दहा दिवस सुनावणीच्या अगोदर प्राप्त होईल याची जन अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी व सदर सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिल्यास त्यांच्या अनुपस्थितीत या अपिलाची सुनावणी घ्यावी, असेही त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

- -

**आदेश**

१.	अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.	जन अपिलीय अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०३-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, व्दारा - कनकदंडे निवास, सरकारवाडा, अंबावेस, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२	जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, शैक्षणिक विषयक बाबी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

-	-

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५४९

निर्णय दिनांक २०-०३-२००९

१ श्री. बत्तिन सायन्ना गंगाराम गौड, अपिलार्थी
घर क्रमांक ३-२-२५२, गंगाधाम, गवळीपुरा,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नगर रचनाकार तथा सहायक संचालक, नगर रचना,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक संचालक, नगर रचना व मूल्य निर्धारण
विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | सहायक आयुक्त, क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ४, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप आयुक्त (अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभाग), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड |
| | त्रयस्थ पक्ष | : | श्री. राजू बाबुलाल शिंगरुळे |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २२-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

सदर अपील त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०७-२००७ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे नगर रचना विभागाच्या कर्मचा-यावर कारवाई न केल्यामुळे, श्री. दिलीप गुट्टे यांनी वेळोवेळी मौखिक व भ्रमणध्वनीने अनेक वेळा आदेश देऊनही माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने व तसेच श्री. राजू बाबुलाल शिंगरुळे यांच्या अनधिकृत बांधकामाबाबत कोणतीही उपाययोजना न केल्यामुळे केले आहे असे या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०९-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. राजू बाबुलाल शिंगरुळे यांनी अपिलार्थीच्या मुलाच्या घराच्या पश्चिम बाजूला केलेल्या कथित अनधिकृत बांधकामासंदर्भात एकूण सहा मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती अपिलार्थीस दिल्या आहेत. अपिलार्थीच्या अर्जामधील मुद्दा क्रमांक ४, ५ व ६ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ती माहिती जन माहिती अधिकारी अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक संचालक नगर रचना व मुल्य निर्धारण यांच्याकडे दिनांक २७-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि ते या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी दिनांक ०५-१२-२००६ रोजी अपिलार्थीचे प्रथम अपील या प्रकरणाशी संबंधीत जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (विकास) यांच्याकडे पाठविले. अपिलार्थीचे प्रथम अपील दिनांक ०५-१२-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर सात महिन्यांनी दिनांक ०४-०७-२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले व तसेच नगर रचना विभागातील कर्मचारी श्री. केजकर, श्री. कदम व श्री. येवले यांनी डिसेंबर २००६ पासून प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे आदेश दिले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही संबंधितांवर कोणतीही शिस्तभंगविषयक कारवाई न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगासमोर युक्तिवाद केला.

-　　　　-

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०९-२००६ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील व जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस ही माहिती पुरविण्याचे वेळी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ५ व ६ शी संबंधीत माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ही माहिती त्यांना अपिलार्थीस पुरविता आली नाही. ही माहिती उपलब्ध नसल्याचे कारण आयोगाने जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या बांधकामाच्याविरुध्द तक्रार केली होती त्या बांधकामासंदर्भात निश्चित कोणती कारवाई करावयाची याचा निर्णय त्यावेळी अंतीम झाला नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली नाही. अपिलार्थीने श्री. शिंगरुळे यांच्या अनधिकृत बांधकाम प्रकरणी केलेल्या तक्रारीबाबत श्री. शिंगरुळे यांच्याविरुध्द महानगरपालिकेने दिनांक २९-१०-२००७ रोजी न्यायालयात प्रकरण दाखल करण्यात आले असून त्याची माहिती अपिलार्थीस दिनांक २७-१०-२००७ रोजी पुरविण्यात आली आहे. या प्रकरणी श्री. शिंगरुळे यांच्या अनधिकृत बांधकामाची केस दाखल करण्यासाठी, पंचनामा करणारे संबंधीत अधिकारी सेवानिवृत्त झाल्याने, नवीन कार्यरत अधिकारी यांना नवीन आदेश देणे क्रमप्राप्त होते. तसेच त्यावेळी गुरु ता गद्दी २००८ त्रिशताब्दी समारोहाच्या तयारीसाठी करावी लागणारी कामे युध्दपातळीवर सुरु झाली असल्याने तसेच याच कालावधीमध्ये महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००७ घेण्यात आल्याने अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांना निर्णय घेण्यासाठी वेळ लागला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील एकूण सहा मुद्यापैकी तीन मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होती व ती त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सशुल्क पुरविली आहे. अपिलार्थी यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ५ व ६ व्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात महानगरपालिकेतर्फे कोणतीही कारवाई केली गेली नसल्यामुळे या मुद्दयासंदर्भात माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी उपलब्ध नव्हती व त्यामुळे ती त्यांना अपिलार्थीस देता आली नाही. आयोगाने आज रोजी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ज्या पत्राव्दारे त्यांनी माहिती दिली त्या पत्राची प्रत मागितली असता अशा प्रकारचे कोणतेही पत्र अपिलार्थीस महानगरपालिकेकडून लिहिले गेले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले व त्यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांनी हातोहात अपिलार्थीस पुरविल्या असून सहापैकी तीन मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे.

- -

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यावेळी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ ते ६ शी संबंधीत माहिती त्यावेळी उपलब्ध नसल्याने, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही असे सरळ व सोपे उत्तर अपिलार्थीच्या अर्जास दिले असते तरीही या प्रकरणी ते चालू शकले असते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ५ व ६ शी संबंधीत गा-हाण्याचा त्यांच्या पातळीवर निपटारा करण्याचे प्रयत्न केले व परिणामी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ४ ते ६ ची माहिती प्राप्त होण्यास विलंब लागला. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, हा विलंब जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरःस्सर लावला असून या विलंबाच्या कालावधीमध्ये श्री. शिंगरुळे यांनी आपले अनधिकृत बांधकाम पूर्ण करुन टाकले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे या प्रकरणाकडे पाहावयाचे झाल्यास असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती ती अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविली आहे. फक्त उर्वरित माहिती अपिलार्थीस न देण्यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस लेखी उत्तर द्यावयास हवे होते ते या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस दिले नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ ते ६ शी संबंधीत प्रकरणाबाबत जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-१०-२००७ रोजी न्यायालयात दावा दाखल केला आहे व दिनांक २७-१०-२००७ रोजी अपिलार्थीस ही माहिती तात्काळ लेखी कळविली आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीपासून मुद्दाम माहिती दडविण्याचा कोणताही हेतू असल्याचे येथे स्पष्ट होत नाही, मात्र या अनधिकृत बांधकामाबाबत संबंधितांनी लावलेल्या विलंबाबाबत महानगरपालिका आयुक्त यांच्या स्तरावरुन चौकशी होणे आयोगास गरजेचे वाटते. सबब आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी श्री. शिंगरुळे यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत न्यायालयामध्ये दावा दाखल करण्यासाठी हेतुपुरःस्सर विलंब लावला किंवा कसे याची चौकशी करावी, असे आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी असेही आढळून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज दिनांक ०५-१२-२००६ रोजी दाखल झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिनांक ०४-०७-२००७ रोजी सुनावणी घेतली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी ही कृती दिनांक २०-०१-२००७ रोजी अगर तत्पूर्वी करणे भाग होते. परंतु त्यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्यासाठी सहा महिने इतका विलंब लावला, तो

-                                                                 -

कोणत्याही परिस्थितीमध्ये समर्थनीय आहे असे आयोगास वाटत नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी विलंब लागण्यासाठी मनपाचे जे अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांच्यावर आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना, जन अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी विलंब लागण्यासाठी मनपाचे जे अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बत्तिन सायन्ना गंगाराम गौड, घर क्रमांक ३-२-२५२, गंगाधाम, गवळीपुरा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ४, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभाग), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५५०

निर्णय दिनांक २०-०३-२००९

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, अपिलार्थी
माणिकनगर, माणिक चौक,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो त्यांना कोणतीही माहिती दिली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक २३-०१-२००७ रोजीच्या त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा निवासी

- -

उपजिल्हाधिकारी यांच्याकडे एकूण आठ मुद्दयावर त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः अपेक्षिली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २९-०३-२००७ रोजी पारित केले. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणांशी संबंधीत होती त्या दोन प्राधिकरणांना म्हणजेच उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद व जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांना अपिलार्थीस एका आठवड्याच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यांची तपासणी करण्याची मागणी केली होती ती देखील जन अपिलीय अधिकारी यांनी मान्य करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील संबंधीत अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश होऊनही संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असून उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद व उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये व्यक्तिशः माहिती हस्तगत करुन घेऊन जाण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००७ रोजी संचिकांची तपासणी केली व अपिलार्थीस जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडून दिनांक २६-०४-२००७ व ०५-०५-२००७ रोजी अशा दोन टप्प्यामध्ये माहिती पुरविली गेली आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्जाबाबत अभिप्राय देण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. तसेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्यानंतर अपिलार्थीस संबंधितांकडून माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आदेश नाहीत.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २३-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविली आहे. उपस्थित अपर जिल्हाधिकारी यांनी आयोगास असे अवगत

- -

करुन दिले की, या प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झाला आहे. सबब जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २०-०३-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जिल्हा पुरवठा अधिकारी, उसमानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५७४

निर्णय दिनांक २०-०३-२००९

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, अपिलार्थी
माणिकनगर, माणिक चौक,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय न दिल्याने व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व अर्धवट माहिती दिली असल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८-११-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविली, मात्र प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या

- -

तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व चुकीची माहिती दिली आहे. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपला निर्णय दिनांक ०७-०५-२००७ रोजी पारित करुन या निर्णयाव्दारे अपिलार्थीस दिनांक १२-०५-२००७ पूर्वी माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०५-२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेल्या पोच पावतीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर करण्यात आली असून या प्रतीचे अवलोकन करता अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी आयोगाकडे दिनांक २०-०४-२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल्यानंतर, प्राप्त झाली आहे असे दिसून येते. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्जाबाबत युक्तिवाद करण्यासाठी तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याप्रीत्यर्थ सादर केलेल्या पुराव्याचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०५-२००७ रोजी दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २८-११-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०१-२००७ रोजी म्हणजेच अधिनियमातील कलम ७ (१) अन्वये विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर प्रतिसाद दिला आहे. या प्रतिसादाव्दारे त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २५ इतके भरण्याची सूचना केली होती. अपिलार्थीने सदर शुल्क भरले किंवा कसे हे कळण्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे, आयोगास मार्ग नाही. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती विनामूल्य देय होत आहे. सबब संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता काही शुल्काचा भरणा करुन घेतला असेल तर त्यांनी सदरचे शुल्क अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत परत करावे. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

- -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५०
निर्णय दिनांक २१-०३-२००९

१ श्री. सुरेश खंडूजी संगमकर, : अपिलार्थी
संगमनेर, जि. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, संगमनेर,
जि. अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद,संगमनेर,
जि. अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी,
नगर परिषद, संगमनेर,अहमदनगर.
त्रयस्थ पक्ष : श्री. शिंदे राजेंद्र रंगनाथ

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २१.०६.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी दि. १.४.२००८ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३.६.२००८ रोजी लेखी

- -

उत्तर दिले. सदर अपील त्यांनी सुनावणीमध्ये काढले नाही. त्याचे वाचन केले नाही आणि कोणतीही शहानिशा व चौकशी न करता संबंधितांकडून निर्णय पारित करण्यात आला. त्यांनी माहिती अधिकारात केलेल्या अर्जाची चौकशी न करता एकतर्फी, चुकीचा व दिशाभूल करणारा जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना मान्य नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००२-२००३ ते दि. २७.२.२००८ पर्यंतच्या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"नगर परिषदेस मालमत्ता उताऱ्यावर भोगवटादार (भाडेकरु) अशी नोंद घेण्या बाबत महाराष्ट्र शासनाच्या आदेशाची सत्यप्रत मिळणे बाबत किंवा अशा प्रकारची नोंद घेण्याबाबतचा इतर अधिकाराच्या सत्यप्रतींचे उतारे मिळणेबाबत व अशी नोंद कशाच्या लेखी आधारे घेतात याबाबतची माहिती मिळणे बाबत." अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविली व तसेच या संदर्भात महाराष्ट्र नगर परिषदा अधिनियम १९६५ मधील 'इमारतींवरील व जमिनींवरील कराचे निर्धारण व दायित्त्व' या शीर्षाखालील कलम ११६ ते १२७ ची प्रत अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलिय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले निर्णय दि. ३०.५.२००८ रोजी पारित करुन या निर्णयाद्वारे अपिलार्थीचे प्रथम अपील नाकारले. जन अपिलीय अधिकारी

- -

यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून खोटी माहिती पुरविण्यात आली व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने दाखल केलेल्या पुराव्याची शहानिशा व चौकशी न करता त्यांचा निर्णय दिला आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या संगमनेर येथील मिळकत क्र. १९५ च्या मालमत्ता उताऱ्यावर अधिकाराचा गैरवापर करुन व त्यांची मालमत्ता जबरदस्तीने बळकाविण्याकरिता भष्टाचार करुन श्री. राजेंद्र रंगनाथ शिंदे या इसमाचे भोगवटादार म्हणून नाव नोंदविले आहे, यासंदर्भात त्यांनी वेळोवेळी लेखी तक्रार अर्ज करुनही संबंधित नगरपरिषदेने कोणतीही चौकशी अथवा कार्यवाही केली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी केलेल्या अर्जास खोटी,चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे.

जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास समजावून सांगितली, त्यावेळी त्यांनी आयोगास असे अवगत केले की, नगरपरिषदेतर्फे दर चार वर्षांनी करपात्र इमारतीच्या करांचे निर्धारण करण्याकरिता पाहणी केली जाते व यामध्ये कोणत्याही करपात्र इमारतीमध्ये प्रत्यक्षात अशा तपासणीच्या वेळी जो भोगवटादार असतो, त्या भोगवटादाराचे नाव करनिर्धारण सूचीमध्ये नोंदविले जाते. अशाप्रकारच्या नोंदी महाराष्ट्र नगरपरिषद, लेखा संहिता १९७१ मधील नमुना क्र. ४३ च्या फॉर्म(प्रपत्र)मध्ये घेतल्या जातात. या प्रपत्रामध्ये संबंधित मालकाचे नाव व भोगवटादाराचे नाव असे दोन वेगवेगळे स्तंभ आहेत. केवळ भोगवटादार म्हणून नाव नोंदले गेल्याने संबंधित मिळकतीचा हक्क संबंधित नोंदधारकास प्राप्त होत नाही. तसेच या प्रकरणी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष यांच्यातर्फे संगमनेर येथील दिवाणी न्यायालयात दावा दाखल झालेला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मिळकतीवर भोगवटादाराचे नाव म्हणून श्री. राजेंद्र

- -

रंगनाथ शिंदे यांच्या नावाबद्दल काही आक्षेप आहेत व यासंदर्भात त्यांनी संगमनेर येथील दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार, या प्रकरणाकडे पहावयाचे झाल्यास असे दिसून येते की, अपिलार्थीस दि. २७.२.२००८ रोजीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.३.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली होती. तसेच त्यांच्या दि. १.४.२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर अधिनियमातील कलम १९(६) मधील तरतुदीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.५.२००८ रोजी निर्णय दिला आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीबद्दल काही आक्षेप आहेत. या आक्षेपांचे स्वरुप व या प्रकरणी भोगवटादार त्रयस्थ पक्ष व अपिलार्थी या दोघांमध्ये न्यायालयीन वाद संगमनेर न्यायालयात प्रलंबित आहे. या वस्तुस्थितीचे अवलोकन करता आणि विशेषतः या प्रकरणी अधिनियमातील सर्व तरतुदीच्या अधीन राहून जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक ती व योग्य ती कार्यवाही केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश खंडुजी संगमकर,रा. अकोले नाका स.नं.५७,भरीतकर मळा,ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,नगर परिषद, संगमनेर जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद,संगमनेर जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५१
निर्णय दिनांक २१-०३-२००९

१ श्री. शैलेश नारायण महाजन, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक निबंधक, सहकारी संस्था,
जिल्हा उपनिबंधक कार्यालय, अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक,सहकारी संस्था,
कर्जत, जि. अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १७.०६.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. २५.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे लिहून दिले आहे की, कै. श्री. नारायण माळी यांच्या वारस श्रीमती शकुंतला नारायण माळी, यांची कुटुंब निवृत्तीवेतन व उपदाने मिळाली असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन

- -

माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त झाल्याचे या प्रकरणी दिसून येते व तसेच अपिलार्थीने आयोगास केलेली विनंती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. ५१/०८, दि.२५.०६.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शैलेश नारायण महाजन,६, सेल टॅक्स कॉलनी, पाईपलाईन रोड, अहमदनगर-४१४००३

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,सहकारी संस्था कर्जत, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हा निबंधक,सहकारी संस्था,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५२
निर्णय दिनांक २१-०३-२००९

१ श्री. सलमान आर्मेचरवाला, : अपिलार्थी
रा. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय,
नाशिकरोड,नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय,
नाशिकरोड, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी,
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय,
नाशिकरोड,नाशिक.

जन अपिलीय अधिकारी : अपर आयुक्त तथा अध्यक्ष,
विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक

त्रयस्थ पक्ष : सौ.शहानूर सलमान शेख

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहे.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ११.४.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की,  जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १२.१२.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितलेली माहिती त्यांना दि. ११.२.२००८ पर्यंत प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ११.२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.३.२००८ रोजी सुनावणीस बोलाविले होते. सुनावणीच्या दिवशी जन अपिलीय अधिकारी तथा सदस्य सचिव हे अनुपस्थित होते, म्हणून ही सुनावणी झाली नाही व त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या पत्नी सौ. शहानुर सलमान शेख यांनी अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयात दि. १५.१.२००७ रोजी निवडणूक लढविण्यापूर्वी जात प्रमाणपत्र तपासणी करुन मिळण्याबाबत दिलेल्या अर्जासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "त्यांच्या पत्नीचे जात प्रमाणपत्र केव्हा तपासणी करुन मिळेल ? जात प्रमाणपत्र तपासणीकरिता अर्ज केल्यानंतर किती दिवसांत जात प्रमाणपत्र तपासणी करुन मिळते ? जात प्रमाणपत्र तपासून घेण्यासाठी आपल्या कार्यालयात किती चकरा माराव्या लागतील ? निवडणूकी दरम्यान जात प्रमाणपत्रावरुन काही वाद उद्‌भवल्यास आपले कार्यालय त्यास जबाबदार राहिल काय ? व जात प्रमाणपत्र तपासणीसाठी आणखी काय कार्यवाही आवश्यक आहे, जेणेकरुन जात प्रमाणपत्र लवकरात लवकर तपासणी करुन मिळेल "- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलिय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दि. २२.२.२००८ रोजी प्राप्त झाला. या अपील अर्जावर

- -

जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.३.२००८ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणी ठेवली होती. तथापि त्यादिवशी सुनावणी झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अशाप्रकारे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न झाल्याने व कोणतीही माहिती प्राप्त न होऊ शकल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय जात प्रमाणपत्र पडताळणी कधीही वेळेवर करुन देत नाही. कोणतीही माहिती विचारली असता, संबंधित माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली जाते व संबंधित जन अपिलीय अधिकारी हे माहिती अधिकाऱ्यास नेहमी पाठीशी घालत असतात. त्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांचा दि. १२.१२.२००७ रोजीचा अर्ज ज्या उद्देशाने केला होता, तो उद्देश आता सफल झाला आहे. अर्जदाराच्या मूळ अर्जास विहित मुदतीत उत्तर न देण्याचे समर्थनीय कारण सादर करण्यासाठी त्यांना आणखी काही कालावधीची आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, याप्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची दि. २४.३.२००८ रोजी सुनावणी ठेवूनही सुनावणी घेतली नाही अथवा यासंदर्भात कुठलाही निर्णय दिला नाही.असे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण ५ मुद्यांपैकी मुद्दा क्र. २ वगळता उर्वरित मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या

- -

'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. **माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमातील कलम ७ प्रमाणे अभिप्रेत आहे. अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेली 'माहिती' या शब्दाची व्याख्या पाहता, या व्याख्येमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकाऱ्यास त्यांच्या कृतीबद्दल कोणतीही कारणे, खुलासा अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करणाऱ्या माहितीचा समावेश नाही.** मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ - "जात प्रमाणपत्र तपासणीकरिता अर्ज केल्यानंतर किती दिवसात जात प्रमाणपत्र तपासणी करुन मिळेल?"- या मुद्यावरील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे आदेशित करण्यात येत आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीचा, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज करण्याचा हेतू सफल झाला असल्याचा युक्तिवाद, आयोग मान्य करीत नाही. **कारण माहितीसाठीचा अर्ज करताना अपिलार्थीच्या मनातील हेतू साध्य होणे व अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागविणे या दोनही प्रक्रिया पूर्णपणे भिन्न असून, अपिलार्थीने ज्या उद्देशाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली असेल व तो उद्देश जरी अंतीमतः सफल झाला असेल तरीही अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागविलेली माहिती त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार देणे हे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे.**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व प्रथम अपील अर्जाची अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेली अक्षम्य उपेक्षा आयोगाने गांभीर्याने घेतली असून अपिलार्थीच्या दि. १२.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन दर्शविलेल्या त्यांच्या

-          -

कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत सचिव (सामाजिक न्याय) यांना, त्यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी ठेवूनही सुनावणी घेतली नाही व यासंदर्भात आपले कोणतेही निर्णय अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीमधील विहित मुदतीमध्ये पारित न करुन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाची व बेपर्वा वर्तनाची त्यांनी यथायोग्यरित्या दखल घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
३. सचिव (सामाजिक न्याय) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. . सलमान आर्मेचरवाला,रा.आहेर गवळीवाडा, फलटण पोलीस चौकीमागे, कोठला रोड,

- -

अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय,नाशिकरोड,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त तथा अध्यक्ष, विभागीय आयुक्त, कार्यालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५३
निर्णय दिनांक २१-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अरुण भिकाजी आहेर,<br>रा. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २२.०४.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध असूनही ती त्यांना देण्यासाठी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी विलंब लावला आहे व टाळाटाळ करीत आहेत व माहिती नसल्याचे खोटे कारण सांगत आहेत, म्हणून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरीने साक्षांकित करुन जी माहिती हवी आहे, ती देण्याचे आदेश व्हावेत.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर या कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व विभागांमधील 'आरेखक' या संवर्गातील सर्व रिक्त पदांची सन २००३ ते २००८ अखेरपर्यंतची माहिती एका विशिष्ट प्रपत्रामध्ये मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.३.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन मंडळ कार्यालयातील रिक्त पदांच्या माहितीसाठी रक्कम रु. ४/- कार्यकारी अभियंता (रोहयो) अहमदनगर यांच्याकडे भरुन माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचविले व विभागनिहाय रिक्त पदांची माहिती संबंधित विभागप्रमुखांना देण्याचे कळविले असल्याचे अपिलार्थीस सूचित केले. या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलिय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापपर्यंत सुनावणी घेऊन आपला निर्णय दिलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊन जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश पारित करणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते, सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २.४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले अंतिम निर्णय पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

- -

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२.४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच कृ.मा.प.३... विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले ि-नर्णय पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण भिकाजी आहेर,सहायक आरेखक, मार्ग प्रकल्प विभाग क्र.२, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५४
निर्णय दिनांक २१-०३-२००९

१ श्री. शब्बीरभाई आब्बास सय्यद, : अपिलार्थी
रा. टाकळीमिया, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा शल्य चिकित्सक,
रुग्णालय कार्यालय, अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
आरोग्य उपसंचालक, नाशिक मंडळ,
नाशिक.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी,
जिल्हा रुग्णालय, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा शल्य चिकित्सक,
अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, तसेच जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांच्याकडे शुल्क भरुनही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांच्या कार्यालयात वर्ग-४ गट-ड या संवर्गातील रिक्त पदे भरतीसंदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "२००५-०६ या आर्थिक वर्षात अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, ओबीसी व खुला प्रवर्ग या वर्गवारीतून एकूण आलेल्या अर्जांची संख्या, बाद झालेल्या अर्जांची संख्या आणि नोकरीत सामावून घेतलेल्यांची संख्या, निवड केलेल्या अर्जदारांचे शिक्षण,नावे,वर्ग यांची माहिती" - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.१.२००८ व १.४.२००८ रोजीच्या पत्रांद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी रु.३०/- इतक्या शुल्काचा भरणा मनीऑर्डर अथवा डी.डी.द्वारे त्यांचे कार्यालयात करण्यासंदर्भात कळविले. या प्रकरणी अपिलार्थीने सदरचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरने पाठविले तथापि या मनिऑर्डरच्या फॉर्मवर अपिलार्थीने स्वतःचे नाव लिहिले नसल्याने ही मनीऑर्डर निनावी असल्याचे गृहीत धरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १५.०२.२००८ रोजी आरोग्य उपसंचालक नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे प्रथम अपील केले. उपसंचालक (आरोग्य सेवा) नाशिक मंडळ, नाशिक यांनी अपिलार्थीचा सदर प्रथम अपील अर्ज दि. २७.३.२००८ रोजी या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांच्याकडे पाठविला. तथापि त्यांनी या प्रकरणी कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्याने व माहितीपासून वंचित राहिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

-                    -

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थीने त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांच्या विनंतीप्रमाणे युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीकडून आलेली मनीऑर्डर त्यांना निश्चित कोणी पाठविली याचा सदर मनीऑर्डरवर उल्लेख नसल्याने ही मनीऑर्डर निनावी आली असल्याचे अनुमान काढून ही रक्कम त्यांनी शासन तिजोरीत जमा केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, याप्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी त्यांच्याकडील दि. २५.१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले असले तरी त्यांनी या पत्रामध्ये या शुल्काचा तपशील जो अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे देणे त्यांना अनिवार्य आहे, तो यामध्ये दिलेला नाही. तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला या प्रकरणातील प्रथम अपील अर्ज, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर ही मनीऑर्डर अपिलार्थीने केली असावी असा अंदाज जन माहिती अधिकारी यांना करता आला असता व त्यादृष्टीने त्यांनी अपिलार्थीकडे विचारणा केली असती तर, अपिलार्थीने त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्याकडे भरले असल्याचे त्यांना ज्ञात झाले असते व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती देता आली असती, परंतु अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केली नाही व परिणामी अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने व ती मागण्याचा अपिलार्थीस अधिनियमातील कलम ३ नुसार हक्क असल्याने, ही माहिती अपिलार्थीस कलम ७ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस

-                                                   -

पुरविणे अनिवार्य आहे. मात्र या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही सकारात्मक कार्यवाही केली नाही. आता अधिनियमाद्वारे विहित केलेली,सशुल्क माहिती देण्याची मुदत व्यपगत झाली असल्याने, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.१.२००८ रोजीच्या पत्रान्वये म्हणजेच अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र हे प्रकरण त्यांनी ज्या पध्दतीने हाताळले आहे, ते पाहता त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाकडे अक्षम्य दुर्लक्ष करुन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाईची नोंद संचालक (आरोग्य) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

-　　-

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शब्बीरभाई आब्बास सय्यद,रा. टाकळीमिया, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,जिल्हा रुग्णालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, आरोग्य सेवा, ५ वा मजला, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५५
निर्णय दिनांक २१-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शशीकांत पेमराज चंगेडे,<br>रा.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>बांधकाम विभाग,<br>महानगरपालिका, पुणे. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (अपिल),<br>महानगरपालिका, पुणे | | |

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : | नगर उप-अभियंता,<br>उपआयुक्त क्र.३ यांचे कार्यालय,<br>महानगरपालिका,पुणे. |
| जन अपिलीय अधिकारी : | उपआयुक्त क्रमांक ३,<br>महानगरपालिका, पुणे |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १३.०२.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणतीही सुनावणी घेतली नाही.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९९३-२००७ या कालावधीतील, "२६३/ए, रास्तापेठ पुणे-११ येथील नवीन बांधकामाविषयी" एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती विचारली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी प्रतिपृष्ठ रु.२/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, "दरम्यान सदरच्या झेरॉक्स प्रतींचा खर्च आपणाला करावा लागेल" हे वाक्य जन माहिती अधिकारी यांनी कोणत्या संदर्भात लिहिले आहे, याचा अर्थबोध आयोगास होत नाही. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १५.१२.२००७ रोजी उपआयुक्त (अपील) महानगरपालिका,पुणे यांच्याकडे प्रथम अपील केले होते. अपिलार्थीने सदर अपील अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविले होते. या संदर्भातील आवश्यक तो पुरावा अपिलार्थीने आयोगास सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीने सदर अपील अर्ज संबंधित जन अपिलीय अधिकारी यांना पाठविले असल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी स्वतः आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांनी त्यांचे प्रतिनिधी, इमारत निरीक्षक श्री. संजीव भास्कर बल्लाळ यांना आयोगासमोरील सुनावणीस पाठविले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे कामाचा मोठा व्याप असल्यामुळे ते आयोगासमोरील सुनावणीस हजर राहू शकले नाहीत, असे त्यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अनधिकृत गैरहजेरीबाबत आयोग

-　　　　　　　　-

तीव्र नापसंती व्यक्त करीत असून इत:पर आयोगाकडील सुनावणीस गैरहजर राहिल्यास त्यांना समन्स/वॉरंट पाठविण्याचा मार्ग आयोगास अवलंबावा लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. पुणे महानगरपालिकेकडे त्यांनी ज्या-ज्यावेळी माहितीसाठीचा अर्ज केला, त्या- त्यावेळी त्यांना उद्वेगजनक अनुभव आला असून प्रत्येक वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी बदलले जातात, परिणामी जनसामान्यांना कोणतीही माहिती मिळणे अशक्यप्राय होऊन जाते.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस ताबडतोब देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, याप्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीची मागणी सार्वजनिक प्राधिकरणाकडे केली असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ प्रमाणे देय आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ दि. १५.११.२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १५.११.२००७ रोजीच प्राप्त झाला आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी या अर्जासंदर्भात अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे दि. १४.१२.२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न करता त्यांनी अपिलार्थीस दि. २८.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले. तथापि या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस नेमके एकूण किती शुल्क भरावयाचे याचे व तसेच हे शुल्क ज्या शीर्षाखाली भरावयाचे त्याचा तपशील, जो त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे देणे अभिप्रेत आहे, तो दिला नाही. या सर्व त्रुटीमुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.

- -

२८.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रतिसाद अवैध ठरत आहे, त्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती आता अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १५.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन केलेली अक्षम्य उपेक्षा देखील येथे विचारात घेणे आवश्यक आहे, यासंदर्भात आयुक्त, महानगरपालिका,पुणे यांना, संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाची व बेपर्वाईची नोंद यथायोग्यरित्या घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १५.११.२००७ रोजीच्या अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने पुणे महानगरपालिकेकडे दि. १५.१२.२००७ रोजी प्रथम अपील केल्यानंतर दि. २८.१२.२००७ रोजी प्रतिसाद देऊन दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल आयुक्त, महानगरपालिका, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

- -

३. आयुक्त, महानगरपालिका,पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शशीकांत पेमराज चंगेडे,रा.३४६३,खिस्तगल्ली, अहमदनगर-४१४ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर उप-अभियंता,उपआयुक्त क्र.३ यांचे कार्यालय,महानगरपालिका,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त क्रमांक ३,महानगरपालिका, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

-　-

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५९०
निर्णय दिनांक २१-०३-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गोरखनाथ धोंडीराम वतारे,<br>मु.पो.मिरजगाव ता.कर्जत जि. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषि अधिकारी,<br>कर्जत, जि. अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,<br>अहमदनगर | | |

त्रयस्थ पक्षः श्री. कुंडलिक गंगावणे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०५.०३.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये दि. २२.०३.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसात माहिती दिली नाही, माहिती देण्यास दिरंगाई करुन जाणूनबुजून त्रास दिला व अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती देऊन ऑफीसमध्ये वाईट वागणूक दिली, असे नमूद केले आहे. या सर्व

- -

कारणांमुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.९.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांनी दि. ९.१.२००६ व २४.०१.२००६ रोजी दिलेला तक्रार अर्ज, कर्मचारी बदलीसंदर्भात दिलेला दि. १२.०१.२००६ रोजीचा अर्ज, दि. २१.०७.२००६ रोजी दिलेला अर्ज, श्री. कुंडलिक गंगावणे यांचा दि. २६.०७.२००६ रोजीचा अर्ज व या अर्जावरुन जन माहिती अधिकारी यांनी जी चौकशी केली, त्या चौकशी अहवालाच्या प्रती, त्यावरील शेरे,टिपणी यांच्या साक्षांकित प्रती, मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या मूळ अर्जावरील शेवटच्या वाक्याद्वारे अपिलार्थीस नेमके काय म्हणावयाचे आहे, याचा आयोगास बोध होत नाही. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिश अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दि. १४.९.२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१०/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केला नाही. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. ०९.१०.२००६ रोजीच्या त्यांच्या कार्यालयातील पत्राद्वारे अपिलार्थीस दि.१९.१०.२००६ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविली. ही माहिती अपिलार्थीस दि. २३.१०.२००६ रोजी प्राप्त झाली. तथापि सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.११.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.१.२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीपूर्वीच माहिती दिली असल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील दि. ६.१.२००७ रोजीच्या त्यांच्या आदेशाद्वारे निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित

- -

होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत. अथवा त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा देखील त्यांनी त्यांच्या कार्यालयात आजतागायत केलेला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.१०.२००६ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील दि. ०९.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविल्याचे दिसून येते व ही माहिती अपिलार्थीस दि. २३.१०.२००६ रोजी प्राप्त झाल्याचा पुरावा देखील जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीस ही माहिती दि. २३.१०.२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता यामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली दि. ९.१.२००६, २४.१.२००६ व १२.१.२००६ रोजीच्या अर्जांचा संदर्भ कोठेही आढळून येत नाही व तसेच अपिलार्थीच्या या दिनांकाच्या अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली याची माहिती त्यामध्ये अपिलार्थीस प्राप्त झाली नसल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी आयोगास जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाविषयी व इतर क्षेत्रीय अधिकाऱ्यांविषयी वेगवेगळया तक्रारी करीत असतात. अपिलार्थीस आता जी माहिती देणे बाकी आहे, ती माहिती ते अपिलार्थीस सात दिवसांच्या आत देण्यास तयार आहेत. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित

- -

करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेले तक्रार अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यावर त्यांच्या कार्यालयाने संदर्भिय विषयावर केलेल्या सर्व पत्रव्यवहारांच्या व टिपणी व त्यावरील अभिप्रायांच्या प्रती अपिलार्थीस त्यांनी 'केलेली कार्यवाही' म्हणून विनामूल्य पाठवाव्यात.

आयोगास या प्रकरणी असेही आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे त्यांना माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाचा प्रतिनिधी पाठविला असता, अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्यास नकार दिला. केवळ त्यामुळेच जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठवावी लागली. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणत्याही असद्‌हेतूने टाळले असल्याचे अथवा अपिलार्थीपासून दुष्ट हेतूने कोणतीही माहिती दडविल्याचे नि:संशयपणे सिध्द न झाल्याने, अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे कोणतेही आदेश आयोग देत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती वर स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिश: उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या ऑफीसमध्ये वाईट वागणूक दिली जाते, असे नमूद केले आहे. तथापि या संदर्भात त्यांनी कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केला नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी संबंधित माहितीविषयी पुरावा व शपथपत्र सादर करण्यास कळविले असता ते दाखल केले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. आज रोजी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर केलेल्या या आरोपाचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयावर केलेले सदर आरोप आयोग फेटाळून लावत आहे.

-                                                                -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोरखनाथ धोंडीराम वतारे,मु.पो.मिरजगाव ता.कर्जत जि. अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,कर्जत, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र. २५९१/०७ व २५९२/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५९१ व २५९२
निर्णय दिनांक २१-०३-२००९

१ सौ. स्वाती सचिन महाजन, : अपिलार्थी
रा. राहुरी, जि. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
नाशिक थर्मल पॉवर स्टेशन, एकलहरे,
नाशिक रोड, नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य महाव्यवस्थापक,
नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे,
नाशिक रोड, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : अधीक्षक अभियंता (निर्मिती)
नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे,
नाशिक रोड, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : महाव्यवस्थापक टप्पा क्र.१,
नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे,
नाशिक रोड, नाशिक

त्रयस्थ पक्षः श्री. सचिन देविदास महाजन

**निर्णय**

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक २१.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्ष यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०१.१०.२००७ रोजीची राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील

- -

कार्यालयात दि. ०६.१०.२००७ रोजी दाखल झालेली क्र. २५९१/०७ व २५९२/०७ ही दोन द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी ही माहिती आयोगाकडून मागविली आहे. त्यांच्या पतीकडून त्यांच्या जीवितास धोका असल्याने त्यांना ही माहिती आयोगाकडून अपेक्षित आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपील क्र. २५९१/०७ च्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्या दि. ५.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्ष श्री. सचिन देविदास महाजन, उपकार्यकारी अभियंता यांच्यासंदर्भात, ते कोणत्या तारखेपासून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सेवेत आहेत व ती सेवा कायमस्वरुपी आहे किंवा कसे, नसल्यास कोणत्या प्रकारच्या सेवेत आहेत, अशी सेवा कायम न करता, कोणत्या नियमाच्या/कायद्याच्या आधारे इतके वर्ष सेवेत ठेवू शकतात, त्रयस्थ पक्षासंदर्भात त्यांनी द्विभार्या प्रतिबंधक कायद्याच्या भंग केला असल्याने त्यांच्यावर कोणती कारवाई केली त्याबाबत खातेनिहाय चौकशी केली असल्यास अहवालाच्या प्रती, चौकशी केली नसल्यास कोणत्या कायद्याच्या आधारे त्यांची चौकशी केली नाही. त्रयस्थ पक्षाने द्विभार्या प्रतिबंधक कायद्याचा भंग केलेला असताना त्यांना कोणत्या नियमाच्या आधारे सेवेत ठेवले, ही माहिती मागविली होती. अपील क्र. २५९२/०७ च्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्या दि. १४.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष श्री. सचिन देविदास महाजन यांनी दि. १३.६.२००७ पर्यंत स्वयंघोषित केलेल्या मालमत्तेची माहिती व दि. १.४.२००६ ते ३१.७.२००६ या कालावधीमध्ये घेतलेल्या सर्व रजेचा तपशील ही माहिती मागितली होती.

अपील क्र. २५९१/०७ च्या संदर्भात अपिलार्थीच्या दि. ५.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ४.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती, "माहिती उघड करण्यापासून सूट"या तरतुदीखाली येत असल्याने देण्याचे

- -

नाकारले.अपील क्र. २५९२/०७ च्या संदर्भात अपिलार्थीच्या दि. १४.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.९.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस याच कारणाकरिता माहिती देण्याचे नाकारले.जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशाप्रकारे प्राप्त झालेल्या नकारात्मक प्रतिसादामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील क्र. २५९१ च्या संदर्भात दि. १०.८.२००७ रोजी व अपील क्र. २५९२/०७ च्या संदर्भात दि. ३.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपिलावर निर्णय झाल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी या दोनही प्रकरणी कोणताही निर्णय दिला नसल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्रयस्थपक्षाविषयी माहिती मागविली असून त्रयस्थ पक्ष हे त्यांचे पती आहेत व त्यांच्या पतीने द्विभार्या प्रतिबंधक कायद्याचा भंग करुन दुसरे लग्न केल्याचे त्यांना माहित आहे व यासंदर्भात त्यांनी न्यायालयामध्ये दावा दाखल केला असून या दाव्याच्या कामाकरिता त्यांना या अर्जाद्वारे मागणी केलेली त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती आजही हवी आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जांवर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही कोणत्याही सार्वजनिक हिताशी संबंधित नसल्याने त्यांनी अपिलार्थीस दोनही प्रकरणी माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीने नमूद केल्याप्रमाणे त्रयस्थ पक्षाने दुसरा विवाह केला असल्याबाबत जर त्यांच्याकडे सबळ पुरावा सादर केला तर ते त्रयस्थ पक्षावर कारवाई करण्यास तयार आहेत. तसेच अपिलार्थीने या दोनही प्रकरणी मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सहज उपलब्ध नव्हती. ही माहिती त्यांना त्यांच्या कार्यालयातील मानव विकास विभागाकडून घेऊन अपिलार्थीस पुरवावी लागणार होती.

-                                                            -

त्रयस्थ पक्षाच्या उपस्थित प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्रयस्थ पक्षास मनुष्य म्हणून जगण्याचा अधिकार असून कार्यालयाच्या बाहेर ते काय करतात, याबाबत त्यांची कार्यालयीन माहिती सोडून इतर खाजगी बाबीशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यात येऊ नये.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०४.०९.२००७ व १२.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांच्या दोनही मूळ अर्जामधील माहिती उघड करण्याचे नाकारले आहे. अपिलार्थीने विचाराधीन दोनही मूळ माहितीसाठीच्या अर्जांमध्ये मागणी केलेल्या माहितीतील त्रयस्थ पक्षाच्या मालमत्तेचा तपशील व अपिलार्थीच्या दि. ५.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ (क) व ३(ड) ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित केला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाबाबत अथवा त्यांच्या कोणत्याही कृतीबाबत खुलासा व स्पष्टीकरण मागता येणार नाही, हे अधिनियमातील कलम २ (च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येवरुन दिसून येते. 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येमध्ये फक्त जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती हीच अर्जदारास त्यांनी अधिनियमातील इतर तरतुदींचे पालन करुन देणे हे या कायद्यामध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या मालमत्तेसंदर्भात मागितलेली माहिती उघड केल्याने जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे कोणतेही सार्वजनिक हित साध्य होणार नाही, तसेच ही माहिती अपिलार्थीस उघड केल्यास त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप केल्यासारखे होईल, अशी आयोगाची खात्री असल्याने ही माहिती अपिलार्थीस देय होणार नाही. मात्र अपिलार्थीने उपरोक्त दोनही प्रकरणी केलेल्या त्यांच्या दि. ५.७.२००७ व १४.६.२००७ रोजीच्या अर्जातील उर्वरित माहिती ही अपिलार्थीस, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने त्यांच्या दि.

-                    -

५.७.२००७ व १४.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व वर स्पष्ट केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी दोन गोष्टी प्रामुख्याने नजरेस पडतात त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. त्यापैकी पहिली बाब अशी की, अपिलार्थीने त्यांच्या अपील क्र. २५९१/०७ या द्वितीय अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.८.२००७ रोजी प्रथम अपील केले व अपील क्र. २५९२/०७ च्या संदर्भात दि. ३.८.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६) प्रमाणे विहित कालावधीमध्ये सुनावणी तर घेतली नाहीच परंतु अपिलार्थीच्या अपील अर्जास साधे उत्तर पाठविण्याचे सौजन्य देखील संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविले नाही, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे. सबब व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना, जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वा वृत्तीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणातील दुसरी बाब अशी आहे की, अपिलार्थीच्या दि. ५.७.२००७ रोजीच्या व दि. १४.६.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस अनुक्रमे दि. ४.८.२००७ व १३.७.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी प्रतिसाद देणे अभिप्रेत होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस दि. ५.७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना तीस दिवस इतक्या विलंबाने व दि. १४.६.२००७ रोजीच्या अर्जाची एकूण साठ दिवस इतक्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांनी दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती देण्यासाठी अपिलार्थीस ती विलंबाने प्रतिसाद देण्याचे कोणतेही कारण समर्थनीय असावे, असे

-　　　　-

आयोगास वाटत नाही. आज जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील इतर अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर ती अपिलार्थीस द्यावी लागणार होती, असे स्पष्ट केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांच्याबरोबरच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे इतर सहायक/अधिकारी ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) नुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतुद आहे,ते सर्वजण एकत्रितपणे अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्यासाठी जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या माहितीपोटी विलंबाने प्रतिसाद देऊन त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. हे पाहता, संबंधित सर्व जन माहिती अधिकारी यांना अपील क्र. २५९१/०७ च्या संदर्भात तीस दिवसांच्या विलंबाकरिता विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५०/- या प्रमाणे एकूण रु.७,५००/- इतकी व अपील क्र. २५९२/०७ च्या संदर्भात एकूण साठ दिवसांच्या विलंबाकरिता विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५०/- प्रमाणे एकूण १५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीच्या रकमेची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,मुंबई यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत करावी व तदनंतर सदर शास्तीच्या रकमेचा भरणा जास्तीत जास्त पाच हप्त्यात संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक पुढील लेखाशीर्षात करतील याची दक्षता घ्यावी.

**"००७० इतर प्रशासनिक सेवा,६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१ "**

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची दोनही अपिले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. २५९१/०७ व २५९२/०७ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

कृ.मा.प.६...

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या दि. ५.७.२००७ व १४.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित देय असलेली संपूर्ण माहिती निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठवावी.

३. अपील क्र. २५९१/०७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांना एकूण रुपये ७,५००/- (अक्षरी रुपये सात हजार पाचशे ) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. अपील क्र. २५९२/०७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांना एकूण रुपये १५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,मुंबई यांनी, उपरोक्त आदेश क्र.३ व ४ प्रमाणे शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत करावी व संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे शास्तीची रक्कम जास्तीत जास्त पाच हप्त्यात नियमितपणे कोषागारात शास्तीची रक्कम पूर्णपणे कोषागारात भरणा होईपर्यंत करतील याची दक्षता घ्यावी.

६.

\-                                                    -

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २१-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. स्वाती सचिन महाजन,द्वारा डॉ. एन.व्ही. शिंदे, 'सत्यपूजा निवास' करपे इस्टेट, राहुरी,ता.राहुरी जि. अहमदनगर-४१३ ७०५.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता (निर्मिती), नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे,नाशिक रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (आर.पी.ए.डी.द्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक टप्पा क्र.१,नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे,नाशिक रोड, नाशिक -यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पुर्व), मुंबई – ५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. उपकोषागार अधिकारी, एकलहरे, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५९३
निर्णय दिनांक २१-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती जिजाबाई पाराजी आंधळे,<br>मु.पो.प्रतापपूर,ता. संगमनेर, जि. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी,<br>अहमदनगर.<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, अहमदनगर. | : | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी,आरोग्य विभाग,
जिल्हा परिषद, अहमदनगर.
जन अपिलीय अधिकारी : जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २७.१२.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही. या अर्जामध्ये त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, त्यांनी जिल्हाधिकारी, अहमदनगर

यांच्याकडे, निमगावजाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात अर्धवेळ स्त्री परिचारिका नेमणूकीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत अर्ज केला होता, त्याबाबत काय चौकशी केली, याची माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली होती. तथापि ही माहिती मुदतीत न देता जन माहिती अधिकारी यांनी चुकीची, खोटी माहिती देऊन अपिलार्थीचे नुकसान केले व त्यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांचे नाव व पत्ता दिलेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे साक्षांकित स्वरुपात माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे दि. २८.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात आदेश दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळेत माहिती न दिल्याने त्यांनी दि. २८.९.२००७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दि. २३.११.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या दिवशी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही, त्यामुळे अपिलार्थीने त्यांचे लेखी म्हणणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर करुनही त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापपावेतो निर्णय दिला नाही.

\- -

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ३०.५.२००७ रोजीच्या मूळ अर्जास अनुसरुन त्यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही याचे कारण त्यांना आयोगासमोर सांगता येत नाही. अपिलार्थीचा दि. ३०.५.२००७ रोजीचा मूळ अर्ज त्यांना दि. ६.६.२००७ रोजी तहसीलदार (सा.प्र.वि.) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याकडून प्राप्त झाला. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी दि. १४.९.२००७ रोजी आवश्यक तो प्रतिसाद दिला असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये संदर्भित केलेल्या तक्रारीबाबत अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत त्यांनी या पत्राद्वारे अपिलार्थीस पाठविली. तथापि चौकशी अहवालातील निष्कर्ष अपिलार्थीस मान्य नसल्याने त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे प्रथम अपील केले. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर अद्यापपर्यंत निर्णय घेतला नसल्याचे मान्य केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुख्य माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीबाबत काही आक्षेप आहेत व या आक्षेपांचे निराकरण करुन घेण्याकरिता त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथम अपील केले आहे. येथे अपिलार्थीस असे नमूद करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेल्या चौकशी अहवालासंदर्भात त्यांचे काही आक्षेप असल्यास त्या आक्षेपांचे निराकरण त्यांनी परस्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अथवा इतर सक्षम प्राधिकरणाकडून करुन घ्यावे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतदीनुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध व देय असलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात व स्थितीत आहे, त्याच स्वरुपात ती अपिलार्थीस प्राप्त करुन घेता येईल. विचाराधीन प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे

उपलब्ध असलेला, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल ज्या स्थितीत आहे, त्या स्थितीत अपिलार्थीस पुरविला आहे, त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीपुरता विचार करावयाचा झाल्यास अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुख्य माहिती मिळाल्याचे दिसून येते. अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याच्या दृष्टीने अपिलार्थीने केलेल्या तक्रारीनंतर जन माहिती अधिकारी यांनी या तक्रारीसंदर्भात केलेल्या इतर पत्रव्यवहाराच्या प्रती देखील त्यांनी अपिलार्थीस या अहवालासोबत पाठविणे भाग आहे. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी उपरोक्त प्रकरणी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जन अपिलीय अधिकारी यांच्या या प्रकरणातील वर्तनाबाबत आयोग असे अभिप्राय नोंदवित आहे की, अपिलार्थीच्या दि. २८.९.२००७ रोजीच्या मूळ अपील अर्जावर त्यांनी अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीप्रमाणे कोणतीही कारवाई न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस दि. ५.७.२००७ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद मिळणे अपेक्षित असताना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना २ महिने ९ दिवस इतक्या विलंबाने प्रतिसाद दिला गेल्याचे दिसून येते. अपिलार्थीस विलंबाने प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

- -

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती, निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती जिजाबाई पाराजी आंधळे,मु.पो.प्रतापपूर ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक ७८/२००८, ७९/२००८ व ८०/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७८, ७९ व ८०

निर्णय दिनांक २३-०३-२००९

१ श्री. तारे राजू भुजंगराव, अपिलार्थी
मु. पो. बाळानगर, पाचोड रोड, अंबड,
तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ अपील क्रमांक ७८/२००८

जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड,
जिल्हा जालना.

जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर,
जिल्हा जालना

२ अपील क्रमांक ७९/२००८

जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
उपविभाग, घनसावंगी, जिल्हा जालना.

जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
विभाग, जालना

३ अपील क्रमांक ८०/२००८

जन माहिती अधिकारी

- -

तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी,

जिल्हा जालना.

जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उपविभागीय कृषि अधिकारी, घनसावंगी,

जिल्हा जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, घनसावंगी, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, जिल्हा जालना

**निर्णय**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, अपील क्रमांक ७८/२००८ शी संबंधित जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपील क्रमांक ७९/२००८ शी संबंधित जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपील क्रमांक ८०/२००८ शी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०१-२००८, ११-०६-२००८ व ०५-०९-२००८ रोजी दाखल केलेली व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या तीनही प्रकरणांशी संबंधित अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे तोंडी अथवा लेखी आदेश दिलेले नाहीत व परिणामी त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या तीनही प्रकरणी, अपील क्रमांक ७८/२००८ संदर्भात उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना अथवा प्रत्यक्षतः नेमले गेलेले जन अपिलीय अधिकारी, अपील क्रमांक ७९/२००८ संदर्भात कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व अपील क्रमांक ८०/२००८ संदर्भात तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, जिल्हा जालना यांनी घटनाक्रमाच्या या टप्प्यावर प्रथमतः अपिलार्थीच्या संबंधित प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. सबब, या तीनही जन अपिलीय अधिकारी अथवा प्रत्यक्षतः नेमले गेलेले जन अपिलीय अधिकारी, यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी

संबंधीत दिनांक २८-०८-२००७, दिनांक १६-०४-२००८ व दिनांक १०-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले निर्णय पारित करावेत. अपिलार्थीचे संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली तीनही व्दितीय अपिले (अपील क्रमांक ७८/२००८, ७९/२००८ व ८०/२००८) निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ७८/२००८, ७९/२००८ व ८०/२००८ निकाली काढण्यात येत आहेत.

२. उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, जिल्हा जालना अथवा या प्रकरणी प्रत्यक्षतः नियुक्त केले गेलेले जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत अनुक्रमे दिनांक २८-०८-२००७, दिनांक १६-०४-२००८ व दिनांक १०-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले निर्णय पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

- -

१ श्री. तारे राजू भुजंगराव, मु. पो. बाळानगर, पाचोड रोड, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

(सुलभ संदर्भासाठी अपिलार्थीच्या दिनांक २८-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे)

४ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

(सुलभ संदर्भासाठी अपिलार्थीच्या दिनांक १६-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे)

६ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

(सुलभ संदर्भासाठी अपिलार्थीच्या दिनांक १०-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे)

८ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक ८१/०८ व ८२/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८१ व ८२

निर्णय दिनांक २३-०३-२००९

१ श्री. प्रदिप सिताराम फुलमाळी, अपिलार्थी

आण्णाभाऊ साठे नगर, परतूर, तालुका परतूर,

जिल्हा जालना

**विरुध्द**

अपील क्रमांक ८१/२००८

१ जन माहिती अधिकारी

तथा उप विभागीय अधिकारी,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना, तालुका

जिल्हा जालना

अपील क्रमांक ८२/२००८

२ जन माहिती अधिकारी

तथा उप विभागीय अधिकारी,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर, तालुका

परतूर जिल्हा जालना

३ अपील क्रमांक ८१/२००८ व ८२/२००८ प्रतिवादी

जन अपिलीय अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना,

जिल्हा जालना

**निर्णय**

-   -

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपील क्रमांक ८१/२००८ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांची प्रतिनिधी, अपील क्रमांक ८२/२००८ शी संबंधित जन माहिती अधिकारी व दोनही प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

अपील क्रमांक ८१/२००८

उपरोक्त प्रकरणी आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीचे दिनांक १६-०३-२००९ रोजीचे त्यांना उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली सर्व माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दाखविली असून ती माहिती पाहून त्यांचे समाधान झाले आहे व त्यांची कोणतीही तक्रार राहिली नाही.

अपील क्रमांक ८२/२००८

उपरोक्त प्रकरणी आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २१-०३-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांना या प्रकरणाशी संबंधित आवश्यक असलेली माहिती व्यक्तिशः पाहून त्यांचे समाधान झाले आहे व त्यांना आता सदर माहितीची आवश्यकता नसल्याने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

विचाराधीन दोनही अपील प्रकरणी, अपिलार्थीने आयोगास व कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना उद्देशून लिहिलेल्या वरील प्रकारच्या पत्रांचे अवलोकन करता व आज सुनावणीस अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलांवर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नसल्याने अपिलार्थीची विचाराधीन अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

- -

१.	अपील क्रमांक ८१/२००८, दिनांक २२-०२-२००८ व अपील क्रमांक ८२/२००८, दिनांक २२-०२-२००८ खारीज करण्यात येत आहेत.

औरंगाबाद                                                    ( वि. बा. बोरगे )

दिनांक    २३-०३-२००९                                    राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. प्रदिप सिताराम फुलमाळी, आण्णाभाऊ साठे नगर, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२	जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर, तालुका परतूर जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

-	-

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५७५

निर्णय दिनांक २३-०३-२००९

१ श्री. दत्तात्रेय सोमनाथ रत्नाकर, अपिलार्थी
मु. पो. डुबेरे, तालुका सिन्नर,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, सिन्नर,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी व सध्याचे जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांच्या प्रथम अपील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती पुरविली नसल्याचे सिध्द झाल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती नाकारल्याबद्दल दंड आकारण्यात यावा, माहिती देण्यास जितक्या

- -

दिवसांचा विलंब झाला त्या प्रत्येक दिवसासाठी प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे त्यांना दंड व्हावा, माहिती मिळण्यासाठी अपिलार्थीस जो मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागला त्याबद्दल त्यांना भरपाई द्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०३-२००७ रोजीच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

**"दिनांक ०८-०८-२००२ रोजी सिटी सर्व्हे नंबर ३६२ ची मोजणी केलेली होती. त्या मोजणी नकलेवर सिटी सर्व्हे नंबर ३६२ ची पूर्वेकडे पडीत बखळ जागा दाखवलेली आहे व या बखळ जागेलगत सिटी सर्व्हे नंबर ३६१ आहे. मात्र दिनांक २२-११-२००६ रोजी सिटी सर्व्हे नंबर ३६१ ची मोजणी झाली त्यावेळी ५ चौरस मीटर ३६२ चे अतिक्रमण दाखविण्यात आले ही बाब दोन्ही सीट पडताळणी केल्यावर निदर्शनास येते, ही पाच चौरस मिटर ३६२ चे अतिक्रमण कशाच्या आधारे दर्शविले याचा लेखी स्वरुपात खुलासा करावा."**

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०३-२००७ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०६-२००७ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविण्याबाबत सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविलेली नाही हे स्पष्ट होत असल्याचा उल्लेख केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने त्यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई करण्याची विनंती करुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २२-०३-२००७ रोजी या प्रकरणाशी संबंधीत त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पुरविली आहे. तथापि त्यावेळी अपिलार्थीने माहिती मिळाल्याचे कबूल केले नाही, त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी जन अपिलीय

- -

अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००७ रोजी प्रथम अपील केल्यानंतर दिनांक २८-०५-२००७ रोजी अपिलार्थीस पत्राव्दारे वस्तुस्थितीची जाणीव करुन दिली व तदनंतर परत जन अपिलीय अधिकारी यांचा दिनांक ०७-०६-२००७ रोजीचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस अधिकची माहिती परत पुरविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस त्यांनी दिनांक २२-०३-२००७ रोजी व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन दिली, हा युक्तिवाद आयोग मान्य करत नाही, कारण यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे कोणताही ठोस पुरावा सादर केला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या म्हणण्यापृष्ठ्यर्थ त्यांनी सहायक माहिती अधिकारी यांचे जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले एक पत्र दाखविले या पत्रामध्ये सहायक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक तीन ते चार वेळा विनंती करुनही माहिती स्वीकृत केली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना दिनांक २८-०५-२००७ रोजी कळविले आहे. अपिलार्थीने माहिती स्वीकृत करण्यासाठी दिनांक २२-०३-२००७ रोजी नकार दिल्यानंतर अंदाजे दोन महिन्याहून जास्त कालावधी व्यपगत झाल्यानंतर सहायक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची ही कृती जन माहिती अधिकारी यांच्या नजरेस आणण्याची कृती सर्वथा चुकीची आहे. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त झाली नसल्याचा आयोग निष्कर्ष काढत आहे. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०६-२००७ रोजी माहिती पुरविल्याप्रीत्यर्थ त्यांनी आयोगास आवश्यक तो पुरावा सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये त्यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक ०७-०६-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे अनुमान काढून, जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या प्रथम अपील निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळेत माहिती पुरविली नसल्याचा निष्कर्ष काढला होता. हे पाहता, या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) नुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. हे सर्व- जण अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्याप्रीत्यर्थ जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. याचबरोबर अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करतांना त्यांना, त्यांनी मागितलेली माहिती टपालाव्दारे हवी की व्यक्तिशः हवी आहे, तसेच अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे याबाबतही त्यांनी कोणतेही अभिप्राय दिले नसल्याने अपिलार्थीचा मूळ अर्ज देखील या प्रकरणी अवैध ठरत आहे. या सर्व बाबी एकत्रित विचारात घेतल्या असता, अपिलार्थीने आयोगाकडे

- -

केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये केलेल्या विनंतीप्रमाणे जरी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियामतील कलम २० प्रमाणे कारवाई करणे योग्य नसले, तरीही उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंबाने प्रतिसाद दिल्याने त्यांना व त्यांच्या सहायकांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस या प्रकरणी माहिती देण्यासाठी विलंबाने प्रतिसाद देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सहायक यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दत्तात्रेय सोमनाथ रत्नाकर, मु. पो. डुबेरे, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, सिन्नर, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५७६

निर्णय दिनांक २३-०३-२००९

१ श्री. प्रभाकर दौलत वाळके, अपिलार्थी
मौजे खेडले, तालुका दिंडोरी,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वन परिक्षेत्र अधिकारी, दिंडोरी,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक, पूर्व भाग, नाशिक

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक (जंकास) पूर्व भाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०५-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या निर्णयाविरुध्द केल्याचे दिसून येते.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ११-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे सर्वसाधारण टपालाव्दारे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"उप वन संरक्षक, पूर्व भाग, नाशिक यांना डिसेंबर २००६ तक्रार अर्ज असून दिनांक ०९-०५-२००७ रोजी अहवाल सादर केला आहे. दिंडोरी वनक्षेत्रपाल यांनी साधरणत: ४ महिन्यांनी खुप उशिरा पंचनामा केला असून नैसर्गिक जंगल संपत्तीचे नुकसान झाले असून अर्जदाराचे जंगल संपत्तीचे (शासनाची फसवणूक झाली आहे) नुकसान झाले असून शासनाचे नुकसान झाले आहे माहिती मिळावी त्या कामी."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे अपिलार्थीची तक्रारसदृश्य माहितीची मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात अपिलार्थीस माहिती दिली. तथापि ही माहिती अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०८-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले व अपिलार्थीस पूर्वी सादर केलेली माहिती पुन:श्च देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत दिनांक ०३-०९-२००७ रोजी अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या क्षेत्राची परत पाहणी करुन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी वेळोवेळी माहिती पुरविल्याचा आवश्यक तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची दिसून येते. अपिलार्थीस नेमकी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती अपेक्षित आहे याचा अर्थबोध अपिलार्थीच्या अर्जावरुन होत नाही. एवढे असूनही अपिलार्थीच्या प्रथम अर्जातील संदर्भिय प्रकरणाची जन माहिती व अपिलीय अधिकारी

यांनी योग्य प्रकारे दखल घेऊन अपिलार्थीस त्यांच्या तक्रारीसंदर्भात आवश्यक तो खुलासा दिनांक ११-०७-२००७ व दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे केल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी केलेल्या चौकशीमध्ये, अपिलार्थीने माहिती अर्जात व अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे शासनाचे अथवा वन विभागाचे कोणतेही नुकसान झाल्याचे त्यांना आढळल्याचे दिसून येत नाही. हे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने मोघम स्वरुपाची माहिती मागवूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक तो प्रतिसाद अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिला असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २३-०३-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रभाकर दौलत वाळके, मौजे खेडले, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, दिंडोरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी सहायक वनसंरक्षक (जंकास) पूर्व भाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५७७

निर्णय दिनांक २३-०३-२००९

१ श्री. विशाल अशोक मोरे, अपिलार्थी

आहेर मास्तरांची चाळ, ५२ नं., मनमाड,

तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप प्राचार्य, कला, विज्ञान आणि वाणिज्य

महाविद्यालय, मनमाड, तालुका नांदगाव

जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा प्राचार्य, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,

मनमाड, तालुका नांदगाव

जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केला असता व या अर्जासोबत ते

दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा जोडूनही जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक त्यांच्याकडे रुपये २५ इतक्या अधिक शुल्काची मागणी केली, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता जातीव्देषाच्या हेतुने त्यांनी माहिती नाकारली व अपिलार्थीच्या विरुध्द कायदेशीर मार्गदर्शन घेत असल्याचे धमकीवजा पत्र पाठवून त्यांचे मनोधर्य खचविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे या प्रकरणी दोषी असलेले जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई व्हावी व त्यांना रुपये २५००० /- दंडाची शिक्षा व्हावी, अशी त्यांनी आयोगास पुढे विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेच्या स्थापनेपासून ते अपिलार्थीने अर्ज करण्यापर्यंतच्या कालावधीतील, संस्थेशी संबंधित काही माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती. या अर्जामध्ये त्यांनी सोबत दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र जोडत असल्याचे म्हटले होते. तथापि अशा प्रकारचा कोणताही वैध पुरावा त्यांनी त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जास त्यांच्याकडील दिनांक २५-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अशा प्रकारे कोणत्याही शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०९-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात आयोगास सादर केला असून, त्यामध्ये असे म्हटले आहे की, अपिलार्थी श्री. मोरे हे विसंगत व तथ्यहीन मुद्दे त्यांच्याकडे उपस्थित करतात. ५०/५५ वर्षाची माहिती मागवितात व दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करतात मात्र पुरावा जोडत नाहीत. अर्ज हस्तपोच देतात परंतु उत्तर शीघ्र टपालाने मागवितात. एवढे असले तरी त्यांच्या महाविद्यालयाने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना शीघ्र व विनामूल्य पुरविली आहे.

-　　　　-

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला त्यावेळी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही पुरावा त्यांनी मूळ अर्जासोबत जोडला नव्हता. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेतली असता अपिलार्थीने त्यांच्या कौटुंबिक शिधापुरवठा पत्रिकेची झेरॉक्स प्रत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केली होती. तथापि सदर झेरॉक्स प्रतीवर कोणताही रंग उमटून न आल्याने तसेच ही झेरॉक्स प्रत सक्षम प्राधिकरणाने साक्षांकीत केली नसल्याने अपिलार्थीचा आयोगाकडे दाखल केलेला कथित पुरावा अवैध ठरत आहे. (ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा अवैध ठरत आहे) तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावर देखील वीस रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटविल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या लेखी युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. या सर्व बाबी एकत्रितणे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-०३-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विशाल अशोक मोरे, आहेर मास्तरांची चाळ, ५२ नं., मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मनमाड, तालुका नांदगाव जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मनमाड, तालुका नांदगाव जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५७८

निर्णय दिनांक २३-०३-२००९

१ श्री. देविदास भिकाजी पवार, अपिलार्थी

रा. चंद्रेश्वर नगर, योगेश्वर भुवन, जेलरोड दसक, नाशिक रोड - ४२२ १०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक विभाग, एन. डी. पटेल रोड, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा विभाग नियंत्रक, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, नाशिक विभाग, एन. डी. पटेल रोड, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्वजण गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या कथित व्दितीय अपील अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांना, राज्य परिवहन बस क्रमांक ९८३९ मधील दिनांक ११-०३-२००६ रोजी डिझेल संपल्यानंतर त्यांचे व्यवसायात सुमारे दोन लाख रुपये इतक्या झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत राज्य परिवहन विभागाकडे केलेल्या तक्रारीच्या संदर्भात सदर गाडीच्या चालकावर विभागाने कोणतीही कार्यवाही केली नाही व

- -

तसेच त्यांच्या आर्थिक नुकसानीची भरपाई दिली नाही असे नमूद करुन त्यांचा दावा मान्य करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने केलेला सदर अपील अर्ज राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११-१०-२००५ रोजीच्या क्रमांक आरटीआय २००५/सीआर-३०५/०५/५ या क्रमांकाच्या अधिसूचने-मध्ये विहित केलेल्या नमुन्यात केलेला नाही. मात्र अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या अपिलाची सुनावणी आयोगातर्फे घेण्यात येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे त्यांच्या प्रतिनिधी मार्फत पुढील तारीख देण्याची विनंती केली आहे, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी पुढे ढकलण्यासाठी त्यांचे पत्रामध्ये नमूद केलेले कारण आयोगास मान्य नसल्याने ही सुनावणी आजच घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " नाशिक विभाग सुरु झाल्यापासून ड्युटी चालू असतांना एस. टी. चे डिझेल संपले तर याला जबाबदार कोण ? जर डिझेल संपल्यावर चालक जबाबदार असेल तर आतापर्यंत आपल्या विभागात किती चालकाकडून असा प्रकार घडला आहे ? डेपो ? ता. ? चालकांचे नांवे व पत्ता व त्या चालकांना काय शिक्षा दिली आहे ? " ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०४-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या अपील अर्जावर सुनावणी झाली किंवा कसे हे आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. मात्र अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या वैयक्तीक गा-हाण्याच्या निपटा-याप्रीत्यर्थ वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. ही माहिती मागण्याचा अपिलार्थीस अधिनियमातील कलम ३ प्रमाणे हक्क आहे व अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे ही माहिती अपिलार्थीस पुरविणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. तथापि

- -

अपिलार्थी व मार्ग परिवहन विभाग नाशिक यांच्यामध्ये झालेल्या व आयोगाकडील उपलब्ध पत्रव्यहारावरुन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात मार्ग परिवहन विभागाने काहीही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीच्या दिनांक २८-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०४-२००७ रोजी सुनावणी घेतली किंवा कसे हे कळण्यास आयोगास मार्ग नाही. त्यामुळे अपिलार्थीने दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे, त्यांच्या या प्रकरणी, मार्ग परिवहन विभागामुळे झालेल्या नुकसानीसंदर्भात अपिलार्थीस असे अवगत करुन देण्यात येत आहे की, अशा प्रकारे कोणत्याही प्रकरणी वैयक्तीक नुकसान झाल्यास अशा नुकसानाची त्यांनी प्रथमतः सक्षम प्राधिकरणाकडे मागणी करणे गरजेचे आहे. राज्य माहिती आयोगास अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त न झाल्यास व त्यासंदर्भात अपिलार्थीचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई मंजूर करण्याचा अधिकार आहे. मात्र अपिलार्थीने त्यांच्या कथित व्दितीय अपील अर्जामध्ये संदर्भित केलेल्या प्रकरणामध्ये आदेश देण्याची अधिकारिता आयोगाला नसल्यामुळे अपिलार्थीच्या कथित व्दितीय अपील अर्जातील विनंती आयोगास मान्य करता येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

- -

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देविदास भिकाजी पवार, रा. चंद्रेश्वर नगर, योगेश्वर भुवन, जेलरोड दसक, नाशिक रोड - ४२२ १०१.

२ जन माहिती अधिकारी, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक विभाग, एन. डी. पटेल रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, नाशिक विभाग, एन. डी. पटेल रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५७९

निर्णय दिनांक २३-०३-२००९

१ श्री. विशाल अशोक मोरे, अपिलार्थी
आहेर मास्तरांची चाळ, ५२ नं., मनमाड,
तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप प्राचार्य, कला, विज्ञान आणि वाणिज्य
महाविद्यालय, मनमाड, तालुका नांदगाव
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा प्राचार्य, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
मनमाड, तालुका नांदगाव
जिल्हा नाशिक

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०७-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जावर अपिलार्थीने कोणताही दिनांक नमूद केलेला नाही.

- -

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देण्यात आली नाही. जाणुनबुजून दिरंगाई केली व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना प्रथम अपिलासंदर्भात कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयाशी संबंधीत सन २००६-२००७ या कालावधीतील काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे या मुद्दयासमोर त्यांचा कोणताही अभिप्राय दिलेला नाही. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सदर शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस उत्तर देऊन त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक त्या शुल्काचा भरणा डिमांड ड्राफ्टव्दारे करण्याचे अपिलार्थीस सूचित केले होते, तथापि अपिलार्थीने अशा प्रकारचा कोणत्याही शुल्काचा भरणा त्यांच्या महाविद्यालयात केला नाही. यासंदर्भात अपिलार्थीस त्यांनी स्मरणपत्र पाठवून देखील अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा त्यांच्या महाविद्यालयात केला नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कधीही नकार दिलेला नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीस, त्यांना वारंवार अशा प्रकारची विसंगत माहिती मागण्याची सवय असून उपलब्ध करुन दिलेली माहिती न स्वीकारणे,

दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख करुन पुरावा न जोडणे व माहिती न मिळण्याचा बाऊ करणे, या अपिलार्थीच्या नियमित सवयी आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) व्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडील दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना या प्रकरणी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १० इतके भरण्याचे सूचित केले होते. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये देखील ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्यासंदर्भात त्यांच्या कौटुंबिक शिधापत्रिकेची झ ेरॉक्स प्रत सादर केली आहे. तथापि या झेरॉक्स प्रतीवर शिधापत्रिकेचा मूळ रंग उमटला नसल्याने तो कथित पुरावा वैध असल्याचे व त्याव्दारे अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ति असल्याचे सिध्द होत नाही. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्यासंदर्भात आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला असून, तयार माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती तयार असल्याचे दिसून येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी प्रथमतः त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज अपूर्ण भरला. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे वारंवार कळवूनही सदर शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नाही अथवा ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही वैध पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला नाही. आज रोजी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार केल्यास अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

- -

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विशाल अशोक मोरे, आहेर मास्तरांची चाळ, ५२ नं., मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मनमाड, तालुका नांदगाव जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मनमाड, तालुका नांदगाव जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.८३/०८, ८४/०८, ८५/०८, ८६/०८ व ८७/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८३,८४,८५,८६ व ८७
निर्णय दिनांक २४-०३-२००९

१ श्री. राजू भुजंगराव तारे, : अपिलार्थी
मु.पो.बाळानगर, पाचोडरोड, अंबड,जि.जालना.

**विरुध्द**

१ **अपील क्र.८३/२००८**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे<br>(स्थानिक स्तर) उपविभाग घनसावंगी, जि.जालना | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे<br>(स्थानिक स्तर),विभाग जालना | :प्रतिवादी |

२ **अपील क्र.८४/२००८**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे<br>(स्थानिक स्तर) उपविभाग परतूर, जि.जालना | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे<br>(स्थानिक स्तर),विभाग जालना |

३ **अपील क्र.८५/२००८**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे<br>(स्थानिक स्तर) उपविभाग जालना,जि.जालना | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे<br>(स्थानिक स्तर),विभाग जालना |

४ **अपील क्र.८६/२००८**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे<br>(स्थानिक स्तर) उपविभाग अंबड,जि.जालना | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे<br>(स्थानिक स्तर),विभाग जालना |

५ **अपील क्र.८७/२००८**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे<br>(स्थानिक स्तर) उपविभाग घनसावंगी, जि.जालना | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे<br>(स्थानिक स्तर),विभाग जालना |

- -

## निर्णय

वरील पाच प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, अपील क्र. ८३/०८,८४/०८,८६/०८ व ८७/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी, अपील क्र.८५/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व पाचही प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०९.२००८ रोजी दाखल झालेली तीन स्वतंत्र द्वितीय अपिले (अपील क्र. ८३/०८, ८४/०८ व ८५/०८) व दि. ०५.०५.२००८ रोजी दाखल झालेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले (अपील क्र. ८६/०८ व ८७/०८) अशी एकूण पाच अपीले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या सर्व अपील अर्जांमध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना पुरविली नसल्याने व त्यामुळे त्यांनी केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांनुसार असे दिसून येते की, अपिलार्थीने अपील क्र. ८३/०८,८४/०८,८५/०८,८६/०८ व ८७/०८ च्या संदर्भात प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे दि. ९.५.२००८, १०.६.२००८, २३.५.२००८, २.२.२००८ व दि. २३.१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित कामकाजाची काही माहिती मागविली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरविल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे दि. १९.०६.२००८, १५.०७.२००८, ०१.७.२००८, ०३.०३.२००८ व दि. ०१.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले.

- -

तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील क्र. ८४/०८ व ८५/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने दि. २०.३.२००९ व दि. १७.३.२००९ रोजी अनुक्रमे राज्य माहिती आयोग व कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्था.स्त.),विभाग जालना यांना उद्देशून लिहिलेली दोन स्वतंत्र पत्रे आयोगास सादर केली असून अपिलार्थीने त्यामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक ती माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून दाखविण्यात आली. सदर माहिती त्यांनी व्यक्तिशः पाहिली व पाहिलेल्या माहितीवर त्यांचे पूर्णतः समाधान झाले असल्याने आता त्यांना माहितीची आवश्यकता नाही, म्हणून त्यांची विचाराधीन अपिले निकाली काढण्यात यावीत.

खूद्द अपिलार्थीने अशाप्रकारे त्यांची आयोगाकडील विचाराधीन अपिलासंदर्भात ती निकाली काढण्याची आयोगास विनंती केल्यामुळे उपरोक्त विचाराधीन अपील अर्जांपैकी अपील क्र. ८४/०८ व ८५/०८ खारीज करण्यात येत आहेत.

उर्वरित अपील क्र. ८३/०८, ८६/०८ व ८७/०८ च्या संदर्भात अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची एक अतिरिक्त संधी देण्याच्या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे दि.१९.६.२००८, ०३.०३.२००८ व ०१.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले अंतिम निर्णय पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

- -

## आदेश

१) अपील क्र. ८३/०८ निकाली काढण्यात येत आहे.

२) अपील क्र. ८४/०८ व ८५/०८ खारीज करण्यात येत आहेत.

३) अपील क्र. ८६/०८ व ८७/०८ निकाली काढण्यात येत आहेत.

४) जन अपिलीय अधिकारी यांनी अपील क्र. ८३/०८, ८६/०८ व ८७/०८ च्या संदर्भात अपिलार्थी यांच्या अनुक्रमे दि.१९.६.२००८, ०३.०३.२००८ व ०१.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजू भुजंगराव तारे, मु.पो.बाळानगर पाचोड रोड, अंबड, जि. जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर) उपविभाग घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर) उपविभाग परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर) उपविभाग जालना, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर) उपविभाग अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५८०
निर्णय दिनांक २४-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.पवनकुमार दौलतराम बुंदेले,<br>रा. भुसावळ, जि.जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्याधिकारी,<br>नगरपरिषद, भुसावळ, जि.जळगांव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग,<br>नाशिक | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, तत्कालीन व विद्यमान जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १६.१०.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपिलामध्ये अपिलार्थीने, त्यांचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी अमान्य केले असल्यामुळे, केल्याचे म्हटले असून, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची मागणी या अर्जामध्येही कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. २९.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

- -

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील खानदेश पॅकेज निधी संबंधीची सन २००५ ते २००७ या कालावधीतील माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती टपालाद्वारे मागितली असून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "खानदेश पॅकेजची नगरपालिकेला मिळालेली रक्कम व दिनांक, या निधीअंतर्गत केलेल्या कामाची नावे, मक्तेदाराचे नाव, वर्कऑर्डरची सत्यप्रत, मक्तेदारास ॲडव्हान्स दिला आहे काय, किती ॲडव्हान्स व कधी दिला, मक्तेदारास कामाचे पोटी ॲडव्हान्स देण्याची तरतुद आहे काय, मक्तेदाराने किती काम केलेले आहे, ॲडव्हान्स देणाऱ्या अधिकारी व पदाधिकाऱ्याचे नाव"- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ११.०९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.१०.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात दि. ३१.८.२००७ रोजी दिलेल्या माहितीमध्ये मक्तेदाराला कामाच्या प्रती, ॲडव्हान्स देण्याची तरतुद महाराष्ट्र नगर परिषद अकाउंट कोड १९७१ प्रमाणे असल्याचे म्हटले आहे. मात्र त्यांनी अशाच प्रकारच्या माहितीसाठीचा दुसरा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला असता, त्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अशाप्रकारची तरतुद नसल्याचे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या अशाप्रकारच्या विसंगतीपूर्ण माहितीमुळे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे शिक्षा व्हावी व त्यांना सत्य माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त व्हावी.

-　　-

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस त्यांनी दोन वेळा वेगवेगळी माहिती दिल्याचे मान्य केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिलेल्या दि. ३१.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात, "महाराष्ट्र नगरपरिषद अकाऊंट कोड १९७१" प्रमाणे हे शब्द त्यांनी माहितीमध्ये घालावयास नको होते, तथापि नजरचुकीमुळे हे शब्द या माहितीमध्ये घातले गेले आहेत. नगरपरिषदेमध्ये मक्तेदारास त्यांची बीले देताना राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पध्दतीचे सर्वसाधारणपणे पूर्वीपासून पालन केले जाते. मक्तेदाराला कामापोटी ॲडव्हान्स देण्याची तरतुद सार्वजनिक बांधकाम लेखा संहितेमध्ये असल्यामुळे, नगरपरिषदेने देखील अशाप्रकारची अगाऊ रक्कम त्यांनी कंत्राटदारास, त्यांनी जागेवर माल मिळाल्यापृष्ठयर्थ अदा केली होती.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद  व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, याप्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रथम प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विसंगत असल्याचे सिध्द होत आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीवरुन महाराष्ट्र नगरपरिषद कोड १९७१ मधील प्रकरण क्र. ११ मधील मुद्दा क्र.१८५ प्रमाणे नगरपरिषदेने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखा संहितेमध्ये विहित केलेल्या पध्दतीचे पालन केले असल्याने या प्रकरणी संबंधित मक्तेदाराला ॲडव्हान्स दिला गेला आहे व तसेच ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत दिली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद, भुसावळ यांनी म्हटल्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात माहिती देताना, महाराष्ट्र नगरपरिषद अकाऊंट कोड १९७१ हा संदर्भ त्यांच्याकडून अपिलार्थीस देणे हे याप्रकरणी अनावश्यक होते, अशाप्रकारे अनावश्यक व अतिरिक्त संदर्भ देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती विसंगत ठरली. या कृतीमुळे जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी

यांना आता असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संदर्भिय मक्तेदाराला ज्या तरतुदीअन्वये आगाऊ रकमेचे प्रदान केले होते, त्या तरतुदीची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३१.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली विसंगत माहिती ही हेतूतः देवून व अपिलार्थीची दिशाभूल करण्याच्या दुष्ट हेतूने दिली असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे आयोग आदेश देत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणाही अर्जदारास माहिती देताना ती अधिक सतर्कतेने द्यावी, अशा सूचना त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. ४ शी संबंधित संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामुल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २४-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पवनकुमार दौलतराम बुंदले, मामाजी टॉकीज रोड, दामु कुंभार वाडयासमोर,

- -

भुसावळ, जि.जळगाव.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, भुसावळ, जि.जळगाव. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५८१
निर्णय दिनांक २४-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दत्तात्रेय सोमनाथ रत्नाकर,<br>मु.पो.डुबेरे,ता.सिन्नर जि.नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालयीन अधीक्षक,<br>ग्रामपंचायत विभाग,जिल्हा परिषद,<br>नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा<br>परिषद,नाशिक | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०४.१०.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती पुरविली. जन अपिलीय अधिकारी यांनी ४५ दिवसांच्या आत त्यांच्या अपिलावर निर्णय दिला नाही, त्यामुळे संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर आयोगाच्या

स्तरावर कारवाई करावी व संबंधितांना बडतर्फ करण्याचे आयोगाने आदेश काढावेत तसेच या प्रकरणात झालेल्या त्यांच्या खर्चाबाबत व मनस्तापाबाबत त्यांना नुकसानभरपाई मिळावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३.१.२००७ रोजीच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"दि. ६.२.२००७ चे आपल्या पत्रा प्रमाणे मी आपणास रु.२२/- ची म ऑ क्र. 1535 आपणास मिळाली तरी मला अदयाप माहिती आपण दिली नाही ती माहीती आपल्या सही शिक्क्यानिशी मिळावी."

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून आले आहे की, अपिलार्थीने माहिती मिळविण्यासाठी, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित नमुन्यानुसार मुद्दा क्र. ४ व ५ च्या समोर नमूद करावयाचा तपशील अपिलार्थीने निरंक ठेवलेला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या अर्जासंदर्भात कळविले. तथापि अपिलार्थीचे या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.०७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.१०.२००७, ०७.११.२००७, २९.११.२००७, १०.१२.२००७, २१.१.२००८ व ०८.०२.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि दि. २१.०१.२००८ वगळता अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी गैरहजर राहिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज कोणताही निर्णय न देता निकाली काढला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

- -

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असून त्यांनी आपले म्हणणे आयोगाकडे लेखी युक्तिवादाद्वारे सादर केले असून यामध्ये त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील त्यांचे म्हणणे कायम असल्याचे नमूद केले आहे. तसेच अपिलार्थीने त्यांच्या या युक्तिवादाबरोबर जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २३.१.२००८ रोजीचा रोजनामा आयोगास सादर केला असून त्याची तपासणी करता अपिलार्थीने त्यांच्या लेखी युक्तिवादाबरोबर आयोगास पाठविलेली सहपत्रे विचाराधीन अपिलाशी संबंधित नसल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दि. ६.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भातील माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविली आहे. अपिलार्थीने विचाराधीन अपील प्रकरणाशी संबंधित असलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्याकडे अपिलार्थीने पूर्वी वेगळया संदर्भात त्यांच्याकडे केलेल्या अर्जातील माहितीशी संबंधित अर्ज केला होता.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद  व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, याप्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने त्यांच्या दि. ९.५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'माहिती' चा विषय होऊ शकत नाही. अपिलार्थीचा हा अर्ज म्हणजे अपिलार्थीने त्यांच्या दि. २३.१.२००७ रोजी केलेल्या अर्जाप्रमाणे त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळावी अशा अर्थाची विनंती केलेला अर्ज आहे. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी या प्रकरणी अधिनियमातील तरतुदीनुसार केलेली नाही. एवढे जरी असले तरी अपिलार्थीस माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २३.१.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना दि. ६.२.२००७ रोजी प्रथमतः पुरविली आहे व त्यानंतर विचाराधीन अर्जाच्या संदर्भात हीच माहिती अपिलार्थीस दि. ६.६.२००७ रोजी पुरविली आहे. प्राप्त माहितीच्या

-                -

दर्जासंदर्भात अपिलार्थीने ही माहिती चुकीची असल्याचे आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे, मात्र ही माहिती चुकीची कशी आहे, हे अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्जामध्ये सिध्द केलेले नाही. मात्र अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ७.७.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सुनावणी न घेता कोणताही निर्णय दिला नाही, ही बाब या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. दि. २१.१.२००८ रोजी अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी हजर राहिले असताना, तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी होऊनही, त्यावर निर्णय का झाला नाही, असे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे अपिलार्थी ज्या-ज्या वेळी उपस्थित होते, त्या-त्या वेळी फक्त रोजनाम्यावर सही झाल्यावर कामाची सबब सांगून पुढील तारीख द्या, अशी विनंती करुन सुनावणीतून निघून गेले आहेत. येथे जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अपील अर्जावर त्यांनी अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना बोलावून, दोन्ही बाजूंना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी देऊन, त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर आपला निर्णय स्वतंत्रपणे देणे अभिप्रेत आहे, जर अशी संधी देऊनही अपिलार्थीने त्यांचे म्हणणे मांडले नाही, अथवा ते सुनावणीस गैरहजर राहिले तरीही त्यांच्या गैरहजेरीतही या अपिलावर निर्णय घेण्यास हरकत नाही.

विचाराधीन अपिलामध्ये अपिलार्थीने त्यांना झालेल्या खर्चाबाबत व मनस्तापाबद्दल आयोगाकडे नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे, यासंदर्भातील कोणतीही कागदपत्रे अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जासोबत अथवा आज रोजीच्या लेखी युक्तिवादासोबत जोडले नसल्याने अपिलार्थीचा हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दि. ९.५.२००७ रोजीच्या अर्जामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट

-                                    -

केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतः विसंगत असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रेय सोमनाथ रत्नाकर, मु.पो.डुबेरे, ता.सिन्नर, जि.नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, ग्राम पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५८२
निर्णय दिनांक २४-०३-२००९

१ श्री. अन्सारी मो. गुफरान मो.युसूफ, : अपिलार्थी
मालेगाव, जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सचिव,
नाशिक जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा
मुख्याध्यापक संघ, नाशिक
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
नाशिक जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा
मुख्याध्यापक संघ, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २४.९.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्रथम अपिलाची माहिती मिळाली नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २१.८.२००७ रोजी एक मोघम पत्र दिले, या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी या अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये सचिव, नाशिक जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, नाशिक यांना त्यांच्या संघटनेच्या संदर्भात एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. या माहितीमध्ये - संस्थेच्या आजीव सभासदांची पत्त्यांसह यादी, सध्या कार्यरत असलेल्या कार्यकारिणी मंडळाची पत्त्यासह यादी व सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या कार्यकारिणीच्या नोंदीची (शेडयूल-१ ची कॉपी) - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास संघटनेचे कार्यवाह यांनी दि. ०९.०७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम मुख्याध्यापक संघाला लागू होत नसल्याने, देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. १३.७.२००७ रोजी संबंधित संस्थेच्या अध्यक्षांकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जास संस्थेचे कार्यवाह यांनी त्यांच्याकडील दि. २१.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती संस्थेच्या कार्यालयात योग्य ती फी भरुन प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, याप्रकरणी असे दिसून येते की, मुख्याध्यापकांच्या संघटनेचा, ते माहिती अधिकार अधिनियमातील कक्षेबाहेर असल्याचा युक्तिवाद, आयोग मान्य करीत नाही, कारण नाशिक जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची सहायक धर्मादाय आयुक्त, नाशिक यांच्याकडे बॉम्बे पब्लिक ट्रस्ट नोंदणी अधिनियमाद्वारे क्रमांक एफ-५८६९ ने

- -

नोंदणी झालेली आहे. अधिनियमातील कलम २ (च) मध्ये माहिती या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता, त्यामध्ये -

" 'माहिती' याचा अर्थ ------------------- त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो." अशी तरतूद असल्याचे दिसून येते.

ही तरतुद पाहता व संदर्भिय मुख्याध्यापक संघटनेकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, धर्मादाय आयुक्त या सार्वजनिक प्राधिकरणास उपलब्ध होऊ शकत असल्याने, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची ठरते व अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या स्वरुपामध्ये ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे संबंधित संघास अपिलार्थीस देणे भाग पडते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन महिती व अपिलीय अधिकारी यांना ही तरतुद समजावून सांगितली असता त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली काही माहिती त्यांना आयोगासमोर उपलब्ध करुन दिली व उर्वरित माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आश्वासित केले. अपिलार्थीस हे मान्य झाले.

सबब सचिव, नाशिक जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामुल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अन्सारी मो. गुफरान मो. युसूफ, मुख्याध्यापक टी.एम.हायस्कूल, मालेगाव, सर्वे नं. ५७, नया ईस्लामपूरा, मालेगाव ता. मालेगाव, जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, नाशिक जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, नाशिक जिल्हा माध्यमिक व उच्च मान्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५८३
निर्णय दिनांक २४-०३-२००९

१ श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड, : अपिलार्थी
३, संतोषी कृपा, आडगाव नाका, पंचवटी, नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
संत जनार्दन स्वामी माध्यमिक विद्यामंदिर,
हिंगणवेढे,ता. जि.नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
व्ही.एन.नाईक, शिक्षण प्रसारक संस्था,नाशिक

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २९.९.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः स्वीकारण्यास नकार दिला, त्यामुळे त्यांनी त्यांचा अपील अर्ज रजिस्टर्ड पोस्टाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविला असता, त्या अर्जाचा

स्वीकार देखील जन अपिलीय अधिकारी यांनी केला नसल्याने, त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील शिक्षकांनी सिरोंचा येथे भेट दिल्याचे दाखवून केलेल्या रु. २४,७२१/- इतक्या रकमेच्या कथित भ्रष्टाचाराबाबत एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये " शिक्षकांची नावे, पद, प्रवासाचा कालावधी, त्यांना मिळालेल्या रकमा, शिक्षकांनी ज्या कालावधीत अनुदान प्राप्त केले होते, त्या कालावधीतील मुख्याध्यापकाची नावे, मुख्याध्यापक यांनी शिक्षणाधिकारी (पे युनिट) यांना सादर केलेल्या अर्जाची छायाप्रत, शिक्षकांनी रजा प्रवास सवलत मिळावी म्हणून केलेल्या मूळ अर्जाच्या छायाप्रती व प्रवास सवलत मिळण्याकरिता शिक्षकांनी सादर केलेल्या पुराव्यांच्या प्रती", या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०९.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांचा अर्ज "सखोल उल्लेख नसल्याने व सदोष असल्याने व चुकीच्या पध्दतीने केला असल्याने" माहिती देण्याचे नाकारले. यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, व्ही.एन.नाईक, शिक्षण प्रसारक संस्था, यांच्याकडे दि.  २२.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः प्रत्यक्ष व त्यानंतर टपालाद्वारे देखील स्वीकारण्यास नकार दिला. अशा सर्व नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, संत जनार्दन स्वामी माध्यमिक विद्यालय, हिंगणवेढे, ता.जि.नाशिक येथील काही शिक्षकांनी महाराष्ट्र राज्याचा नकाशा पाहून सर्वात जास्त अंतरावर असलेले गडचिरोली जिल्हयातील भामरागड व सिरोंचा हे गाव शोधून काढले व लांबच्या प्रवासापोटी मिळणाऱ्या जास्त रकमेमध्ये त्यांनी प्रवास केल्याचे

-　　　　-

कागदोपत्री दाखविले व अंदाजे रु.२४,७२१/- इतक्या रकमेचे अनुदान खोटी कागदपत्रे सादर करुन हडप केले. या प्रकरणी संबंधित शिक्षकांवर कारवाई होण्यासंदर्भात त्यांना विचाराधीन अर्जातील माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही विशिष्ट अशा स्वरुपात केली नसल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले, तथापि आता ते अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, याप्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २१.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने तसेच मुख्याध्यापक, संत जनार्दन स्वामी माध्यमिक विद्यालय,हिंगणवेढे, ता.जि.नाशिक हे एका सार्वजनिक प्राधिकरणाचे नेमले गेलेले जन माहिती अधिकारी असल्याने, त्यांना अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) नुसार माहिती देण्यासाठी, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक प्रतिसाद देणे, भाग होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीस माहिती नाकारताना त्यांनी त्यांच्याकडील दि. २०.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये उल्लेख केलेली रक्कम रु. २४,७२१/- या रकमेबाबत खुलासा होत नाही, शासनाच्या किंवा न्यायालयीन चौकशीत आतापर्यंत भ्रष्टाचार झाला, अशाप्रकारची कोणतीही चौकशी झाली नाही, त्यामुळे अर्जातील बाब ही बेकायदेशीर असून शाळेबाबत बदनामीकारक व अपिलार्थीच्या अर्जानुसार सखोल उल्लेख नसल्याने व सदोष असल्याने व चुकीच्या पध्दतीने केला असल्याने त्यांचा माहितीसाठीचा अर्ज निकाली काढल्याचे अपिलार्थीस कळविण्यात आले. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारताना दिलेली ही कारणे अयोग्य व तथ्यहीन आहेत, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज

विहित नमून्यात केला आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांना मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतूदीनुसार त्यांना देय आहे. जरी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील रक्कम रु.२४,७२१/- याबाबत काही वाद असला तरी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीमध्ये अशाप्रकारच्या कोणत्याही रकमेचा उल्लेख नाही. या रकमेचा भ्रष्टाचार केला गेला आहे, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे व त्या अनुषंगाने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सुसंगत अशी माहिती मागितली आहे. जी माहिती अधिकार अधिनियमानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे भाग आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादावरुन असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे दुष्ट हेतूने टाळले आहे, त्यामुळे या प्रकरणी असे सिध्द होत आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. मात्र उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन मुख्याध्यापक ज्यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली ते आता नियतवयोमानानुसार ३ महिन्यापूर्वी सेवानिवृत्त झाले असल्याचे आयोगास अवगत केल्याने, त्यांच्यावर कारवाईचे आदेश आयोग देत नाही. या प्रकरणी पुढे असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दि. २२.९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाचा संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी मूळात कोणत्याही प्रकारे स्वीकार केला नाही. अपिलार्थीच्या अर्जाशी संबंधित व्ही.एन.नाईक शिक्षण प्रसारक मंडळ, या संस्थेचे वर्तन निश्चित संशयास्पद व आक्षेपार्ह असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब शिक्षणाधिकारी, माध्यमिक, जिल्हा परिषद, नाशिक यांना व्ही.एन.नाईक शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक यांच्यावर त्यांनी, या प्रकरणी अपिलार्थीने या संस्थेकडे केलेल्या विषयाधीन अपिलाशी संबंधित आरोपामध्ये काही तथ्य आढळले तर, त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे कठोर कारवाई करण्याची शिफारस आयोग करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

- -

# आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या

कृ.मा.प.५...

आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड, ३, संतोषी कृपा, आडगाव नाका, पंचवटी, नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,संत जनार्दन स्वामी माध्यमिक विद्यालय,हिंगणवेढे,ता.जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष,व्ही.एन.नाईक, शिक्षण प्रसारक संस्था,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५८४
निर्णय दिनांक २४-०३-२००९

१ श्री. राजेंद्र खंडेराव सोनवणे, : अपिलार्थी
रा. कापडणे, ता.जि.धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापिका ,
आदर्श कन्या हायस्कूल, कापडणे,
ता.जि.धुळे.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
नवजीवन विद्या विकास मंडळ,
नगाव ता.जि.धुळे.

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, धुळे.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०६.१०.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या दि. १८.७.२००७ रोजीच्या पत्रावर जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, नवजीवन विद्या विकास संस्था, नगाव ता.जि.धुळे यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांच्या अपील अर्जावर

- -

संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेतल्याने अथवा यासंदर्भातील त्यांच्या अपील अर्जासंदर्भात कोणतेही उत्तर न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता सदर माहिती उपलब्ध नसल्याचे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १८.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार संबंधित शिक्षण संस्थेच्या सचिवांकडे दि. २६.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीने अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविला, तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित संस्थेच्या सचिवांनी कोणताही निर्णय दिला नाही. आज रोजी संस्थेच्या सचिवांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाला नाही, मात्र अपिलाथीने उपलब्ध करुन दिलेल्या पोस्टाच्या पावतीवरुन अपिलार्थीचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाले आहे, असे अनुमान काढण्यात येऊन जन अपिलीय अधिकारी यांचा अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाला नसल्याचा युक्तिवाद, आयोग फेटाळून लावत आहे.

आता शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक:संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांची अशा प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे हे पाहता, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.धुळे यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले अंतिम निर्णय पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

-　　　　　　　　　　-

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.धुळे यांनी अपिलार्थी यांच्या दि.२६.७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झ ाालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र खंडेराव सोनवणे, उपशिक्षक, आदर्श कन्या हायस्कूल, कापडणे, ता.जि.धुळे

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका ,आदर्श कन्या हायस्कूल, कापडणे, ता.जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५५१

निर्णय दिनांक २५-०३-२००९

१ श्री. भिकाजी सावळीराम गायकवाड, : अपिलार्थी
'मानस', गट क्रमांक ५००, प्लॉट क्रमांक २६, अशोकनगर,
सातपूर, नाशिक - ४२२ ०१२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांची जिल्हा शिक्षण मंडळाकडील सेवा, सेवानिवृत्तीसाठी आणि त्या अनुषंगाने त्यांना मिळणा-या वेतन निश्चितीबाबत, ग्राह्य धरण्याची विनंती केली आहे व आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे

वरील परिच्छेदात नमूद केलेल्या त्यांच्या वैयक्तीक गा-हाण्याविषयी एकूण दोन मुद्दयांवर सर्वसाधारण टपालाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले असता अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदरचे अपील राज्य माहिती आयुक्त यांचेकडे करण्याचे सूचित केले.

उपलब्ध कागदपत्रांवरुन या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापही प्रथम सुनावणी झाली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणीच्या स्वरुपावरुन व व्याप्तीवरुन या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब असे आदेशित करण्यात येते की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी अथवा यासंदर्भातील नेमले गेलेले जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ४५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक अथवा या प्रकरणाशी संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश

निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ४५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भिकाजी सावळीराम गायकवाड, 'मानस', गट क्रमांक ५००, प्लॉट क्रमांक २६, अशोकनगर, सातपूर, नाशिक - ४२२ ०१२.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५५२

निर्णय दिनांक २५-०३-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. हेमंत शंकरराव कवडे,<br>"जय योगेश्वर" वागदर्डि रोड, शिवाजीनगर नं. २, मनमाड,<br>तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>जिल्हा परिषद, नाशिक | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, नाशिक | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | कक्ष अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, नाशिक |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, नाशिक |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, तत्कालीन व सध्याचे जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेल्या माहितीसंदर्भात बेजबाबदारपणे उत्तरे देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती दडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे अपिलार्थीस आवश्यक

- -

असलेल्या माहितीच्या फी बाबत न कळवून अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केलेला आहे. जन अपिलीय अधिकारी कोण आहेत याची त्यांना माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पूर्ण माहिती न दिल्याने सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करावी व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत, नाशिक जिल्हा परिषदेमध्ये एप्रिल - मे, २००६ च्या अधिनियमानुसार बदलीपात्र कर्मचा-यांची सेवाजेष्ठतेनुसार यादी व नागरिकांची सनद या दोन मुद्दयावरील माहिती मागविली होती. अपिलार्थीने सदर अर्ज जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नाशिक जिल्हा परिषदेमधील वेगवेगळ्या विभागाशी संबंधीत असल्याने त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या प्रती दिनांक ०४-०२-२००७ रोजी सर्व संबंधित खातेप्रमुखांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव पाठविल्या व पुर्तता अहवाल त्यांच्या कार्यालयास मागविला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अपिलार्थीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे केले. तथापि तदनंतर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या ऐवजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, नाशिक यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०४-०५-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जिल्हा परिषदेच्या सर्व माहिती अधिका-यांकडून त्यांना आतापर्यंत मिळालेली माहिती अपूर्ण आहे. त्यांना प्राप्त झालेली अपूर्ण माहिती देखील विलंबाने प्राप्त झाली असल्याने त्यांच्यावर अधिनियामतील कलम २० प्रमाणे कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये २००७ च्या एप्रिल व मे च्या दरम्यान त्यांच्या विभागात बदलीपात्र कर्मचा-यांची यादी मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जानेवारी २००७ च्या अखेरीस मागितली होती. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार नसल्याने अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीसंदर्भात त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या

दिनांक ०४-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले. शासनाच्या आदेशाप्रमाणे प्रत्येक जिल्हा परिषदेच्या बदलीपात्र कर्मचा-यांची यादी ३१ डिसेंबर अखेरीस प्रसिध्द करणे अभिप्रेत आहे. तथापि या वर्षी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार नव्हती. ही माहिती ग्रामपंचायत, तालुका आणि जिल्हा पातळीवर गोळा करुन संकलीत करावयाची असल्यामुळे शासनाच्या आदेशामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे विहित मुदतीत ही माहिती त्यांच्याकडून अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त होण्याच्या सुमारास संकलीत केली गेली नव्हती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एप्रिल २००७ मध्ये तयार झाली आणि ही यादी अपिलार्थीस ०४ मे २००७ रोजी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस दिली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जानेवारी २००७ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे एप्रिल व मे च्या दरम्यान बदलीपात्र असलेल्या कर्मचा-यांची माहिती मागितली होती. शासनाच्या आदेशाप्रमाणे सर्वसाधारण परिस्थितीत अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे डिसेंबर अखेरीस किंवा जानेवारीच्या सुरुवातीस उपलब्ध असणे गरजेचे होते परंतु या प्रकरणी तसे घडले नाही. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४-०५-२००७ रोजी दिली असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. मात्र अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जिल्हा परिषदेमध्ये १५ विभाग असून त्यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी केवळ सामान्य प्रशासन विभागाची माहिती प्राप्त झाली. उर्वरित विभागांची माहिती प्राप्त झाली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जिल्हा परिषदेकडील सर्व विभागांची माहिती मागवली होती, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे हे पाहता अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येते की, विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती सर्व संबंधित विभागाकडून प्राप्त करुन घेऊन त्यांनी ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी सर्व विभागांचा समन्वय साधावा. तसेच या प्रकरणी अपिलार्थीस अपूर्ण व विलंबाने माहिती देण्यासाठी सर्व संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक, ज्यांना अधिनियामतील कलम ५ (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, या सर्वांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना शिफारस करण्यात येत आहे.

- -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती सर्व संबंधित विभागाकडून प्राप्त करुन घेऊन त्यांनी ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना, संबधीत जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमंत शंकरराव कवडे, "जय योगेश्वर" वागदर्डि रोड, शिवाजीनगर नं. २, मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

- -

६ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५५३

निर्णय दिनांक २५-०३-२००९

१ श्री. विभोर दिलीप बारला, अपिलार्थी

१५, मुक्ती, ९, समर्थनगर, नाशिक - ४२२ ००५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास

महामंडळ, सातपूर, नाशिक - ४२२ ००७

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, उद्योग सारथी, मरोळ

औद्योगिक वसाहत, महाकाली गुफा मार्ग, अंधेरी (पूर्व),

मुंबई - ४०० ०९३

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : क्षेत्र व्यवस्थापक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सातपूर, नाशिक - ४२२ ००७

जन अपिलीय अधिकारी : प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सातपूर, नाशिक - ४२२ ००७

त्रयस्थ पक्ष : १ नाशिक इंडस्ट्रियल को. ऑ. इस्टेट, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

- -

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०२-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अशी विनंती केली आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय मान्य नसल्याने त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी व संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कारवाई करण्याचे आदेश व्हावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने नाशिक औद्योगिक सहकारी वसाहत त्र्यंबक रोड, सातपूर यांना लीजने दिलेल्या भूखंडाविषयी एकूण तेरा मुद्दयावर माहिती मागविली होती. सदर माहितीचा कालावधी औद्योगिक सहकारी वसाहत स्थापन झाल्यापासून ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंतचा असा होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०५-२००७ रोजी निर्णय देऊन दिनांक २३-०५-२००७ रोजी सदर निर्णय निर्गमित केला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०५-२००७ रोजी सुनावणीसाठी बोलाविले परंतु कार्यबाहुल्यामुळे सदरील सुनावणीसाठी अपिलार्थीस दिनांक २१-०५-२००७ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहण्यास कळविले असता अपिलार्थी सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत किंवा त्यांनी त्यांच्या अनुपस्थितीबाबत जन अपिलीय अधिकारी यांना काहीही कळविले नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला. अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावर आपले म्हणणे मांडण्याची पुन्हा एकदा संधी देण्याच्या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०५-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. या सुनावणीची नोटीस अपिलार्थीस किमान दहा दिवस अगोदर प्राप्त

- -

होईल अशी खात्री जन अपिलीय अधिकारी यांनी करावी. जन अपिलीय अधिकारी यांचा सदर सुनावणीतील निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, त्यांना सदर निर्णय प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०५-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विभोर दिलीप बारला, १५, मुक्ती, ९, समर्थनगर, नाशिक - ४२२ ००५.

२ जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र व्यवस्थापक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सातपूर, नाशिक - ४२२ ००७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सातपूर, नाशिक - ४२२ ००७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५५४ व २५५५

निर्णय दिनांक २५-०३-२००९

१ श्री. गुलाम इद्रीस अब्दुल खालीक, : अपिलार्थी
व्दारा : तकी हसन (सुंदर मालेगांवी) सर्व्हे नं. १०७, प्लॉट नं. १६-१७, हुसैनाबाद, कॉलनी, मोहल्ला गुलशने मालीक, मालेगांव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा लेखापाल, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा लेखापरिक्षक, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक

त्रयस्थ पक्ष : १ मयत श्रीमती बिसमिल्ला बेग यांचे वारस

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २५-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०६-२००७ रोजी दाखल केलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले क्रमांक २५५४/२००७ व २५५५/२००७ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीने त्यांचे दिनांक २५-०३-२००९ रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलिले लेखी म्हणणे आयोगास सादर केले असून त्यामध्ये, अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याने आता माहितीची

- -

आवश्यकता नाही व त्यामुळे विचाराधीन अपील क्रमांक २५५४/२००७ व २५५५/२००७ ही रद्द करुन खारीज करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगाकडे केलेली दोन स्वतंत्र अपिले दोन वेगवेगळ्या अर्जादारे खुद्द अपिलार्थीनेच रद्द करण्याची आयोगास विनंती केली असल्याने अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले, क्रमांक २५५४/२००७ व २५५५/२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील क्रमांक २५५४/२००७, दिनांक २८-०६-२००७ व अपील क्रमांक २५५५/२००७, दिनांक २८-०६-२००७ खारीज करण्यात येत आहेत.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गुलाम इद्रीस अब्दुल खालीक, व्दारा : तकी हसन (सुंदर मालेगांवी) सर्व्हे नं. १०७, प्लॉट नं. १६-१७, हुसैनाबाद, कॉलनी, मोहल्ला गुलशने मालीक, मालेगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा लेखापरिक्षक, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५५६

निर्णय दिनांक २५-०३-२००९

१ श्री. संतोष मांगू चौधरी, अपिलार्थी

एन-३२/एन-७/२१/६, उमाग्रज निवास, स्वामी विवेकानंदनगर, सिडको,

सिडको नं. ३, नाशिक - ४२२ ००९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा वरिष्ठ लिपीक,

शिक्षण मंडळ, महानगरपालिका मालेगांव, मालेगांव,

जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा प्रशासन अधिकारी,

शिक्षण मंडळ, महानगरपालिका मालेगांव, मालेगांव,

जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २४-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले असता या

- -

अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापपर्यंत कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी जन माहिती अधिका-यास दिनांक ०६-०९-२००४, १७-११-२००४, १०-०१-२००५ व ०९-०५-२००५ रोजी केलेल्या अर्जावर झालेल्या कारवाईबाबत व कारवाई झाली नसेल तर कारवाई न करण्याची कारणे व कारणांची सविस्तर माहिती, अशी माहिती विचारली होती. अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्यावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांना अद्यापपावेतो त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास व प्रथम अपील अर्जास अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही उत्तर प्राप्त झाले नसल्याचे आयोगास सांगितले व तसेच त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास पुढे अवगत केले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे कबूल केले. तथापि याचबरोबर अपिलार्थीने अर्ज करतेवेळी श्री. एकलाख अहमद नावाचे जन माहिती अधिकारी कार्यरत असल्याचे व संबंधीत जन माहिती अधिकारी यांची आता दुस-या शाखेत बदली झाल्याचे सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने दिनांक ३०-०४-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न देण्याची कारणे आयोगास सांगतांना, आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने यासंदर्भात केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या वेळी ते या पदावर कार्यरत नव्हते व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

-                -

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मालेगांव महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या प्रशासनाच्या गलथान व बेजबाबदारपणामुळे अपिलार्थीस हे अपील करणे भाग पडले आहे, अशी आयोगास खात्री झाली आहे. अपिलार्थीच्या दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीप्रमाणे प्रतिसाद देण्याचे साध्ये सौजन्यही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने अर्ज करुन, आज रोजी सुनावणीपर्यंत दोन वर्षे पूर्ण होऊनही त्यांना काहीही उत्तर न देणे, ही बाब महानगरपालिकेस निश्चितपणे अशोभनीय आहे, असे येथे म्हटल्यास वावगे ठरु नये.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलार्थीस मूळ अर्जातील त्यांनी संदर्भित केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही एवढीच माहिती अपिलार्थीस, या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने देय ठरत आहे. मात्र ' कारवाई झाली नसेल तर कारवाई न करण्याची कारणे आणि त्या कारणांची सविस्तर माहिती ' या अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दयांची जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही, कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कोणत्याही कृतीबाबत अथवा निर्णयाबाबत कारणे मागविणे अनुज्ञेय नसल्याचे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) चे अवलोकन करता दिसून येईल. मात्र अपिलार्थीने मागणी केलेल्या या अर्जातील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कारवाई ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीस आता ही माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या तक्रार अर्जांवर त्यांच्या कार्यालयाने याविषयासंदर्भात सर्व संबंधीतांशी त्यांनी केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती, या अर्जासंदर्भात त्यांच्या कार्यालयाने काढलेल्या टिपण्या व त्यावरील सर्व संबंधितांचे अभिप्राय या कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाकडे संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक यांनी केलेले दुर्लक्ष आयोगास

- -

दुर्लक्षित करता येण्यासारखे नाही. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देण्याच्या त्यांच्या कृतीव्दारे स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास नि:संशयपणे पात्र ठरविले आहे. सबब जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांना असे आदेशित करण्यात येते की, यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. या मुदतीत संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांच्या सहायकांचा खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याचे व याव्दारे माहिती देण्यासाठी दुष्ट हेतुने टाळाटाळ केल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. एकलाख अहमद) व त्यांचे या प्रकरणाशी संबंधीत सहायक यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

- -

१ श्री. संतोष मांगू चौधरी, एन-३२/एन-७/२१/६, उमाग्रज निवास, स्वामी विवेकानंद नगर, सिडको, सिडको नं. ३, नाशिक - ४२२ ००९.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, शिक्षण मंडळ, महानगरपालिका मालेगांव, मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, महानगरपालिका मालेगांव, मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

-                -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५५७

निर्णय दिनांक २५-०३-२००९

१ श्री. शब्बीर अहमद अब्दुल जब्बार, अपिलार्थी
१२६, इस्लामपुरा, लल्ले दुध डेअरी जवळ, मालेगांव,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा इमारत पर्यवेक्षक,
मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा नगर रचनाकार,
मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २०-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. तसेच त्यांनी विचाराधीन अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या त्यांना दिनांक १६-०३-२००७ रोजी प्राप्त झालेल्या अपील निर्णयाच्या विरुध्द केले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी उत्तरे देऊन माहिती दडविण्याचा प्रयत्न केला आहे, वस्तुनिष्ठ माहिती देण्याचे

- -

नाकारले आहे, दिलेली उत्तरे समाधानकारक नाहीत. जुजबी किरकोळ कारणे सांगून अपिलार्थीची दिशाभूल केली गेली आहे. या सर्व बाबी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-याच्या हिताचे संरक्षण करुन त्यांची बाजू उचलून धरुन त्यांच्या युक्तिवादाचा सुनावणीत कोणताही विचार करण्याचे नाकारले.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची व्याप्ती वाढवून जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिकच्या स्पष्टीकरणाचे व प्रशासकीय दृष्टीकोन स्पष्ट करणारी मागणी केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक जागा विनामूल्य अथवा अल्प भाडे आकारुन देण्यासंबंधी करण्यात येणा-या कारवाईशी संबंधीत माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नगरपालिका किंवा महानगरपालिके-कडील जागा घेण्यासाठी कुठल्या वर्गवारीतील संस्था पात्र असतात. जागा मागणी करण्यासाठी संस्थेची मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कायदा १९५० वा सोसायटी नोंदणी कायद्यान्वये नोंदणी झालेली असणे अनिवार्य / आवश्यक असते का, जागा वाटप करण्यापूर्वी नगरपालिका किंवा महानगरपालिका यांनी जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक असते का, व जिल्हाधिकारी यांची परवानगी प्राप्त झाली नसल्यास या परवानगीशिवाय नगरपालिका अथवा महानगरपालिका यांना सार्वजनिक जागा नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत संस्थेस हस्तांतरीत करता येते का - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-०३-२००७ रोजीच्या निर्णयाव्दारे अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

-                    -

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २४-०१-२००७ रोजी विनामूल्य माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या चार मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक १ वगळता उर्वरित तीनही मुद्दयासंदर्भातील माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये, कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दल कारणे, खुलासा अथवा स्पष्टीकरण वा अभिप्राय अर्जदारास देणे, अशा प्रकारच्या प्रक्रियेचा समावेश नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ४ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षिले असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्दयावरील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) शी विसंगत होत आहे व परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयावर त्यांचे अभिप्राय त्यांच्या दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या पत्राने कळविले आहेत. जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रतिसाद अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार विहित मुदतीमध्ये दिला आहे. हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी उत्तरे दिली आहेत, वस्तुनिष्ठ माहिती नाकारली आहे इत्यादी अभिप्रायांचे समर्थन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. यासंदर्भात त्यांनी कोणताही वैध पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही, असे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना अधिक स्पष्टीकरण काही बाबीवर अपेक्षित असल्याचे म्हटले आहे. याबाबत अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणार नाही. याकरिता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडील संबंधित कागदपत्रे ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहेत त्या अभिलेख्यांची तपासणी केल्यास त्यांना आपल्या म्हणण्यातील प्रश्नांची उत्तरे त्यामध्ये कदाचित मिळू शकतील. त्यामुळे त्यांना आवश्यक असलेल्या अधिकच्या स्पष्टीकरणासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे संबंधित विषयाचे

-     -

अभिलेखे तपासणीसाठी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार स्वतंत्र अर्ज करावा व संबंधित अभिलेख्यांची पाहणी करावी, असे त्यांना येथे सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शब्बीर अहमद अब्दुल जब्बार, १२६, इस्लामपुरा, लल्ले दुध डेअरी जवळ, मालेगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २५५८/०७, २५५९/०७ व २५६०/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५५८, २५५९ व २५६०

निर्णय दिनांक २५-०३-२००९

१ श्री. गोविंद पर्वतराव मोरे, : अपिलार्थी
रेश-पर्व, नववसाहत, आनंदनगर, सोयगाव,
तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सेक्रेटरी, नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक
मंडळ, जळगांव (नि.), तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अध्यक्ष, नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक
मंडळ, जळगांव (नि.), तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक

त्रयस्थ पक्ष : अपील क्रमांक २५५८/२००७ :
१ श्री. विठ्ठल दुकले,
२ श्री. भास्कर दुकले,
३ सौ. काळूबाई दुकले,
४ श्री. जगन्नाथ दुकले,
५ श्री. भिला दुकले,
६ श्री. पंढरीनाथ दुकले

अपील क्रमांक २५५९/२००७
७ श्री. ए. पी. अहिरे

**निर्णय**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २५-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

\- \-

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०७-२००७ रोजी दाखल केलेली तीन स्वतंत्र व्दितीय अपिले, क्रमांक २५५८/२००७, २५५९/२००७ व २५६०/२००७ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, संबंधीत संस्थेचे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे माहितीसाठीचे अर्ज व प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे पोस्टाने पाठविले असता सदर टपाल त्यांनी स्वीकारले नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या या म्हणण्याचा आयोगासमोर पुनरुच्चार केला व उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस वेळोवेळी माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले व त्याचबरोबर आयोगास अशीही माहिती दिली की, अपिलार्थी हे संस्था चालकांना मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने अशा प्रकारची माहिती मागवित असतात.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या पुराव्यावरुन त्यांच्याकडे, अपिलार्थीने संबंधिताकडे पाठविलेली काही रजिस्टर्ड पाकिटे स्वीकृत न करता परत आल्याचे दिसून येते. आज रोजी संबंधीत संस्थेचे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या विचाराधीन तीनही प्रकरणी संबंधीत मूळ माहितीचे अर्ज त्यांच्याकडे आयोगाकडील सुनावणीच्या पत्रासोबत प्राप्त झाले असल्याचे आयोगास अवगत केले व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले. यावर आयोगाने संबंधीत प्राधिकरणास अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने माहिती देण्याचे आदेशित केले असता, अपिलार्थीने आयोगासमोर, संबंधीत जन माहिती अधिकारी, या रजिस्टर्ड पाकिटामध्ये केवळ कोरे कागद पाठवतील अशी शंका व्यक्त करुन त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना शिक्षणाधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक यांच्यामार्फत प्राप्त व्हावी अशी आयोगास विनंती केली. अपिलार्थीची ही विनंती आयोग मान्य करत असून, सचिव, नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जळगांव (नि.), तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलाशी संबंधीत तीनही स्वतंत्र अर्जान्वये त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांच्यामार्फत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना असे सूचित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी संबंधीत संस्थेकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधीत शिक्षण संस्थेकडून (नाशिक जिल्हा

-          -

अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जळगांव (नि.), तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक) त्यांच्या कार्यालयाकडे प्रथम व नंतर अपिलार्थीस उपलब्ध होईल असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेली तीनही व्दितीय अपिले, क्रमांक २५५८/२००७, २५५९/२००७ व २५६०/२००७ निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २५५८/२००७, २५५९/२००७ व २५६०/२००७ निकाली काढण्यात येत आहेत.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोविंद पर्वतराव मोरे, रेश-पर्व, नववसाहत, आनंदनगर, सोयगाव, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा सेक्रेटरी, नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जळगांव (नि.), तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जळगांव (नि.), तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६१४

निर्णय दिनांक २५-०३-२००९

१ श्री. सुधाकर आर. जाधव, / श्री. नरेंद्र मधुकर लचके, अपिलार्थी
एन-४१, जेए-३-१२-५, सावतानगर, चौथी स्कीम,
नवीन सिडको, नाशिक-०८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था,
नाशिक विभाग, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक, सहकारी संस्था, येवला, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुधाकर आर. जाधव, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, सदर अपील त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील दिनांक ०८-११-२००७ रोजी प्राप्त झालेल्या निर्णयाविरुध्द केले आहे. या अपील

- -

अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर दिनांक ०५-११-२००५ रोजी सुनावणी ठेवली होती. परंतु सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ०८-११-२००७ रोजी प्राप्त झ ााले. या अपील अर्जामध्ये पुढे अपिलार्थीने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचे सुनावणीसाठी हजर राहण्याचे पत्र उशिरा प्राप्त झाले असल्याने, जन अपिलीय अधिकारी यांचा सुनावणी होऊ नये असा उद्देश असल्याचे अनुमान काढून विचाराधीन व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर नियमाप्रमाणे शिक्षा व दंड व्हावा अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नाशिक जिल्ह्यातील नाशिक जिल्हा महिला विकास सहकारी बँक, या बँकेच्या २००६ ते २०११ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी झालेल्या निवडणुकीमध्ये तक्रार केलेले दोन उमेदवार जाधव प्रतिभा सुधाकर व देढिया (जैन) बेबीताई कांतीलाल या उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र दाखविण्याची विनंती केली होती. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे केला होता, तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने या प्रकरणाशी संबंधीत निवडणूक अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, येवला यांना त्यांच्याकडील दिनांक १४-०९-२००७ रोजीच्या पत्राने त्यांचा अर्ज पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस पाठविली. सदर प्रत अपिलार्थीस दिनांक २८-०९-२००७ रोजी मिळाल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे पत्र त्यांच्या कार्यालयामध्ये दिनांक २५-१०-२००७ रोजी तयार करुन ठेवल्याचे दिसून येते. तथापि हे पत्र अपिलार्थीस दिनांक ०८-११-२००७ रोजी म्हणजेच प्रस्तावित सुनावणीच्यानंतर प्राप्त झाले. त्यामुळे अपिलार्थी सुनावणीस हजर राहू शकले नाहीत. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांच्या अनुपस्थितीत दिनांक १०-१२-२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्वरित माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही कोणतीही

माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्यांना संबंधीत त्रयस्थ पक्षाने नाशिक जिल्हा महिला विकास सहकारी बँक नाशिक या बँकेच्या संचालकपदी झालेल्या निवडणुकीमध्ये दाखल केलेल्या कागदपत्रांची त्यांना तपासणी करावयाची आहे व तसा अर्ज त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला होता. अद्यापही ही माहिती त्यांना तपासणीसाठी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध झाली नाही, ती त्यांना तपासणीसाठी त्वरित उपलब्ध करुन द्यावी.

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात केलेल्या बँकेच्या निवडणुकीसाठी निवडणूक अधिकारी म्हणून सहायक निबंधक, सहकारी संस्था, येवला यांची नेमणूक झाली होती. त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांनी दिनांक १४-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सहायक निबंधक, सहकारी संस्था, येवला यांच्याकडे पाठविला होता.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी काय कारवाई केली असे त्यांना विचारले असता या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने पुढे कोणतीही कारवाई केली गेली नसल्याचे आयोगास सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय तरी, किमान जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी संबंधीत सहायक निबंधक, सहकारी संस्था, येवला यांच्याकडे पाठविला का याची विचारणा जिल्हा उपनिबंधकांच्या प्रतिनिधीस केल्यानंतर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचा अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णय त्यांना प्राप्त झाला नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत माहिती तपासणीसाठी देखील उपलब्ध करुन देतांना शासकीय यंत्रणा कशा प्रकारे कालापव्यय करतात आणि परिणामी जनसामान्य हे सार्वजनिक प्राधिकरणांकडून माहिती प्राप्त करुन घेण्याच्या अधिकारापासून कसे वंचित राहतात याचे हे प्रकरण म्हणजे उत्तम उदाहरण आहे, असे म्हटल्यास वावगे ठरु नये. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ

अर्जातील माहिती जिल्हा उप निबंधकाच्या कार्यालयात सहज उपलब्ध नव्हती. या प्रकरणी सहायक निबंधक, सहकारी संस्था, येवला यांना अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाची प्रत दिनांक २६-०८-२००७ रोजी अगर तत्पूर्वी पाठविणे अभिप्रेत होते, तथापि येथे देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज संबंधिताकडे पाठविण्यासाठी १९ दिवसांचा विलंब लावला. अपिलार्थीच्या दिनांक ०६-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी जास्तीत जास्त ४५ दिवसात म्हणजे दिनांक २०-११-२००७ रोजी अगर तत्पूर्वी या प्रकरणी निर्णय घेणे भाग होते. तथापि या टप्प्यावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी २० दिवस इतक्या विलंबाने अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला व त्याप्रमाणे अपिलार्थीस सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी पत्र त्यांच्या कार्यालयात दिनांक २५-१०-२००७ रोजी तयार असूनही हे पत्र अपिलार्थीस दिनांक ०८-११-२००७ रोजी मिळाले. सदर पत्र जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचा-याने दिनांक २९-१०-२००७ रोजी पोस्टात टाकले असे जन अपिलीय अधिकारी यांनी म्हटले आहे. सुनावणीचे पत्र सुनावणीचा दिनांक टळून गेल्यानंतर अपिलार्थीस प्राप्त झाले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १०-१२-२००७ रोजी निर्णय पारित केला, तथापि या निर्णयाची प्रत जिल्हा उप निबंधकास प्राप्त झाली नाही असे जिल्हा उपनिबंधकांच्या प्रतिनिधींचे म्हणणे आहे. या प्रकरणी प्रत्यक्षात अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देणारे जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, येवला यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशामध्ये प्रत अग्रेषित केली नाही असे दिसून येत आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील अशा प्रकारच्या कार्यालयीन अनियमिततेमुळे अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. सबब सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये या संपूर्ण घटनाक्रमाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर झालेल्या विलंबाची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातर्फे निश्चित करण्यात येऊन त्यांना सर्व संबंधितांवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असली तरी तिचे स्वरुप सार्वजनिक असल्याने व या मुद्दयांच्या आधारे संबंधीत त्रयस्थ पक्षाला निवडणूक लढविण्याची संधी प्राप्त झाली असल्याने ही माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाचे मत घेणे गरजेचे आहे असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे

मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. आज रोजी युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, संबंधीत निवडणूक अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था येवला यांची नेमणूक काही ठराविक कालावधीकरिता केलेली होती. सदर कालावधी हा आता व्यपगत झाला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नाशिक जिल्हा महिला विकास सहकारी बँकेमध्ये उपलब्ध असल्याने व या बँकेवर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे नियंत्रण असल्याने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी प्रथमतः संबंधीत बँकेकडून या बँकेचे नियंत्रक या नात्याने मागवून घ्यावी व तदनंतर ही माहिती अपिलार्थीस तपासणीसाठी तात्काळ उपलब्ध करुन द्यावी. संबंधीत बँकेकडून त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस दूरध्वनीव्दारे अथवा रजिस्टर्ड टपालाव्दारे कळवावे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याकरिता जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना ३० दिवस इतका कालावधी देण्यात येत असून अपिलार्थीस तपासणीसाठी माहिती उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया या कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांनी घ्यावी. तसेच या तपासणीसाठी जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस कोणतेही शुल्क आता आकारता येणार नाही याचीही त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, नाशिक यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे तपासणीसाठी मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

- -

३. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर आर. जाधव, / श्री. नरेंद्र मधुकर लचके, एन-४१, जेए-३-१२-५, सावतानगर, चौथी स्कीम, नवीन सिडको, नाशिक-०८.

२ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, येवला, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६१५

निर्णय दिनांक २५-०३-२००९

१ श्री. सुधाकर आर. जाधव, / श्री. नरेंद्र मधुकर लचके, अपिलार्थी
एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, चौथी स्कीम,
नवीन सिडको, नाशिक-०८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक
१, विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नाशिक विभाग,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या निर्णयाविरुध्द केलेले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी हेतुपुरःस्सर त्यांच्याकडील सुनावणी संबंधीचे पत्र अपिलार्थीस सुनावणीच्या तारखेच्या दिवशी दुपारी मिळावे

- -

अशा उद्देशाने पाठविले होते व त्यांना सुनावणीसाठी पत्र प्राप्तीच्या मागील तारीख दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत व एका मुद्दयाव्दारे त्रयस्थ पक्षाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केल्यानंतर साधारणपणे किती दिवसात जात पडताळणी करुन मिळते, श्री. सुधाकर जाधव व सौ. जाधव यांनी जात पडताळणी समिती जिल्हा नाशिक यांच्यामार्फत दिनांक ०४-०७-२००६ रोजी पाठविलेल्या अर्जाप्रमाणे संबंधितांचे जात पडताळणी करुन केव्हा मिळेल, जात पडताळणी करुन मिळण्यास एवढा वेळ लागण्याची सविस्तर कारणे व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या अपिलीय अधिकारी व माहिती अधिका-यांची नांवे, पत्ते, फोन नंबर व मोबाईल नंबर** - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. मात्र यानंतर अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस हवी असलेली माहिती पुरविल्याचे दिसून येते. परंतु अपिलार्थीच्या प्रतिनिधीने आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे सदर पत्र त्यांना प्राप्त झाले नसल्याचे आयोगासमोर सांगितले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-१०-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. या निर्णयाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी सुनावणीच्या वेळी त्यांच्याकडे अनुपस्थित राहिल्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे संपूर्ण माहिती दिली असून ही माहिती त्यांनी

अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पाठविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याचा योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याचे दिसून येते. तरीही सुलभ संदर्भाकरिता या माहितीची एक जादा प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे मान्य केले आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी जात पडताळणी करुन मिळण्यास एवढा वेळ लागण्याची सविस्तर कारणे, सदरील व्यक्तींची जात पडताळणी केव्हा होईल, अशा प्रकारची माहिती अपिलार्थीने अर्ज करतेवेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे कोणत्याही प्रकारे संभवत नाही. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली अशा प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही, कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देणे या प्रक्रियेच्या व्याप्तीमध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात अर्जदारास माहिती देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील जात पडताळणीचा अर्ज केल्यापासून साधारणपणे किती दिवसात जात पडताळणी करुन मिळते व जात पडताळणी विभागाचे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नांवे, पत्ते व फोन नंबर ही माहिती, अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने देय होत आहे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर माहिती दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे. मात्र ती २३ दिवसाच्या विलंबाने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिली असल्याचे आढळून येत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, केवळ अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत या कारणास्तव अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर केले ही त्यांची कृती चुकीची आहे असे आयोगास वाटते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास माहिती देण्याच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये, प्रत्येक टप्प्यावर अपिलार्थीस सर्वसाधारणपणे, अधिनियमाव्दारे विहित केलेले अपवाद वगळता सकारात्मक प्रतिसाद मिळणे अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित आहे. केवळ अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत ह्या एकाच तांत्रिक कारणास्तव त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवल्याचे

- -

या प्रकरणी सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी जर पहिल्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन अपिलार्थीच्या अपील अर्जावरील सुनावणीच्या वेळी सकारात्मक निर्णय दिला असता तर कदाचित अपिलार्थीस व्दितीय अपील करण्याची गरज पडली नसती.

अपिलार्थीच्या दिनांक ०६-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०८-२००७ रोजी अगर तत्पूर्वी देणे अपेक्षित असतांना त्यांनी ही माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी २३ दिवसांचा विलंब लावल्याचे दिसून येत आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, त्यांचे कार्यालय नुकतेच सुरु झाले होते, कर्मचा-यांची नेमणूक झाली नव्हती व कार्यालय सुरळीत चालण्याकरिता उधार उसनवारी तत्वावर वसतीगृहातील कर्मचारी यांचेकडून कामे करुन घेतली. त्याच वेळी माहिती अधिकार कायद्यानुसार प्रचंड प्रमाणात अर्ज प्राप्त झाले. या सर्व अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक तो कर्मचारीवृंद उपलब्ध नसल्याने हा विलंब लागलेला आहे. आता त्यांच्या कार्यालयास आवश्यक तो कर्मचारीवृंद उपलब्ध झ ाला असून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचे ते कसोशीने पालन करत आहेत व या कामी त्यांनी आपल्या कार्यालयात संगणकाचाही वापर पुरेशा प्रमाणात करुन घेतला आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेले स्पष्टीकरण आयोग मान्य करीत असून त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबद्दल सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कारवाई करावी अशी त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व अपिलार्थीस देय असलेल्या माहितीची जादा प्रत त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

- -

३.    जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

नाशिक                                                   ( वि. बा. बोरगे )

दिनांक    २५-०३-२००९                                    राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१    श्री. सुधाकर आर. जाधव, / श्री. नरेंद्र मधुकर लचके, एन-४१, जेए-३-१२-५, सावतानगर, चौथी स्कीम, नवीन सिडको, नाशिक-०८.

२    जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३    जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४    निर्णय नस्ती.

-    -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५६२

निर्णय दिनांक २६-०३-२००९

१ श्री. सुरेश हरी दशपुते, अपिलार्थी

एन ३२ एफ १/२०/८ सप्तशृंगी चौक, जुना सिडको,

नवीन नाशिक - ०९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहायक पोलिस आयुक्त, विभाग १,

नाशिक शहर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा पोलिस उप आयुक्त (परिमंडळ),

नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्वजण हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २८-०३-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०८-०१-२००७ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " वरिष्ठ पोलिस निरीक्षक सरकारवाडा पोलिस स्टेशनमध्ये दिनांक १३-१०-२००६ रोजी चौकशी अर्ज दाखल केला आहे

त्याची चौकशी करण्यास नकार मिळाल्याबद्दल अर्ज दाखल केल्यानंतर ८/१० दिवसांनी चौकशी करावयास गेलो तर मला श्री. भामरेसाहेब पी. आय. यांनी विचारले तुमचे काय म्हणणे ते सांगा व फक्त माझाच जबाब लिहून घेण्यात आला त्यामुळे सदर चौकशी का होत नाही याची माहिती मिळावी "  ही माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २८ इतके त्यांच्या कार्यालयाकडे भरणा करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २३-११-२००६ रोजी ही माहिती व्यक्तिशः हस्तगत केली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०१-२००७ रोजी निर्णय दिला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात कोणताही निश्चित स्वरुपाचा निर्णय दिला नसल्याचे आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी युक्तिवादाच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून, उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जावर चौकशी का होत नाही याची कारणे अपेक्षित असल्याचे दिसते. वास्तविक पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या विषयावर चौकशी होऊन या चौकशीचा अहवालही अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे व त्याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली कथित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णपणे विसंगत आहे असे दिसून येत आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्याकडे प्रत्यक्ष उपलब्ध असलेली माहिती ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात प्राप्त करुन घेता येईल. अर्जदाराने माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार पुरविणे या संपूर्ण प्रक्रियेमध्ये जन माहिती अधिकारी यांनी एखादा विशिष्ट प्रशासकीय निर्णय का

-                                    -

घेतला किंवा अर्जदारास अपेक्षित निर्णय का घेतला नाही अशा प्रकारची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारच्या मुद्दयावर स्पष्टीकरण देणे अथवा खुलासा करणे हे या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नाही, त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी केलेल्या दिनांक १०-११-२००६ च्या अर्जातील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील माहितीचा विषय होऊ शकत नाही. अशा प्रकारे ही माहिती, अधिनियमातील तरतुदीशी कोणत्याही प्रकारे सुसंगत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश हरी दशपुते, एन ३२ एफ १/२०/८ सप्तशृंगी चौक, जुना सिडको, नवीन नाशिक - ०९.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलिस आयुक्त, विभाग १, नाशिक शहर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलिस उप आयुक्त (परिमंडळ), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५६३

निर्णय दिनांक २६-०३-२००९

१ श्री. पितांबर सुकालाल वाघ, अपिलार्थी

१४, राही को-ऑप हौसिंग सोसायटी, तारवालानगर,

लामखेडे मळा, दिंडोरी रोड, पंचवटी - मेरी, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहा. प्रशिक्षणार्थी सल्लागार (तां),

उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नाशिक

- ४२२ ००२

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक

कार्यालय, नाशिक - ४२२ ००२

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १२-०२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनास्वाक्षरीने चार महिने उशिराने माहिती प्राप्त झाली. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-११-२००६ रोजी

- -

प्रथम अपील केले. त्यांनी सदर अपील संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडे सादर केले होते. संचालनालयाच्या कार्यालयाने दिनांक ०१-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये नाशिक येथील प्रादेशिक कार्यालयाला कळविले, तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या बदलीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे काही माहिती मागितली होती. तथापि विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २३-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. त्यांनी दिनांक ०१-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीचा अपील अर्ज उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांच्याकडे पाठविला. अद्यापपावेतो अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतलेला नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक २३-११-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा सदर निर्णय मान्य न झाल्यास अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार ते राज्य माहिती आयोगाकडे, सदरचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

-  -

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक २३-११-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पितांबर सुकालाल वाघ, १४, राही को-ऑप हौसिंग सोसायटी, तारवालानगर, लामखेडे मळा, दिंडोरी रोड, पंचवटी - मेरी, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रशिक्षणार्थी सल्लागार (तां), उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नाशिक - ४२२ ००२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक - ४२२ ००२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५६४

निर्णय दिनांक २६-०३-२००९

१ श्री. दिलीप रामू निकम, अपिलार्थी

१६, शिवक्रांती सोसायटी, मेहरधाम, पेठरोड, पंचवटी,

नाशिक - ०३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा प्रशासकीय अधिकारी,

जिल्हा सामान्य रुग्णालय, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय,

नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे मागणी केलेली माहिती त्यांना न मिळाल्याने आयोगाकडे व्दितीय अपील केल्याचे नमूद केले आहे व त्याचबरोबर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा उल्लेख या अर्जामध्ये त्यांनी केला आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी

यांच्याकडून ठेकेदाराच्या निविदा रकमेचा तुलनात्मक तक्ता व ठेकेदाराच्या नावांसह फर्मचे नांव व फोन नंबर, मोबाईल नंबरसह पत्ते ही माहिती आवश्यक असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे मार्च २००७ मध्ये झालेल्या भंगार साहित्याच्या लिलावाबाबत व निविदा प्रक्रियाबाबत, दिनांक ०१-०१-२००७ ते १५-०४-२००७ या कालावधीशी संबंधित वरीलप्रमाणे माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही तारखेचा उल्लेख अपिलार्थीने केला नसल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर अपिलार्थीस दिनांक ०९-०७-२००७ रोजी एक पत्र पाठविले व त्यामध्ये अपिलार्थीस दिनांक २३-०५-२००७ रोजी त्यांना माहिती दिल्याचे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०५-२००७ रोजी माहिती दिल्याचे व तसेच अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये मागणी केलेली उर्वरित माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "चार" शी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस अपूर्णरित्या दिली आहे, तसेच अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक "पाच" व्दारे त्यांनी मागणी केलेल्या ठेकेदारांच्या निविदा रकमेचा तुलनात्मक तक्ता ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या पत्राबरोबर दिलेली नाही. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी जरी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद देऊन

- -

माहिती पुरविली असली तरी ही  माहिती अपूर्ण असल्याचे वरील प्रकारे सिध्द होत आहे.  अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांच्या ठेकेदाराच्या निविदा रकमेच्या तुलनात्मक तक्त्याबरोबरच ठेकेदाराचे फोन नंबर व मोबाईल नंबर ही अतिरिक्त माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे.  अपिलार्थीने ठेकेदाराचे फोन वा मोबाईल नंबर ही माहिती त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केली नसल्याने ती माहिती अपिलार्थीस आता देय होत नाही, तरीही आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तयार करुन आणल्याचे आयोगास अवगत केले व ही माहिती त्यांनी आयोगास दाखविली.  जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेली माहिती ही अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या मागणीशी सुसंगत असल्याचे दिसून येते.  अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना ही माहिती, अधिनियमतील कलम ७ (६) प्रमाणे, अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल.  हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी जरी अपूर्ण माहिती प्रथमतः दिली असली तरी अपिलार्थीस ही माहिती न देण्यामागे त्यांचा कोणताही असद्‌हेतू असल्याचे अथवा दृष्टहेतुने त्यांनी अपिलार्थीपासून माहिती दडविली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर कारवाई करणे आयोग उचित समजत नाही. मात्र अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणी प्रथमतः दिलेल्या अपूर्ण प्रतिसादाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या माहितीसाठीच्या प्रत्येक अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

- -

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीप रामू निकम, १६, शिवक्रांती सोसायटी, मेहरधाम, पेठरोड, पंचवटी, नाशिक - ०३.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५६५

निर्णय दिनांक २६-०३-२००९

१ सौ. प्रतिभा सुधाकर जाधव, अपिलार्थी

एन ४१ - जेअे ३ - १२ - १, सावतानगर,

सिडको - ४, नाशिक - ८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा प्राचार्य, एस. एम. आर. के. बी. के. ए. के.

महिला महाविद्यालय, कॉलेज रोड, नाशिक - ०५

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा विभागीय सचिव, गोखले एज्युकेशन सोसायटी,

केंद्रीय कार्यालय, कॉलेज रोड, नाशिक - ०५

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २४-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अपिलार्थीने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दिनांक ०१-०६-२००७ रोजी प्राप्त झालेल्या जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २६-०५-२००७ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती समाधानकारक वाटत नाही, ती संशयास्पद व दिशाभूल करणारी वाटते यासाठी हे अपील केलेले आहे, असे नमूद केले आहे.

- -

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये त्यांनी या प्रकरणाशी संबंधीत आपले स्वतंत्र अभिप्राय अलाहीदा देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची व्याप्ती वाढविल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने त्यांच्या या अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या कालावधीचा कोणताच उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **अपिलीय अधिका-याचे नांव, पद, पूर्ण पत्ता, फोन नंबर, संस्थेचे चेअरमन व संचालक मंडळ यांची नांवे, पत्ते, दूरध्वनी नंबर, संस्थेमध्ये BVA हा कोर्स केव्हा सुरु झाला, या कोर्सच्या FYBVA या वर्षासाठी ॲडमिशन फी किती आहे, तसेच संस्थेस सरकारकडून किती अनुदान मिळते, FYBVA, SYBVA व TYBVA या प्रत्येक कॅटेगिरीची प्रत्येक वर्षाला किती फी आहे व याबाबत संस्थेच्या संचालक मंडळाच्या ठरावाची प्रत** - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०५-२००७ रोजीच्या पत्राने उत्तर देऊन, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य प्रकारे माहिती दिल्याचे नमूद केले व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील OBC विद्यार्थ्यांची शिक्षणासाठी लागणारी फी ही समाजकल्याण अधिकारी, नाशिक यांच्याकडून घेण्यासाठी अपिलार्थीस त्यांनी सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०३-२००७ रोजी अर्ज केला असता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक २२-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविण्यात आलेली माहिती त्यांना अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी वाटली, त्यामुळे त्यांनी संबंधित संस्थेच्या सचिवाकडे प्रथम अपील केले असता त्यांनी या अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन

-                                   -

त्यांच्या कार्यालयातील दिनांक २६-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या अपिलाबाबत निर्णय दिला व समाजकल्याण अधिकारी, नाशिक यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेनुसार त्यांनी समाजकल्याण अधिकारी, नाशिक यांच्याशी संपर्क साधून देखील त्यांना माहिती प्राप्त होऊ शकली नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद करतांना या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास थोडक्यात सांगितली. यामध्ये त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांची मुलगी त्यांच्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थिनी असून अपिलार्थीने त्यांच्याकडे ओ. बी. सी. सवलतीसाठी दाखल केलेल्या कागदपत्रांपैकी काही कागदपत्रे त्यांना आक्षेपार्ह वाटल्याने त्यांनी काही कागदपत्रे सदर आक्षेपांच्या पुर्ततेसाठी बाजूला काढून ठेवली होती, त्यामुळे अपिलार्थी यांनी ही माहिती मागण्याचे हे कारण असावे. जन माहिती अधिकारी यांच्या मते अपिलार्थीस त्यांनी दिनांक २२-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे संपूर्ण माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत मूळ प्रकरणामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा कोणत्याही प्रकारे उल्लेख केलेला नाही, तसेच त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सरकारकडून किती अनुदान मिळते याबाबत सविस्तर अशा प्रकारची माहिती मागविली आहे. अपिलार्थीने या मुद्दयापुढे टक्केवारी चिन्हाचा वापर केला आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे या चिन्हाबाबत आयोगास कोणतेही स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. मात्र त्याचबरोबर असेही दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयासंदर्भात १०० टक्के अनुदान प्राप्त व BVA या कोर्सकरिता कोणत्याही प्रकारचे अनुदान शासनाकडून प्राप्त झाले नसल्याचा खुलासा केला. वास्तविक पाहता अपिलार्थीच्या अर्जामध्ये BVA या कोर्सकरिता किती अनुदान मिळते अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली नव्हती तर याबाबत जन माहिती अधिकारी यांनी शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नसल्याची अनावश्यक माहिती अपिलार्थीस पुरविली व त्याचबरोबर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती देखील मोघम स्वरुपाची असल्याचे आढळून येत आहे. सरकारकडून संबंधीत संस्थेस वेगवेगळ्या प्रयोजनार्थ प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये अनुदान प्राप्त होत असते. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने ज्या दिवशी माहितीची मागणी केली त्या दिवसापासून अनुदानासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली असती तर ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे एक सकारात्मक कारवाई झाली असती. आज रोजी संबधितांना दिलेल्या

- -

सूचनेप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने ज्या वर्षी मागणी केली आहे, त्या आर्थिक वर्ष २००६-०७ या वर्षी प्राप्त झालेल्या अनुदानाच्या प्रती किंवा या अनुदानासंबंधीचा त्यांच्याकडे उपलब्ध असलेला अधिकृत तपशील अपिलार्थीस देण्यास त्या तयार आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांना आर्थिक वर्ष २००६-२००७ या वर्षात शासनाकडून प्राप्त झालेल्या सर्व प्रकारच्या अनुदानाच्या आदेशाच्या प्रती किंवा त्या संस्थेकडे उपलब्ध असलेल्या तपशीलाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

प्रसंगावशात् संस्थेच्या सचिवांच्या प्रतिनिधीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, त्यांच्या महाविद्यालामध्ये अनुदान प्राप्त होतांना पूर्वी हे अनुदान काही आदेशाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त होत होते. तथापि आता हे अनुदान शासनाकडून परस्पर त्यांच्या बँकेच्या खात्यात जमा केले जाते. सदर अनुदान त्यांच्या खात्यात जमा केल्याची माहिती त्यांना शिक्षण सह संचालक यांच्या कार्यालयाकडून दूरध्वनीव्दारे दिली जाते. अशा प्रकारची अनुदान वाटपाची पध्दत निश्चितपणे आक्षेपार्ह आहे असे आयोगास वाटते. तेव्हा या प्रकरणी सचिव (उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण) यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी शासनातर्फे राज्यातील सर्व महाविद्यालयांना वितरित केल्या जाणा-या निधीचे व्यवस्थापन योग्य प्रकारे होण्याकरिता एखाद्या विशिष्ट पध्दतीचा अवलंब करुन वर नमूद केलेल्या प्रचलीत पध्दतीस कसा आळा घालता येईल हे पहावे व यासंबंधी आपले परिपत्रक सर्व संबंधितांकडे जारी करावे. सदर सूचना त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (चार) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी वाटल्याचे नमूद केले आहे. मात्र यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे सादर केलेला पुरावा हा जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हेतुपुरःस्सर अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे असे सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली हे त्यांचे म्हणणे आयोग अग्राह्य ठरवत येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

-                                   -

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. प्रतिभा सुधाकर जाधव, एन ४१ - जेअे ३ - १२ - १, सावतानगर, सिडको - ४, नाशिक - ८.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, एस. एम. आर. के. बी. के. ए. के. महिला महाविद्यालय, कॉलेज रोड, नाशिक - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सचिव, गोखले एज्युकेशन सोसायटी, केंद्रीय कार्यालय, कॉलेज रोड, नाशिक - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५६६

निर्णय दिनांक २६-०३-२००९

१ श्री. शिवनाथ हरिश्चंद्र डावखर, अपिलार्थी
मु. गिरणारे, तालुका इगतपुरी,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, इगतपुरी,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १९-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंड लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अतिक्रमणाबाबत एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **भूमि अभिलेख विभागाने अतिक्रमणाच्या तयार केलेल्या नकाशाची प्रत, राहिलेल्या अतिक्रमणाच्या नकाशाची प्रत, अतिक्रमण असलेल्या खुणांची प्रत्येक इमारतीची मोजमापे व रस्ता रुंदीकरण व गटारी बनविण्यासाठी काढलेल्या निविदेची प्रत** - या मुद्दयाचा समावेश होता. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-०३-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीकडून माहिती तयार करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी वाढवून देण्याची अपिलार्थीस विनंती केली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक २३-०७-२००७ रोजी आपले आदेश पारित केले व अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती तयार झाल्यानंतर ती घेऊन जाण्यासंदर्भात तोंडी कळविले होते. तथापि, अपिलार्थी ही माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी दिनांक ३१-०७-२००७ रोजी अपिलार्थीच्या निवासस्थानी गेले असता अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले. तदनंतर त्यांनी अपिलार्थीस हीच माहिती दिनांक १०-०८-२००७ रोजी पोस्टाने पाठविली. तथापि अपिलार्थीने या रजिस्टर्ड पाकिटाचा स्वीकार न करता हे रजिस्टर्ड पाकिट त्यांना विनातामीली पोस्टाकडून परत प्राप्त झाले.

- -

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, ज्यावेळी माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला त्यावेळी त्यातील रस्ता रुंदीकरण व गटारी बनविण्यासाठी काढलेल्या निविदेची प्रत हा मुद्दा वगळता उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती. जन माहिती अधिकारी यांनी या टप्प्यावर अपिलार्थीस, रस्ता रुंदीकरण व गटारी बनविण्यासाठी काढलेल्या निविदेची प्रत या संदर्भातील माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देऊन उर्वरित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे अपिलार्थीस कळविणे, या प्रकरणी जास्त संयुक्तिक ठरले असते. परंतु त्यांनी तसे न करता अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती तयार करण्यासाठी अपिलार्थीस एक महिन्याची मुदत वाढवून देण्याची विनंती केली. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये माहिती तयार करणे व ती देण्यासाठी अर्जदाराकडे वाढीव कालावधीची मागणी करणे या दोनही बाबी समाविष्ट नाहीत. अशा प्रकारच्या कोणत्याही प्रक्रियांचा अधिनियमामध्ये कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या उल्लेख करण्यात आलेला नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची अशी आहे. अपिलार्थीने अतिक्रमणाबाबतची माहिती मागविल्याचे त्यांच्या मूळ अर्जावरुन दिसून येते. तथापि हे अतिक्रमण नेमके कोणते अतिक्रमण आहे, ते कोठे आहे, रस्त्याच्या कोणत्या साखळी क्रमांकामध्ये आहे, कोणत्या रस्त्यावर झालेले आहे याचा कोणताही संदर्भ अपिलार्थीने या अर्जामध्ये दिलेला नाही. तसेच अपिलार्थीस ज्या कालावधीशी संबंधीत माहिती हवी आहे त्या कालावधीचा उल्लेख देखील अपिलार्थीने या अर्जामध्ये केलेला नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ती देय होत नाही. तसेच अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही जन माहिती अधिकारी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या निर्णयानंतर अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देऊ केली असता अपिलार्थीने ती घेण्याचे नाकारले. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी संबंधित कर्मचा-याने केलेला पंचनामा देखील आयोगास दाखविला. मूळात अपिलार्थीचा त्यांनीच मागणी केलेली माहिती स्वीकृत करण्याचा कोणताही मानस नसल्याचे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे पाठविलेल्या अर्जाच्या पाकिटाचा स्वीकार न करुन, अपिलार्थीने सिध्द केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीचे विचाराधीन अपील या परिच्छेदात वर नमूद केलेल्या त्रुटीमुळे फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. मात्र या प्रकरणी जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिलेला अवैध प्रतिसाद पाहता, तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळेस आवश्यक असलेल्या कागदपत्रांची अनुपलब्धता पाहता त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने व अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शिवनाथ हरिश्चंद्र डावखर, मु. गिरणारे, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, इगतपुरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक २५६७/२००७ व २५६८/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५६७ व २५६८

निर्णय दिनांक २६-०३-२००९

१ श्री. प्रविण बाबुराव खर्डे, : अपिलार्थी
मारुती चे. नं. ३१२/१, जिल्हा न्यायालय,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, (नगर रचना), नाशिक महानगरपालिका, नाशिक
जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (प्रशासन), नाशिक महानगरपालिका, नाशिक

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २६-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०७-२००७ रोजी दाखल केलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले क्रमांक २५६७/०७ व २५६८/०७ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीच्या अपील क्रमांक २५६७/०७ च्या संदर्भात, अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलिले दिनांक २०-०३-२००९ रोजीचे पत्र व अपील क्रमांक २५६८/०७ च्या संदर्भात दिनांक १७-०३-२००९ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले असून त्या दोनही

- -

पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांनी संबंधीत विचाराधीन अपिलामधील मूळ माहितीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना नाशिक महानगरपालिका, नाशिक यांच्याकडून प्राप्त झाली असून याबाबत त्यांची काहीही तक्रार नाही व त्यामुळे त्यांची विचाराधीन अपिले रद्दबादल ठरविण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांची विचाराधीन अपिले रद्दबादल करण्याची आयोगास विनंती केली असल्याने वरील विचाराधीन दोनही अपिले, क्रमांक २५६७/२००७ व २५६८/२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक २५६७/२००७, दिनांक १९-०७-२००७ व अपील क्रमांक २५६८/२००७, दिनांक १९-०७-२००७ खारीज करण्यात येत आहेत.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रविण बाबुराव खर्डे, मारुती चे. नं. ३१२/१, जिल्हा न्यायालय, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (नगर रचना), नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५६९

निर्णय दिनांक २६-०३-२००९

१ श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड, अपिलार्थी
३, संतोषी कृपा, भोले ट्रान्सपोर्टजवळ, आडगांव नाका, पंचवटी,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक संचालक,
नगर रचना, नाशिक महानगरपालिका, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, (नगर रचना), नाशिक महानगरपालिका, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (प्रशासन), नाशिक महानगरपालिका, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जातील प्रश्नांना उत्तरे देण्यास जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले होते.

- -

यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०६-२००७ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीने विचाराधीन अपील ज्या विषयासंदर्भात केले आहे तो विषय म्हणजे नाशिक - औरंगाबाद रोडवरील बेकायदेशीररित्या चालू असलेल्या वखारीच्या परवान्यासंदर्भात असा आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या विषयासंदर्भातील प्रथम अर्जास दिलेल्या माहितीवर आक्षेप घेऊन अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी नगर रचना यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या मूळ माहितीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नाशिक - औरंगाबाद रोडवरील वखारीच्या परवान्याबाबत एकूण १३ मुद्दयावर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये बहुतांश माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ११-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अधिनियमातील कलम ८ (ज) नुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देणे बंधनकारक नसल्याचे अपिलार्थीस कळवून त्यांना माहिती देण्याचे नाकारले.

जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमा-तील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०६-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहितीची मागणी करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते.

या प्रकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करतांना जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या वखारीसंदर्भात माहिती मागविली आहे त्या वखारींना मनपातर्फे कोणतीही परवानगी देण्यात आलेली नव्हती. तसेच या वखारी सुरु करण्याकरिता

संबंधित वखारीच्या मालकांनी मनपाकडे कोणत्याही प्रकारे परवानगी मागितली नव्हती. त्यामुळे त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध नव्हती. तक्रार प्राप्त झाल्यानंतर या वखारीच्या बांधकामासंदर्भात मनपाने तपास केला असता वखार मालकांनी त्यांच्या व्यवसायास अथवा त्यांच्या बांधकामास मनपाची परवानगी घेतली नसल्याचे उघडकीस आल्याने या वखारीवर कायदेशीर कारवाई करण्याची त्यांच्या कार्यालयातर्फे तयारी चालू आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक ११-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती अधिकार अधिनियमातील ज्या ८ (१) (ज) या कलमान्वये माहिती नाकारली आहे, त्या कलमामधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

<u>कलम (१) ८ (ज)</u>

" ज्या माहितीमुळे अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियांमध्ये अडथळा येईल, अशी माहिती "अर्जदारास पुरविणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक असणार नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये वरील परिच्छेदात स्पष्ट केलेली वस्तुस्थिती व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उघड करण्यारिता ज्या कारणाने नकार दिला ती कारणे विचाराधीन अपील प्रकरणी लागू होत नाहीत, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील युक्तिवादावरुन, अपिलार्थीने ज्या वखारीविषयी माहिती मागितली आहे त्या वखारी अनधिकृत बांधकाम या सदरात मोडतात व अनधिकृत बांधकाम हटविण्याकरिता काही निश्‍चित पध्दत एम. आर. टी. पी. ॲक्ट मध्ये विहित केली आहे. विचाराधीन अपिलासंदर्भात केलेल्या सर्व वखारींना आता मनपातर्फे नोटिसा बजावण्यात आल्या असून या अनधिकृत वखारी हटविण्या-संदर्भात मनपा विचार करत असल्याचे आयोगास उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन ज्ञात झाले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ८ व १३ वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस देऊ शकत नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये प्रश्नार्थक स्वरुपाची व जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय व प्रश्नांची उत्तरे अपेक्षित करणा-या स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे, जी

- -

माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदीशी विसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५, ८ व १३ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस देण्यास जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर तयारी दर्शविली आहे. सबब संबधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ८ व १३ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जे अनधिकृत वखारीबाबत बरेच प्रश्न उपस्थित केले आहेत त्या सर्व वखारींच्या मालकांना महानगरपालिकेतर्फे दिनांक ०७-०७-२००७ रोजी अतिक्रमणासंदर्भात नोटिसा बजावल्या गेल्या आहेत, मात्र ही अतिक्रमणे महानगरपालिकेतर्फे काढण्यात आली नाहीत. दिनांक ०७-०७-२००७ रोजी अनधिकृत बांधकामे झ ाली असल्याचे लक्षात येऊनही आजमितीस दीड वर्षापेक्षा अधिक कालावधी व्यपगत झाल्यानंतरही महानगरपालिकेने ती अनधिकृत बांधकामे हटविण्याबाबत कारवाई न करण्यासाठी कोणतेही कारण समर्थनीय असू शकत नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास फक्त कायदेशीर प्रक्रिया चालू आहे असे ठराविक साच्याचे वारंवार उत्तर दिले. याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी वैयक्तीक लक्ष घालणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते. त्यामुळे त्यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी आवश्यक ती कारवाई त्वरेने करावी, जेणेकरुन जनसामान्यांच्या मनात अपिलार्थीने व्दितीय अपील अर्जामध्ये व्यक्त केलेल्या, " वखार मालक व मनपा अधिकारी यांचे आर्थिक गैरव्यवहार सुरु असल्याने परवानगी दिली आहे " अशा प्रकारच्या शंका उपस्थित होणार नाहीत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना माहिती देण्याचे नाकारले आहे. त्यांनी ज्या कारणास्तव ही माहिती देण्याचे नाकारले आहे ते कारण या प्रकरणी कोणत्याही प्रकारे व कोणत्याही तर्काच्या आधारे लागू होत नाही. हे पाहता अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जी अपिलार्थीस दिनांक ०१-०५-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक होते, ती त्यांना ५७ दिवसाच्या विलंबाने प्राप्त झाली आहे असे दिसून येते. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या ५७ दिवसाच्या विलंबामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र होत आहेत. त्यामुळे आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक

- -

यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ८ व १३ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड, ३, संतोषी कृपा, भोले ट्रान्सपोर्टजवळ, आडगांव नाका, पंचवटी, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगर रचना विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५७०

निर्णय दिनांक २६-०३-२००९

१ श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड, अपिलार्थी
३, संतोषी कृपा, आडगांव नाका, पंचवटी,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं),
जिल्हा परिषद, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : वरिष्ठ सहायक, पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक
जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत, तर अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी त्र्यंबकेश्वर पंचायत समितीतील ग्रामसेवकांचे निवासस्थान पत्ते मागितले होते, परंतु ते उत्तर चुकीचे असल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील सादर केले परंतु त्यांनी वेळेत उत्तर देण्यास टाळाटाळ केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्र्यंबकेश्वर तालुक्यातील ग्रामसेवक व ग्रामविकास अधिका-यांच्या निवासस्थानासंदर्भात जून २००७ या कालावधीशी संबंधित एकूण सात मुद्दयाव्दारे काही माहिती विचारली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शासकीय कर्मचा-यांनी कामाच्या ठिकाणी वास्तव्य करावे यासाठी शासनाने काढलेल्या आदेशाच्या प्रती, कामाच्या ठिकाणी कर्मचारी वास्तव्य करत नसल्यास त्यावर काय व कशा प्रकारे कारवाई करावी व ती कारवाई कोणी करावी याबाबत शासनाने काढलेल्या आदेशांच्या प्रती, ग्रामसेवक व ग्रामविस्तार अधिकारी यांची नांवे, कार्य करण्याचे ठिकाण, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील ग्रामसेवक व ग्रामविस्तार अधिकारी यांनी सादर केलेले रहिवासी पत्ते, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील ग्रामसेवक व ग्रामविस्तार अधिकारी कार्यस्थळी राहत नसल्यास पंचायत समिती स्तरावर कोणकोणत्या कर्मचा-यांवर काय कायदेशीर कारवाई करण्यात आली व ग्रामसेवक व ग्रामविस्तार अधिकारी हे कार्यस्थळी राहतात किंवा नाही याची खातरजमा करणा-या अधिका-याचे नांव व पद, तालुका स्तरावरील अधिका-यांनी कार्यस्थळी न राहणा-या ग्रामसेवक व ग्रामविस्तार अधिका-यांची तयार केलेली यादी - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दूरध्वनीव्दारे दिनांक १२-०७-२००७ रोजी त्यांच्याशी संपर्क साधून अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे अवगत केले व तदनंतर अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरुन दिनांक १८-०७-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून तयार माहिती हस्तगत केली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०७-२००७ रोजी चुकीची व उशिरा माहिती मिळाल्याचे वाटल्याने प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून

सुनावणी न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १८-०७-२००७ रोजी त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती सशुल्क पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १८-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस आता नव्याने माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये काही ग्रामसेवकांचे पत्ते म्हणून, फक्त ते राहतात त्या गावांची नांवे दर्शविली आहेत. याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता या गावांची लोकसंख्या अतिशय कमी असल्याने व याच पत्त्यावर त्यांच्या कार्यालयातर्फे संबंधीत ग्रामसेवकांशी पत्रव्यवहार केला जात असल्याने त्यांच्याकडील उपलब्ध माहितीवरुन त्यांनी अपिलार्थीस त्यांचे पत्ते दिल्याचे आयोगास सांगितले. मात्र हे पत्ते चुकीचे कसे आहेत हे सिध्द करण्यासाठी अथवा जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही चुकीची आहे किंवा कसे हे कळण्यास कोणताही मार्ग नाही. आज रोजीची अपिलार्थीची आयोगासमोर सुनावणीसाठी असलेली अनुपस्थिती पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०७-२००७ रोजी माहिती पुरविली आहे हा त्यांचा युक्तिवाद मान्य करण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

- -

प्रत,

१ श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड, ३, संतोषी कृपा, आडगांव नाका, पंचवटी, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सहायक, पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६१६

निर्णय दिनांक २६-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. विजय धनजी चौधरी,<br>शिवाजीनगर, माणिक मास्तर चौक,<br>तालुका जिल्हा धुळे | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तळोदा,<br>तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपायुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभाग, नाशिक | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तळोदा, तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार

त्रयस्थ पक्ष : सहशिक्षक श्री. मोरे व आश्रमशाळा तलावडी संस्थेचे सचिव

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १६-०३-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न पुरविल्याने त्यांनी दिनांक १०-१०-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता ६० दिवसाचा कालावधी व्यपगत होऊनही त्यांना माहिती व अपिलावरील निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांचे व्दितीय अपील अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडे दिनांक १०-१०-२००६ रोजी केले होते. तथापि अपर आयुक्त हे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तळोदा यांच्याकडे त्यांच्या दिनांक १६-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविला. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील प्रकरणी निर्णय देण्यासाठी प्रकल्प अधिकारी हे सक्षम प्राधिकरण नेमले गेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रकल्प अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब, प्रकल्प अधिकारी एकात्मिक विकास प्रकल्प तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १०-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा सदर निर्णय मान्य न झाल्यास अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार ते राज्य माहिती आयोगाकडे सदरचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १०-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

- -

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विजय धनजी चौधरी, शिवाजीनगर, माणिक मास्तर चौक, तालुका जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय तळोदा, तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तळोदा, तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६१७

निर्णय दिनांक २६-०३-२००९

१ श्री. विशाल अशोक मोरे, अपिलार्थी
आहेर मास्तरांची चाळ, ५२ नं., मनमाड,
तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, केंद्रीय निवासी अनुसूचित जमाती माध्यमिक
आश्रमशाळा, मु. करवंदे, पो. हट्टी, तालुका सुरगाणा, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
केंद्रीय निवासी अनुसूचित जमाती माध्यमिक आश्रमशाळा, मु.
करवंदे, पो. हट्टी, तालुका सुरगाणा, जिल्हा नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. धमेंद्र आत्माराम वेताळ

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्वजण गैरहजर आहेत तर त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांचा माहितीसाठीचा अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी घेण्यासाठी नकार दिला त्यामुळे त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेले पत्र परत आले असून जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस माहिती देण्याचा विचार नसावा असे

- -

अपिलार्थीने अनुमान काढून त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मुख्याध्यापक, केंद्रीय निवासी अनुसुचित जमाती माध्यमिक आश्रमशाळा, मु. करवंदे, पो. हट्टी, तालुका सुरगाणा, जिल्हा नाशिक यांच्याकडे त्यांच्या शाळेच्या संदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती पोस्टाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने पोस्टाव्दारे अपेक्षिलेल्या माहितीचे टपाल संबंधितांनी स्वीकारण्यास नकार दिल्याने ते विनातामीली अपिलार्थीस परत प्राप्त झाले.

आज रोजी सुनावणीसाठी त्रयस्थ पक्ष, श्री. वेताळ धर्मेंद्र आत्माराम हे आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या शाळेकडे माहितीची मागणी केली आहे ती शाळा केंद्र शासनाच्या मदतीने एका स्वंयसेवी संस्थेमार्फत चालविली जात आहे. या स्वंयसेवी संस्थेस केंद्र शासनातर्फे सरळ निधी प्राप्त होत असतो. त्रयस्थ पक्षाने आयोगास अवगत करुन दिलेल्या या माहितीवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेल्या प्राधिकरणाची माहिती राज्य माहिती आयोगाकडे विचारली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती केंद्र शासनाच्या अखत्यारितील सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित आहे, या अपिलावर निर्णय घेण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगाला नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात येत आहे. अपिलार्थीस अपेक्षित माहिती ते केंद्रीय माहिती आयोग यांच्याकडे विचाराधीन अपिलासारखेच अपील करुन प्राप्त करुन घेऊ शकतील. केंद्रीय माहिती आयोगाचा पत्ता खालीलप्रमाणे आहे.

केंद्रीय माहिती आयोग,<br>
रुम नं. ४१५, चौथा मजला, ब्लॉक नं. - IV<br>
जुना जे. एन. यू. कॅम्पस,<br>
नवी दिल्ली - ११० ०६६.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

- -

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-०३-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विशाल अशोक मोरे, आहेर मास्तरांची चाळ, ५२ नं. मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, केंद्रीय निवासी अनुसूचित जमाती माध्यमिक आश्रमशाळा, मु. करवंदे, पो. हट्टी, तालुका सुरगाणा, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, केंद्रीय निवासी अनुसूचित जमाती माध्यमिक आश्रमशाळा, मु. करवंदे, पो. हट्टी, तालुका सुरगाणा, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५६
निर्णय दिनांक ३०-०३-२००९

१ श्री. नानासाहेब श्रावण आहोळ, : अपिलार्थी
रा. संगमनेर खुर्द, ता. संगमनेर,जि. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी, संगमनेर भाग-१,
क्षेत्रिय अधिकारी, (रोपवाटीका), संगमनेर खु.
जि.अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक,संगमनेर,
जि.अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०१.०६.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे टाळले व त्यांच्यावर माहितीचा अर्ज मागे घेण्यासाठी दबाव टाकला. तसेच त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दि. २३.५.२००८ पर्यंत न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या संदर्भात सन २००६ ते जानेवारी २००८ अखेरपर्यंतची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामावर असलेल्या मजूरांची संख्या व नावासह यादी, हजेरीपत्रकाच्या प्रती व जॉब कार्ड असलेल्या मजूरांची नावे व संख्या", -या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०२.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपवनसंरक्षक, अहमदनगर यांच्या कार्यालयात सादर केलेली असल्यामुळे ती, त्या कार्यालयात उपलब्ध होईल व त्यांच्या कार्यालयात असलेली हजेरीपत्रके पहाणीसाठी व त्याच्या छायाप्रती हव्या असल्यास रु.१००/- इतके शुल्क भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तद्नंतर परत दि. २८.२.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत हवी असल्याचे कळविल्यामुळे त्यांनी सदर माहितीपोटीचे शुल्क रु. १७७२/- इतके भरुन चलनाची प्रत कार्यालयास सादर करण्याबाबत तसेच सदरची माहिती गोळा करण्याबाबत दोन महिन्याचा कालावधी लागणार असल्याचे कळविले. यानंतर परत अपिलार्थीस दि. १२.३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहितीपोटीचे सदर शुल्क रु. १७७२/- चा तपशील अपिलार्थीस कळविला. यामध्ये प्रत्येक हजेरीपत्रकासाठी रु.१६/- याप्रमाणे एकूण ४४ हजेरीपत्रके व रु.७०४/- प्रवासभाडे व भत्त्यापोटी रु.१०६८/- असे मिळून एकूण रु.१७७२/- असा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविला. यानंतर अपिलार्थीस परत त्यांच्याकडील दि. १५.४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी यापूर्वी कळविलेले शुल्क रु.१७७२/- नजरचुकीने कळविण्यात आले असून माहितीपोटी रु.१४०८/- इतके शुल्क भरण्याचे कळवून चलनाने भरणा केल्यानंतर दोन महिन्याने माहिती

देण्यात येईल, असे अपिलार्थीस सूचित केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.११.३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपला निर्णय विहित कालावधीमध्ये न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कळविले होते, तथापि अपिलार्थीने सदरचे शुल्क न भरल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज करतेवेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नव्हती. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस उपवनसंरक्षक यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे दि. २३.२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचविले व त्यांच्या कार्यालयातील माहिती अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध असल्याचे कळविले व या माहितीच्या छायांकित प्रतीकरिता रु.१००/- इतके शुल्क अपिलार्थीस भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची या टप्प्यावरची सदर कृती चुकीची आहे, कारण अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध नव्हती तर त्यांनी, अपिलार्थीच्या अर्जाची प्रत, उपवनसंरक्षक कार्यालयाकडे, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठवून, त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. याचबरोबर अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रु.१००/- याचा सविस्तर तपशील, जो अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे कळविणे आवश्यक आहे, तो कळविणे

- -

अपेक्षित होते तथापि हा तपशिल त्यांनी अपिलार्थीस कळविला नाही. तदनंतर दि. २८.२.२००८ रोजी अपिलार्थीस माहितीपोटी भरावयाचे शुल्क चुकीचे कळविले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाने अधिनियमाद्वारे प्रतिपृष्ठ ठरविलेला दर अधिक टपालखर्च एवढेच शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून घेणे अभिप्रेत आहे. अर्जदारास माहिती देण्यासाठी काही इतर अनुषंगिक शुल्काची मागणी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराकडून करणे माहिती अधिकाऱ्यास अनुज्ञेय नाही. तदनंतर या शुल्काची दुरुस्ती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजेच, अधिनियमाद्वारे सशुल्क माहिती देण्याची विहित मुदत व्यपगत झाल्यानंतर, कळविली आहे. प्रत्येक वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस वेगवेगळया टप्प्यावर चुकीचा प्रतिसाद दिला गेला असल्याने व ज्यावेळी अपिलार्थीस योग्य शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी कळविली, त्यावेळी सशुल्क माहिती देण्याचा अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाला असल्याने, आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी लागेल. हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीच्या दि. ११.३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. सबब उपवनसंरक्षक, अहमदनगर यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

-　　　　-

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नानासाहेब श्रावण ओहोळ, रा.संगमनेर खूर्द, ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, संगमनेर भाग-१, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,संगमनेर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपवनसंरक्षक,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५७
निर्णय दिनांक ३०-०३-२००९

१ श्री. हितेंद्र प्रतापराव तोरडमल, : अपिलार्थी
मु.पो.ता.कर्जत,जि. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
उपअभियंता,
जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग कर्जत,
जि.अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपअभियंता,
जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग कर्जत,
जि.अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता,
जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग कर्जत,
जि.अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १३.६.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडील सन २००५-०६ या कालावधीत संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत कर्जत येथील पूर्ण झालेल्या साठवण बंधाऱ्याची माहिती हवी असल्याचे नमूद केले आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००५-०६ या कालावधीत कर्जत येथील संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या साठवण बंधाऱ्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "मजूरांचे हजेरीपत्रकाची साक्षांकित प्रत, संपूर्ण झालेल्या कामाची माहिती" या मुद्याचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, मात्र अपिलार्थीच्या दि. २३.०१.२००८ रोजीच्या अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अधिकाऱ्याच्या ताब्यात आहे, त्या शाखा अभियंता यांना दि. १२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे कळविले. तदनंतर संबंधित शाखा अभियंता यांनी उप अभियंता यांनी दि. १०.३.२००८,१७.३.२००८,२८.३.२००८ व ९.४.२००८ रोजी स्मरणपत्रे पाठविली, तथापि संबंधित शाखा अभियंता यांनी अपिलार्थीस अथवा उप अभियंता यांचे कार्यालयास आजतागायत माहिती पुरविल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. माहिती प्राप्त होण्याची मुदत संपून गेल्यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.३.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर कोणताही निर्णय घेतला नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

- -

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षतः ज्या शाखा अभियंता यांच्या ताब्यात होती, त्यांच्याकडून प्राप्त न झाल्याने ते आजतागायत अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी हे शाखा अभियंता असून उपअभियंता हे जन अपिलीय अधिकारी आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, अपिलार्थीचा अर्ज उपअभियंता यांना ज्यावेळी प्राप्त झाला त्यावेळी संबंधित शाखा अभियंता यांच्याकडे उपलब्ध होती. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३)(एक) प्रमाणे उपअभियंता यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत, हा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत संबंधित शाखा अभियंता यांच्याकडे पाठविणे भाग होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही कृती न करुन शाखा अभियंत्यास अपिलार्थीचा दि. २३.१.२००८ रोजीचा अर्ज दि. २८.१.२००८ रोजी अगर तत्पूर्वी पाठविण्याऐवजी दि. १२.२.२००८ रोजी पाठविला, म्हणजेच या टप्प्यावर खुद्द उपअभियंता यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीकरिता १४ दिवसांचा विलंब लावला. या विलंबाचे जन माहिती अधिकारी आज कोणतेही कारण समर्थन करु शकत नाहीत. शाखा अभियंता यांनी यावरही कडी करुन उपअभियंता यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपअभियंता यांच्याकडून अनेक स्मरणपत्रे पाठवूनही दिली नाही. याचा परिणाम म्हणजे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित राहिले आहेत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे असे दिसून येते. ही माहिती मागण्याचा अपिलार्थीस अधिनियमातील कलम ३ प्रमाणे हक्क आहे व अधिनियमातील कलम ७ प्रमाणे अपिलार्थीस सदर माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी हे बांधील आहेत. अपिलार्थीस आज रोजी सव्वा वर्षाचा कालावधी व्यपगत

होऊनही, माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी सुरु होऊन, तीन वर्षाचा कालावधी लोटल्यानंतरही, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसारखी साधी माहिती सार्वजनिक प्राधिकरणाकडून मिळू शकत नाही, एवढेच नव्हेतर, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्याचा, अधिनियमातील कलम ७(१) नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तीस दिवसांच्या कालावधी त्यांच्यावर बंधनकारक आहे, ते शुल्क देखील संबंधितांकडून अपिलार्थीस कळविले गेले नाही, ही एकप्रकारे माहिती अधिकाराची शोकांतिका आहे, असे नमूद केल्यास वावगे होणार नाही. माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे व जनसामान्यांना माहिती प्राप्त करुन घेण्याचा हक्क प्राप्त होण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाचा कारभार अधिक पारदर्शक होण्यासाठी माहिती अधिकार अधिनियम अंमलात आला परंतु विचाराधीन प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा बेमुवर्तखोर वर्तनाद्वारे या अधिनियमाला एकप्रकारे आव्हान दिले गेले आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे अपिलार्थीचा माहिती प्राप्त होण्याचा हक्क संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय डावलल्याने ते निश्चितपणे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी एक संधी म्हणून त्यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

- -

अपिलार्थीस माहिती देण्याचे संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त कालावधीत अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्यास त्यांनी अधिनियमातील कलम १८ खाली राज्य माहिती आयोगाकडे तक्रार करावी, म्हणजे सदरचे प्रकरण त्रयस्थ सक्षम यंत्रणेकडे तपासणीसाठी देऊन आयोगास योग्य ती कार्यवाही करता येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती साक्षांकित करुन त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
३. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : ३०-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हितेंद्र प्रतापराव तोरडमल, शहाजीनगर मु.पो. ता.कर्जत, जि.अहमदनगर

- -

२. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता,जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग कर्जत,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (रजिस्टर्ड पोस्टाने)

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता,जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग कर्जत,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५८
निर्णय दिनांक ३०-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बाळासाहेब भिवसेन काटे,<br>रा.आखेगाव डोंगर,ता.शेवगाव जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक संचालक,<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिक कार्यालय, नाशिक.<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिक कार्यालय, नाशिक. | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्षः श्री. गणेश बाळासाहेब काटे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १६.६.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १९.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ०४.०४.२००८ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

- -

अधिकारी यांच्याकडे, - त्रयस्थ पक्ष श्री. गणेश बाळासाहेब काटे यांच्या जुलै, २००५ मध्ये फिटर ट्रेडच्या दिलेल्या परीक्षेतील सर्व पेपर/उत्तरपत्रिकांच्या नकला व मार्क्सशीटची साक्षांकित प्रत,- अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०२.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४२/- चलनाद्वारे भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७.१.२००८ रोजी केला. सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दि. १.२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली परंतु या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१९.३.२००८ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ०४.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस जुलै, २००५ मधील गुणपत्रिकेची प्रत देण्याचे सूचित केले.जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ९.४.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ४.४.२००८ रोजीच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये सादर केलेले त्यांचे निवेदन हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दि. १.२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस जुलै, २००७ मध्ये त्रयस्थ पक्षाने दिलेल्या परीक्षेचे गुणपत्रक पुरविले व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम सुनावणीत झालेल्या निर्णयानंतर

-                                                  -

दि. ९.४.२००८ रोजी जुलै, २००५ च्या अपिलार्थीच्या मुलाच्या गुणपत्रिकेची प्रत अपिलार्थीस पुरविण्यात आली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांचा वरील युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जुलै, २००५ ची गुणपत्रिका मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्षात, आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर, जुलै, २००७ ची गुणपत्रिका अपिलार्थीस पुरविली व तदनंतर प्रथम अपिलावर निर्णय झाल्यानंतर अपिलार्थीस दि. ९.४.२००८ रोजी जुलै, २००५ मधील परीक्षेची गुणपत्रिका पुरविली. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस प्रथमतः जुलै, २००७ ची गुणपत्रिका दिली व तदनंतर जुलै, २००५ ची गुणपत्रिका जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी सूचित केल्याप्रमाणे माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती नसल्याने ती चुकीची ठरते. या प्रकरणी अपिलार्थीस अंतिमतः त्यांनी मागणी केलेली माहिती ही जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिलेल्या निर्णयानंतर दि. ९.४.२००८ रोजी प्राप्त झाली, जी विहित मुदतीनंतर प्राप्त झाली. अपिलार्थीस प्रथमतः दिशाभूल करणारी माहिती पुरवून नंतर विलंबाने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली गेली असल्याने अपिलार्थीस प्रत्यक्षात विनामूल्य माहिती देय होत आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क रु. ४२/- स्वीकारलेले आहे. अपिलार्थी विनामूल्य माहिती प्राप्त होण्यासाठी अशाप्रकारे पात्र ठरले आहेत.त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.४२/- अपिलार्थीस परत करणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क

-

-

रु.४२/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत परत करावे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती आता प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.४२/- त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत परत करावे.

**अहमदनगर**
**दिनांक : ३०-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब भिवसेन काटे,मु.पो.आखेगाव डोंगर, ता.शेवगाव जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५९
निर्णय दिनांक ३०-०३-२००९

१ श्री. अर्जुन नानासाहेब सोळुंके, : अपिलार्थी
रा.माळुंजे, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
पोलीस निरीक्षक,
राहुरी पोलीस स्टेशन,
जि.अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस निरिक्षक, राहुरी पोलीस स्टेशन,
जि.अहमदनगर.

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त पोलीस अधीक्षक,
अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत,तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २२.४.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली, ग्राम पंचायतीने ठराव देऊनही एका महिन्यात आरोपी, शिवाजी मुरलीधर परदेशी यांच्यावर कारवाई केली नाही, दि. ५.६.२००७ रोजी रात्री अपिलार्थीची मोटार सायकल त्यांच्या दारासमोर फोडली, त्याचा पोलीसांनी पंचनामा व सुलेनामा व आरोपीच्या नावे असलेली

केस याची प्रत दिली नाही तसेच पी.आय. श्री.एम.एम. बागवान यांनी त्यांची मानहानी केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च, २००७ ते दिनांक २९ मार्च, २००८ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "अपिलार्थीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे केल्या गेलेल्या कारवाईचा तपासणी अहवाल, सुलेनामा झालेल्या रजिस्टरच्या झेरॉक्स व सहया केलेल्या व अपिलार्थीच्या स्वाक्षरीचा रिपोर्ट व ग्रामसभेतील शिवाजी मुरलीधर परदेशी यांचा लोकांच्या सहयांचा अहवाल" इत्यादी मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर लागलीच दोन दिवसांत दि. ३१.३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) नुसार प्रथम अपील केले. या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे अतिरिक्त पोलीस अधीक्षक, अहमदनगर असून अपिलार्थीने दि. ३१.३.२००८ रोजी केलेला प्रथम अपील अर्ज हा जन माहिती अधिकारी यांनाच उद्देशून केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा हा अपील अर्ज अतिरिक्त पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांच्याकडे पाठविला नसल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्रत्यक्षात सुनावणी होऊ शकली नाही अथवा यासंदर्भात कोणतेही निर्णय पारित केले गेले नाहीत. सबब पोलीस निरीक्षक, राहुरी पोलीस स्टेशन यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीचा दि. ३१.३.२००८ रोजीचा त्यांच्याकडे प्राप्त झालेला प्रथम अपील अर्ज, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत पाठवून द्यावा व अतिरिक्त पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या प्रथम

अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन,हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आपले अंतिम निर्णय घ्यावेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.३१.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ३०-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अर्जुन नानासाहेब सोळुंके, रा.माळुंजे खुर्द, ता.राहुरी जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, राहुरी पोलीस स्टेशन, राहुरी,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना अपिलार्थीच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह,या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६०
निर्णय दिनांक ३०-०३-२००९

१ सौ. मिरा अरुण कार्ले, : अपिलार्थी
रा.चिखली, ता.श्रीगोंदा जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : सचिव, श्रीगोंदा, तालुका कृषि सेवा संघ, चिखली,
जि.अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहे.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दिनांकाची नोंद नसलेले राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २७.२.२००८ रोजी पुरविण्यात आलेली माहिती ही अपूर्ण असून काही प्रमाणात ती खोटी आहे. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी ते स्वत:

- -

हजर असूनही व सुनावणीच्या दिवशी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयासमोर कामाच्या वेळेपर्यंत उपस्थित असूनही त्यांची अनुपस्थिती नोंदविली गेली व जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला. तसेच अपिलासोबत त्यांनी दाखल केलेली कागदपत्रे मागितल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्या कागदपत्रांचा नाश होण्याच्यादृष्टीने रसायन टाकून त्यांना दि. १५.४.२००८ रोजी सदर कागदपत्रे परत करण्यात आली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्रीगोंदा तालुका कृषि सेवा संघ या संस्थेच्या खंडेश्वर माध्यमिक विद्यालय, कोथुळ व म्हसे माध्यमिक विद्यालय,म्हसे या दोन विद्यालयांशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "या दोन्ही विद्यालयाना माहिती अधिकारी यांनी दिलेल्या टक्केवारी अनुदानाचे आदेश, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलेल्या मान्यतेचे आदेश, संस्थेने सादर केलेले शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नेमणूक आदेश व रुजू रिपोर्ट आणि जन माहिती अधिकारी यांनी जेवढी माहिती उपलब्ध करुन दिली, तेवढया माहितीच्या आशयाचे पत्र या कागदपत्रांच्या प्रमाणित छायाप्रती", -या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आढळून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांच्याकडे, जे या प्रकरणी प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत,त्यांच्याकडे पाठविला होता, तथापि यासंदर्भात त्यांच्याकडे कोणताही ठोस पुरावा आयोगासमोर दाखविण्यासाठी आज रोजी उपलब्ध नाही, असे आयोगास दिसून आले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २९.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

- -

प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १.४.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील, अपिलार्थी हे गैरहजर असल्याने फेटाळून लावल्याचे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे नमूद केले व जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही खोटी असल्याचे आपले अभिप्राय त्यांच्या युक्तिवादामध्ये व्यक्त केले.जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती त्यांना खोटी का वाटते, असे आयोगाने अपिलार्थीस विचारले असता त्यांनी आयोगास असा खुलासा केला की, जन माहिती अधिकारी यांनी एकाच क्रमांकाच्या व दिनांकाच्या आदेशावर अनेक व्यक्तिंच्या नेमणूकीस मान्यता दिली असल्याने त्यांना सदर माहिती खोटी वाटते.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी म्हणतात तशा प्रकारचा कोणताही प्रकार त्यांच्याकडे घडलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे पुढें अवगत केले की, मान्यतेच्या आदेशाची मूळ नस्ती शिक्षण विभागातर्फे संबंधित संस्थेस परत केली जाते, त्यामुळे यासंदर्भातील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित जन माहिती अधिकारी हे संबंधित शाळेचे मुख्याध्यापक असल्याने अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधित शाळेचे मुख्याध्यापकाकडे पाठविली होती. मात्र जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या युक्तिवादापृष्ठयर्थ आयोगास कोणताही पुरावा सादर करता आला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस आजही विनामूल्य देण्यास तयार असल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने एकूण ४ मुद्यांद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी

- -

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील शेवटचा मुद्दा , "आपण जेवढी माहिती उपलब्ध करुन दिली, तेवढया माहितीच्या आशयाचे पत्र " ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती द्यावयाची असते. अपिलार्थीस जी माहिती दिली आहे, त्या माहितीच्या आशयाचे पत्र करण्याची अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना विनंती करणे व तिचा, "आवश्यक माहिती" या सदराखाली उल्लेख करणे ही अपिलार्थीची कृती चुकीची आहे. अपिलार्थीची या मुद्यावरील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने अपिलार्थीस देय होत नाही. मात्र उर्वरित तीनही मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे संस्थेकडील संबंधित नस्ती उपलब्ध नसेल तर त्यांनी ती संस्थेकडून आता प्राप्त करुन घ्यावी व अपिलार्थीस संबंधित माहिती द्यावी. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २५.१.२००८ रोजीच्या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिल्याचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर सादर करु शकत नाहीत, अशाप्रकारच्या त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

-　　　-

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. मिराबाई अरुण कार्ले, मु.पो.चिखली, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६१
निर्णय दिनांक ३०-०३-२००९

१ श्री. शेख महंमद अय्युब महंमद याकूब, : अपिलार्थी
जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
लोकशाही दिन विभाग,
महानगरपालिका,अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.),
महानगरपालिका, अहमदनगर
प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : नगररचनाकार,
महानगरपालिका,अहमदनगर
त्रयस्थ पक्ष : श्री. मो.याकूब उमर बागवान

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहे.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २१.०५.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

विचाराधीन अपील अपिलार्थीने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दि. ११.४.२००८ रोजी प्राप्त झालेल्या प्रथम अपिलावरील निर्णयाच्याविरुध्द केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांची कशाप्रकारे दिशाभूल करुन चुकीची माहिती दिली हे जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले

- -

आहे, तरीदेखिल जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन अपिलार्थीचे अपील बेकायदेशीररित्या फेटाळून लावले आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये त्यांच्या अर्जातील मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने, "दि. ०४.२.२००८ रोजी लोकशाही दिनी (क्र.३,टोकन क्रमांक ५४) केलेल्या तक्रार अर्जाबाबत कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास का? केव्हा करणार ? इ. बाबतची संपूर्ण माहिती" अशी माहिती प्रमाणित प्रतीत मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने दि. ४.२.२००८ रोजी लोकशाही दिनामध्ये केलेला अर्ज जन माहिती अधिकारी यांनी निकाली काढून दप्तरी दाखल केले असल्याचे कळविले व संबंधित पत्राची छायाप्रत अपिलार्थीस पुरविली. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या अशाप्रकारच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १७.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ४.४.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्याप मिळाली नसल्याचा युक्तिवाद केला. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. १२.३.२००८ रोजी पुरविली आहे.

-                                   -

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे. या प्रतिसादाद्वारे त्यांनी अपिलार्थीच्या, त्यांनी लोकशाही दिनी केलेल्या दि. ४.२.२००८ रोजीच्या अर्जावरील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला अंतिम निर्णय अपिलार्थीस कळविला आहे. मात्र हा निर्णय अंतिम करीत असताना तो कोणत्या कागदपत्रांच्या आधारे अंतिम करण्यात आला, त्या कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या नाहीत. कोणाही अर्जदाराच्या अथवा तक्रारदाराच्या अर्जावर अंतिम निर्णय घेत असताना सदर अर्जाशी संबंधित सर्व अधिकारी आपले अभिप्राय संबंधित विषयाच्या नस्तीवर नोंदवित असतात व अशा अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या एकूण सर्व अभिप्रायांवर आधारित सक्षम प्राधिकरण हे निर्णय घेत असते. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस संदर्भिय अर्जावर अंतीम निर्णयाप्रत येण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी ज्या कागदपत्रांचा आधार घेतला होता. त्या कागदपत्रांच्या प्रती, अपिलार्थीच्या अर्जावर निर्णय घेत असताना सर्व संबंधितांनी संबंधित अभिलेख्यावर दिलेले अभिप्राय यांच्या प्रती अपिलार्थीस उघड केल्याने अपिलार्थीस त्यांच्या अर्जावरील जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाची कारणमिमांसा ज्ञात होईल, सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीचा दि.०४.०२.२००८ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या अर्जास अनुसरुन संबंधित प्राधिकरणाकडे केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या, त्यांच्या कार्यालयाच्या टिपणीच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीमध्ये, "कार्यवाही केली नसल्यास का केली नाही व केव्हा करणार?" अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत असल्याने व या व्याख्येच्या

व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नसल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय होणारी संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : ३०-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख महंमद अय्युब महंमद, घ.नं.१७९०, करशेटजी रोड, रामचंद्र खुंट, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार,महानगरपालिका,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६२
निर्णय दिनांक ३०-०३-२००९

१ श्री. प्रसाद पांडुरंग जोशी, अहमदनगर. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय,अहमदनगर : प्रतिवादी
२ जन अपिलीय अधिकारी गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय,अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्राध्यापक, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय,अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : प्राचार्य, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय,अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १०.०७.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कुठलाही आदेश प्राप्त झालेला नाही.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जून २००२, ते मार्च, २००८ या कालावधीतील त्यांच्या महाविद्यालयामध्ये जमा केलेल्या अनामत रकमाविषयी काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर त्यांच्या नावावर जमा केलेली ग्रंथालय, प्रयोगशाळा व इतर अनामत रक्कम व तारीख याचा तपशील, अनामत रक्कम जमा करण्यासंबंधी व ती ठेवून घेण्याचे नियम व अर्ज दिलेल्या तारखेपासून अंतिम रक्कम विद्यार्थ्यांना परत मिळण्याचा कालावधी आणि अपिलार्थीने जमा केलेली रक्कम त्यांनी अर्ज करुनही अद्यापपावेतो परत न करण्याची कारणे" या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि सदरचे पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०६.२००८ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळीच माहिती पुरविली आहे. मात्र त्यांनी ही बाब जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करताना लपवून ठेवली आहे. त्याचबरोबर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कार्यालयीन वेळेत भेटून माहिती घेण्याचे सूचित केले.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगास त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून त्यामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ व विलंब केल्याने अधिनियमातील कलम २० नुसार शास्तीची व शिस्तभंगाची कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

- -

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहिती अपेक्षिली असल्यामुळे अपिलार्थीस त्यांनी दि. १०.४.२००८ रोजीच्या प्रथम पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात हजर राहिले नाहीत. अशाच प्रकारची तक्रार त्यांच्याविरुध्द अपिलार्थीने ग्राहक पंचायतीकडे केली असून अपिलार्थीस देय असलेली रक्कम संस्थेने धनादेशाद्वारे ग्राहक पंचायतीकडे जमा केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले व यापृष्ठयर्थ त्यांनी अनामत रकमेची मूळ प्रत आयोगास दाखविली, याचबरोबर त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अनामत रकमा जमा करणे व त्या परत करणे या प्रक्रियासंदर्भात संस्थेने कोणतेही नियम  अथवा कार्यपध्दती निश्चित केलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण ३ मुद्यांशी संबंधीत माहितीची मागणी केली होती. त्यातील मुद्दा क्र. ३ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुनही त्यांनी अनामत रक्कम परत न देण्याची कारणे, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. या मुद्यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेली ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होत नाही. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल कारणे, स्पष्टीकरण अथवा खुलासा मागणे अशाप्रकारची प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती मूळात देय होत नाही. उर्वरित मुद्दा क्र.२ च्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत सदर माहिती देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या उर्वरित दोन मुद्यांवरील माहिती त्यांनी

स्वतःकडे तीन दिवसात तयार करुन ठेवावी व अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः जाऊन ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या कोणत्याही प्रतिनिधीस देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची व शास्ती लावण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे, यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे निःसंशयपणे टाळले असल्याचे अथवा ही माहिती अपिलार्थीपासून दुष्ट हेतूने दडवून ठेवले असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नाही, कारण त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास लागलीच दुसऱ्या दिवशी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेण्याचे त्यांनी सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी हे पत्र अपिलार्थीस दि. १०.४.२००८ रोजी पाठविल्याची नोंद त्यांच्याकडील जावक नोंदवहीत आहे. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे या प्रकरणी ही नोंद जावक नोंदवहीमध्ये घुसडली असावी, असे सिध्द होत नाही. या सर्व कारणास्तव जन माहिती अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्याची अपिलार्थीची विनंती आयोगास मान्य करता येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली देय होणारी, निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

- -

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३०-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रसाद पांडुरंग जोशी, फ्लॅट नं.६, व्यंकटेश अपार्टमेंट, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अहमदनगर-४१४ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक,गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले क्र.६३/०८,६४/०८ व ६५/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६३,६४ व ६५
निर्णय दिनांक ३०-०३-२००९

१ श्री. अहिरे अमृत पुंजाराम, संगमनेर, जि.अहमदनगर. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक आयुक्त,
आदिवासी विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य,नाशिक. : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहआयुक्त,
आदिवासी विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहायक प्रकल्प अधिकारी,
आदिवासी विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : सहायक आयुक्त,
आदिवासी विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, नाशिक

त्रयस्थ पक्षः अपील क्र.६३/०८ श्रीमती व्ही. डी.गायकवाड (गृहपाल)
अपील क्र.६४/०८ श्री. व्ही.बी.कांबळे
अपील क्र.६५/०८ श्री. ए.बी.रामटेके

**निर्णय**

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक ३०.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

- -

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.०६.२००८ रोजी नोंदविलेली तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीने दि. २९.८.२००७ रोजी एकाच विषयावर तीन स्वतंत्र अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. तदनंतर दि. १६.१०.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिले केली व दि. ३.६.२००८ रोजी आयोगाकडे तीनही प्रकरणी स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली. अपिलार्थीने ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे, ते जन माहिती अधिकारी या तीनही प्रकरणाशी संबंधित असल्यामुळे या तीनही अपिलांवर एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

**<u>अपील क्र. ६३/२००८:</u>**

या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती व्ही.डी.गायकवाड (गृहपाल) यांच्या संदर्भात एकूण पाच मुद्यांद्वारे माहितीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०४.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस रु.३९/- इतके शुल्क त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी भरणा करण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.१०.२००७ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.१०.२००७ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार १६.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०५.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन आयुक्तालयातील जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील उपलब्ध माहिती देण्याचे सूचित केले व उर्वरित माहिती

शासनस्तरावरील असल्याने अपिलार्थीस शासनाकडे पत्रव्यवहार करण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने विचाराधीन अपील क्र. ६३/०८ आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांना आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या अर्जासंदर्भातील माहिती पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे मान्य केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, या अर्जातील ुद्दा क्र. २ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस अंशतः देय होते. मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. थोडक्यात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस श्रीमती व्ही.डी.गायकवाड यांच्या वर्ग-२ पदावरील पदोन्नती आदेशाची प्रत दि. ६.१०.१९९३, त्यांच्या मूळ सेवापुस्तिकेतील नोंद व श्रीमती गायकवाड यांना वर्ग-२ पदावरील दि. १३.६.२००० रोजी पदावनत करण्यात आलेल्या आदेशाची प्रत ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने याच अर्जामध्ये श्रीमती गायकवाड यांना दि. १०.८.२००७ रोजी कोणत्या नियमाच्या आधारे व कोणत्या बिंदूवर त्यांचा फेरविचार केला, याच्या तपशीलाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. वास्तविक पाहता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडेच उपलब्ध असताना, ही माहिती अपिलार्थीस त्यांनी का दिली नाही, याचे कारण उपस्थित जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी अपिलार्थीने अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नसल्याचे आयोगास सांगितले.

उपरोक्त प्रकरणी माहिती उपलब्ध असतानाही अपिलार्थीस माहिती न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त (आदिवासी विकास) यांना संबंधित जन माहिती अधिकारी

-                                    -

यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**<u>अपील क्र. ६४/२००८:</u>**

या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. २९.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. व्ही.बी. कांबळे यांच्या सद्यस्थितीचा सेवाजेष्ठता क्रमांक कोणता आहे, याची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस देय नसल्याचे अपिलार्थीस कळविले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर असे दिसून आले आहे की, अपिलार्थीस दि. १४.५.२००७ रोजीच्या आदेशान्वये सेवाजेष्ठता क्र. १०६ (दि.६.१०.१९९३) इतका दिला आहे तर दि. ६.८.२००७ अन्वये हाच क्रमांक ७३ असा दर्शविला आहे आणि अपिलार्थीस यापैकी त्यांनी अर्ज करतेवेळी त्रयस्थ पक्षाचा सेवाजेष्ठता दिनांक निश्चितपणे किती आहे, याची माहिती हवी आहे. अपिलार्थीने त्यांच्या निश्चित सेवाजेष्ठता क्रमांकासंदर्भात आयुक्तालयाकडे त्यांचे एक निवेदन सादर केले असून अपिलार्थीच्या सेवाजेष्ठतेसंदर्भात त्यावर आयुक्तालयाकडून निर्णय घेण्यात येणार आहे. यासंदर्भात अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने ज्या विषयावर माहितीची मागणी केली आहे, त्याविषयाशी संबंधित अभिलेखे पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिल्यास, अपिलार्थीच्या मनातील शंकांचे निरसन होण्यास मदत होऊ शकेल. सबब अपिलार्थीस असे सूचविण्यात येते की, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित

- -

अभिलेख्यांची तपासणी करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत स्वतंत्र अर्ज करावा व या प्रकरणाशी संबंधित अभिलेख्याची पाहणी करुन आपल्या शंकांचे निरसन करुन घ्यावे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>अपील क्र. ६५/२००८:</u>**

उपरोक्त अपील प्रकरणाशी संबंधित दि. २९.८.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे अपिलार्थीने सर्वप्रथम जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. ए.बी.रामटेके (गृहपाल) यांच्या सेवा नियमित करणाऱ्या, दि. ०३.०७.१९९८ रोजीच्या आदेशाची छायांकित प्रत, श्री. रामटेके यांचा राज्यस्तरीय सेवाजेष्ठता क्रमांक व दिनांक, श्री.रामटेके (गृहपाल) यांना दि. १४.२.२००१ मध्ये पदोन्नती देताना स्थान का देण्यात आले नाही किंवा पदोन्नती का दिली नाही व श्री. रामटेके, गृहपाल यांनी दि. १०.८.२००७ रोजी पदोन्नती देताना कोणती सेवाजेष्ठता सूची, कोणती राज्यस्तरीय सेवाजेष्ठता तारिख विचारात घेण्यात आली व का? याच्या तपशीलासह, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले, यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अनुसार दि. १६.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरिल परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या अर्जासंदर्भात कोणती माहिती प्राप्त झाली नसल्याचे व या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास सांगितले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांना पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास ते तयार असल्याचे आयोगास अवगत केले.

-                                   -

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने देय ठरते, मात्र मुद्दा क्र. ३ द्वारे अपिलार्थीने विचारलेली, "श्री. रामटेके (गृहपाल) यांना दि. १४.२.२००१ मध्ये पदोन्नती देताना स्थान का देण्यात आले नव्हते किंवा पदोन्नती का दिली नाही," ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दल कारणे अथवा खुलासे अपेक्षित करणारी माहिती विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबाबत अर्जदाराकडे स्पष्टीकरण देणे अशाप्रकारची प्रक्रिया अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. या अर्जातील, अपिलार्थीने श्री. रामटेके, गृहपाल यांना पदोन्नती देताना कोणत्या बाबी विचारात घेतल्या याची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या टिपणीवरुन प्राप्त करुन घेता येईल. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांना अपेक्षित असलेली माहिती माहितीच्या या अभिलेख्यांची तपासणी त्यांनी केली असता, मिळू शकेल, याकरिता त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळयाने माहितीसाठीचा अर्ज करावा. उर्वरित माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांना उर्वरित दोन्ही मुद्यावरील माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची उपरोक्त अपील क्र. ६३/०८ व अपील क्र. ६५/०८  अंशतः मान्य करण्यात येत असून अपील क्र. ६४/०८ निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. ६३/०८ व ६५/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, अपील क्र. ६३/०८ व ६५/०८ शी संबंधित त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, देय होणारी, निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अपील क्र.६४/०८ निकाली काढण्यात येत आहे.

४. अपील क्र.६३/०८ च्या संदर्भात आयुक्त, आदिवासी विकास यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ३०-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अमृत पुंजाराम अहिरे, आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह,सहयाद्री कॉलेजच्यामागे, संगमनेर जि,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी,आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,आदिवासी विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, नाशिक -यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (आदिवासी विकास),आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

-                -

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९६
निर्णय दिनांक ३०-०३-२००९

१ श्री. अशोक बाबूराव सौदागर, : अपिलार्थी
जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प विभाग,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प विभाग,
अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.१
अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३०.६.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द केल्याचे म्हटले आहे व जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०१.०१.२००७ ते ३०.०१.२००८ या कालावधीत अहमदनगर ते कोपरगाव रस्ता बांधकामाच्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. २१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून, नगर-कोपरगाव रस्त्यावरील १२७/५००, १२८/५००, १२४ व १५०/६००,१२३/५०० यावरील पूल बांधकामाचे व डिझाईन संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. याच अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ति असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पाहणीसाठी उपस्थित राहण्याचे सूचित केले. अपिलार्थीने माहितीची नोंदणीकृत टपालाद्वारे मागणी केली असता, माहिती दाखविण्याचे कारण काय, याची विचारणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली असता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ड्रॉईंगवर उपलब्ध असून ही ड्रॉईंगची कागदपत्रे अपिलार्थीला समजणार नाहीत, असे वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील ड्रॉईंग पाहण्याचे व तदनंतर त्यातील तरतुदी समजावून सांगण्याचे योजले, असे त्यांनी आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्या या कथित माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०३.२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीचे प्रथम अपील, अपिलार्थीने त्यांच्याकडील अपील अर्जावर कोणताही स्टॅम्प लावला नाही आणि ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ति नसल्याचे निदर्शनास आल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

-　　　　-

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज करतेवेळी १९९७-९८ सालच्या दारिद्रयरेषेखालील क्रमांकाचे संबंधित ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र सादर केले होते. तथापि दारिद्रयरेषेखालील व्यक्तींची २००२-२००७ च्या सर्वेक्षणाप्रमाणे केलेली यादी, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी अंतिम करण्यात आली होती व त्यामध्ये अपिलार्थीचे नाव नव्हते, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. सुधारित यादीमध्ये अपिलार्थीचे नाव नाही, याबाबत, त्यांना तहसीलदार, राहुरी यांच्याकडील दि. ११.४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे ज्ञात झाले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की,अपिलार्थीने माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर ते दारिद्रयरेषेखालील असल्याचे नमूद केले होते व त्यासोबत संबंधित ग्रामसेवकाचा दाखला सादर केला होता. या दाखल्यामध्ये ग्रामसेवकाने दिलेला संदर्भ हा १९९७-९८ या सालाच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्तींच्या यादीशी निगडीत आहे. मात्र अपिलार्थीने दि. २८.१.२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर त्यांच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याच्या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिक तपासणी केली असता, त्यांना असे आढळले आहे की, अपिलार्थीचे नाव हे २००२-२००७ या कालावधीतील दारिद्रयरेषेखालील यादीमध्ये समाविष्ट नाही. या संदर्भात पुरावा मागितला असता, ग्रामसेवकाने तहसीलदार यांना दिलेल्या दि. २९.३.२००८ व तहसीलदार, राहूरी यांनी दि. ११.०४.२००८ रोजी कार्यकारी अभियंता यांना दिलेल्या या दोन पत्राच्या सत्यझेरॉक्स प्रती आयोगास सादर केल्या असून अपिलार्थी हे अर्ज करतेवेळी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नव्हते, मात्र ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याची खोटी माहिती त्यांनी प्रथम अर्ज करतेवेळी सादर केल्यामुळे अपिलार्थीचे अपील

फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ३०-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक बाबुराव सौदागर, मु.पो.गुहा, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.१,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जागतिक बँक प्रकल्प विभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९७
निर्णय दिनांक ३०-०३-२००९

१ सौ. सुनिता बाळासाहेब सानप, : अपिलार्थी
रा. लोणी बु. ता.राहाता,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),
जिल्हा परिषद, अहमदनगर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : अधीक्षक,
ग्रामपंचायत विभाग,
जिल्हा परिषद, अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),
जिल्हा परिषद, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०३.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २४.७.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी त्यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त झालेला नाही व तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती विहित

- -

मुदतीत प्राप्त झालेली नाही. या अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ग्राम पंचायत, हसनापूर, ता.राहाता यांनी केलेल्या कर विसंगती व दप्तर दिरंगाई व फाईल निपटारा कायद्याखालील कार्यवाहीची मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.६.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, अपिलार्थीच्या दि. १३.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर प्रथमतः सुनावणी घेणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते.

सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. १३.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन,हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आपले अंतिम निर्णय पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

- -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१३.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ३०-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुनिता बाळासाहेब सानप, मु.साईसागर निवास, इंजिनिअरींग कॉलेजरोड, लोणी बू., ता.राहाता, जि.अहमदनगर-४१३ ७३६.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,ग्रामपंचायत विभाग,जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना अपिलार्थीच्या दि. १३.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१११
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

१ श्री. बाबूराव माधवराव कडलग, : अपिलार्थी
मु.पो.जवळे कडलग,ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
संगमनेर, जि.अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक भूमी अभिलेख,
अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०९.०६.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०६.२००८ रोजी नोंद झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन महिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही केली नाही, त्यांचे दि. २४.३.२००८ रोजीच्या अर्जाप्रमाणे त्यांना माहिती पुरविली नाही व अपिलार्थीची दिशाभूल करण्याचा जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केला. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

-                                         -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "मौ.जवळे कडलग ता.संगमनेर येथील मिळकत स.नं. १५६/८ करिता संगमनेर या कोर्टात रे.मु.नं. १३२/०५ हा दावा दाखल केला, त्यातील हुकूमनाम्याप्रमाणे दि. १६,१७ नोव्हेंबर,२००७ रोजी स.१०.०० वा. मोजमाप केले,त्याचा रिपोर्ट" ही माहिती व्यक्तिशः व नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.५.२००८ रोजी निर्णय दिला. या निर्णयाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. १६.११.२००७ रोजीच्या मोजणी आलेखाची नक्कल त्वरित विनामूल्य पुरविण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जावर त्यांनी दि. २६.३.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सदर मोजणी प्रकरण मा.सिव्हिल जज, संगमनेर यांच्याकडे सादर केल्याचे कळविले. तसेच अपिलार्थीने अपेक्षित असलेल्या मोजणी अभिलेख्याची नक्कल त्यांनी दि. ३१.५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे व दि. २४.३.२००९ रोजी व्यक्तिशः हस्तांतरित केली. अपिलार्थीस सदर मोजणीची नक्कल दि. २४.३.२००९ रोजी प्राप्त झाल्याची अपिलार्थीची दि.

-                    -

२४.३.२००९ रोजीची पोच पावती आयोगास सादर केली. यावरुन अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे "दि. १६ व १७ नोव्हेंबर, २००७ रोजी सकाळी १० वा.मोजमाप केले,त्याचा रिपोर्ट" ही माहिती मागितली होती. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लागलीच दि. २६.३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली. मात्र प्राप्त माहितीसंदर्भात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्यांना निश्चितपणे कोणती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, याचा प्रथम उल्लेख अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीमध्ये केला. अपिलार्थीने प्रथमतः जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या त्यांच्या प्रथम अपील अर्जामधील सुनावणीच्यावेळी झालेल्या युक्तिवादामध्ये त्यांना आलेखाची प्रत मिळाली नाही, हा मुद्दा नव्याने उपस्थित केला, या वेळेपर्यंत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोठेही आलेखाची प्रत मागितल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. थोडक्यात, अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीची मांडणी त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्रथम अर्ज करताना व्यवस्थितपणे केली नाही, मात्र निश्चित अपेक्षित माहितीची मागणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी प्रथमतः केली. वास्तविक पाहता ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेगळया अर्जाद्वारे देय होते. तथापि अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये उल्लेख नसतांनाही जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीची ही वाढीव माहितीची मागणी, त्यांना संदर्भिय आलेखाची प्रत देऊन पूर्ण केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मोजणीची नक्कल प्राप्त झाल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय नसलेली माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या विनंतीप्रमाणे पुरविल्याचे दिसून येत आहे तसेच अपिलार्थीने जन माहिती

-                                                  -

अधिकारी यांनी दिलेल्या त्यांच्या दि. २४.३.२००९ रोजीच्या पत्रावर त्यांना माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे त्यांचे अभिप्राय नोंदविले आहेत आणि जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत, ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबूराव माधवराव कडलग, मु.पो.जवळे कडलग, ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११२
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

१ श्री. प्रकाश धर्मराज गुळवे, : अपिलार्थी
मु.पो.नान्नज, ता. जामखेडा, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,भूम,
जि.उस्मानाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,भूम,
जि.उस्मानाबाद.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत निपाणी ता. भूम,
जि.उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १०.०७.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०७.२००८ रोजी नोंद झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जासंदर्भात काय कार्यवाही केली याची त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता,

- -

त्यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनीही या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९७७ ते दि.२८.१.२००८ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. या अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ११.१०.२००६ रोजीचा अर्ज, दि. ४.१२.२००६ रोजीचे अपील आणि दि. २७.७.२००७ व ३१.७.२००७ चा अर्ज यावर झालेल्या कार्यवाहीबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती, तसेच याच माहिती बरोबर अपिलार्थीने मौ. निपाणी ता. भूम येथील स.नं. १४४ मध्ये आज रोजी असलेल्या झाडांची संख्या, नैसर्गिकरित्या उगवलेली झाडे तसेच पूर्वजांची श्रध्दास्थाने,स्मारके,समाधीस्थळे यांची संख्या, ही माहिती देखील मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने सदर अर्ज गट विकास अधिकारी यांना उद्देशून केला होता. तथापि या प्रकरणी संबंधित ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, निपाणी हे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले असल्याने गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज दि. ८.२.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे संबंधित ग्राम विकास अधिकाऱ्याकडे पाठविला व अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ७.३.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर एकूण ३ वेळा सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने या अपिलावर सुनावणी होऊ शकली नसावी, असे उपलब्ध कागदपत्रांवरुन

अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांनी दि. २२.०४.२००८ रोजी शेवटचे पत्र देऊन त्यांच्या अपिलावरील सुनावणीस उपस्थित राहण्याचे अपिलार्थीस कळविले. मात्र या पत्रामध्ये प्रस्तावित सुनावणीची तारीख, वेळ व ठिकाण याचा कोणताही उल्लेख नाही. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. शहाजी भीमराम हुंडे यांना या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती नाही. त्यांनी फक्त अपिलार्थी हे त्यांच्याकडे अपिलाच्या सुनावणीसाठी उपस्थित न राहिल्याने त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाली नसल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयाने दि.२३.०३.२००९ रोजी दूरध्वनीद्वारे सूचित करुनही ते आज सुनावणीस गैरहजर आहेत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती पुरविली नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या वेगवेगळया अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली आणि इतर काही माहिती अपिलार्थीने विचाराधीन अपिलाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. मागणी केलेल्या माहितीचे व्याप्ती व स्वरुप हे सकृतदर्शनी सरळ व मर्यादित दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने, ही माहिती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना आता विनामूल्य द्यावी लागणार आहे, सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

- -

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३१-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रकाश धर्मराज गुळवे,मु.पो.नान्नज, ता.जामखेड जि.अहमदनगर-४१३२०५

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत निपाणी ता. भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

-                                             -

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११३
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

१ सौ. सुलोचना लक्ष्मण कोल्हे, : अपिलार्थी
मु.पो. ता. कोपरगाव,जि. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम ) विभाग,
अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जागतिक बँक प्रकल्पविभाग,
अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग कोपरगाव,
जि. अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०३.२००८ रोजी नोंद झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांच्या प्रथम अपिलावरील दि. १६.१.२००८ रोजीच्या निर्णयाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिली नाही, असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- "उपअभियंता यांनी माहितीसाठी स्वीकारलेले रु. ११५०/- घेऊन तीस दिवसांत माहिती दिली नाही म्हणून विनामूल्य माहिती द्यावयास पाहिजे,हे खरे का ? मग मला माझे पैसे परत करणार काय ? उपअभियंता खोटी माहिती देतात, हे खरे आहे का ?, कोपरगाव येथील उपअभियंता हे कार्यालयात नियमितपणे नसतात, हे खरे आहे का ? त्यांच्या मासिक, दैनंदिनीच्या तीन महिन्याच्या झेरॉक्स पाहिजे, नसल्यास का दिल्या नाही ? उपअभियंता अधिकाराचा दुरुपयोग करतात व त्याची चौकशी करणार का ?, उपअभियंता कार्यालयात नसतात, म्हणजेच वेळेचा भ्रष्टाचार करतात याची चौकशी होईल का ? पुरावा पाहिजे असल्यास तशा सूचना कराव्या. आपले उपअभियंता यांच्या वरील मुद्यावरील चौकशी करणार का ?, आपले उपअभियंता यांच्या अधिपत्त्याखाली कोणती कामे आहेत व त्यावर त्यांची काय Role आहे. त्यांनी त्यांच्या Duties योग्यरित्या पार पाडल्या आहेत काय, नसल्यास काय कारवाई करणार?, आपले उपअभियंता अहमदनगर येथे व नाशिक येथे जास्तीत जास्त तीन दिवस मिटींग असताना बाकी उपअभियंते कोठे असतात, याची सी.आय.डी.मार्फत चौकशी होईल का नाही"- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ४.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३५/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने दि. १४.१.२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन महिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १५.१.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली, तथापि ही माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. २४.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.१.२००८ रोजी घेतली. सदर सुनावणीस अपिलार्थी या गैरहजर होत्या. या सुनावणीमध्ये अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ हेतूच

- -

सफल झाल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.१.२००८ रोजी आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दि. १६.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना दि. १५.१.२००८ रोजी सशुल्क पुरविली असून अपिलार्थीस त्यांनी एकूण दोन पृष्ठांची माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.११.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण ८ मुद्यांपैकी अपिलार्थीस मुद्दा क्र. ७ अंशतः वगळता, उर्वरित कोणत्याही मुद्यावरील माहिती देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णयाबाबतची, कृतीबाबतची कारणे व खुलासे अपेक्षिले आहेत. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नसल्याने अपिलार्थीने मागणी केलेली कथित "माहिती" ही, माहिती अधिकार अधिनियमातील "माहिती"चा विषय होऊ शकत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूलतः (मुद्दा क्र. ७ अंशतः वगळता) विसंगत स्वरुपाची माहिती मागितली असल्याने ही माहिती त्यांना देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमानुसार, कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबतची कारणे, खुलासे मागणे व जन माहिती अधिकारी यांनी ते अपिलार्थीस पुरविणे, अशाप्रकारची प्रक्रिया यामध्ये मूळातच अभिप्रेत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपअभियंता यांचे कर्तव्य आणि त्यांच्याकडील कामाची यादी

- -

मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सर्वसाधारणपणे उत्तराच्या स्वरुपात माहिती पुरविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये माहिती देण्याच्या प्रक्रियेमध्ये अपिलार्थीच्या प्रश्नांना उत्तर देणे व त्याद्वारे अपिलार्थीस माहिती पुरविणे, अशीही प्रक्रिया अभिप्रेत नाही. त्यामुळे या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना सार्वजनिक बांधकाम नियमावलीमध्ये उपअभियंता यांची 'जबाबदारी व कर्तव्य' या मुद्यावरील माहितीची प्रत अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती अपिलार्थीस देय होत नसल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ (अंशतः) द्वारे मागणी केलेली माहिती त्यांना वर नमूद केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती असद्‌हेतुने देण्याचे नाकारले अथवा माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचे आदेश नाहीत.

प्रसंगावशात, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही भविष्यातील व अविवेकी स्वरुपाची आहे. अपिलार्थीस देखील या मुद्यावर आयोगातर्फे अशी ताकीद देण्यात येत आहे की, त्यांनी यापुढे माहिती अधिकारांतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना थोडा विवेक बाळगावा.

अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना निर्णयाची प्रत प्राप्त झाली नसल्याचे म्हटले आहे, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास त्यांच्या दि.१६.१.२००८ रोजीच्या निर्णयाची प्रत अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे दि. १७.१.२००८ रोजी अपिलार्थीस पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे, यावरुन अपिलार्थीने आयोगाकडे अपील अर्ज करताना जन अपिलीय अधिकाऱ्यांनी त्याच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला नाही अशी चुकीची माहिती सादर केल्याचे दिसून येत आहे.

- -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ (अंशतः) च्या संदर्भातील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३१-०३-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुलोचना लक्ष्मण कोल्हे, मु.पो.कोपरगाव,इंदिरापथ, ता.कोपरगाव,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग कोपरगाव, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११४
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अभिजीत सी. पुप्पाल,<br>रा.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सह आयुक्त,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>नाशिक | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>नाशिक | | |

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : | संशोधन अधिकारी,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक |
| जन अपिलीय अधिकारी : | उपसंचालक,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २६.०७.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०७.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

- -

या अपील अर्जान्वये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने, त्यांच्यावर शास्तीची कारवाई करण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली आहे व तसेच आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोलाम व मन्नेरवारलु या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र उमेदवारांची नावे, पत्ता व अर्जाच्या दिनांकाची यादी, अर्ज मंजूरीचा दिनांक, अर्ज वैध अथवा अवैध ठरले,याबाबतची सविस्तर माहिती, तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून कोलाम व मन्नेरवारलु या अनुसूचित जमाती प्रमाणपत्राची तपासणीसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे अथवा रेडी-रेकनर उपलब्ध करुन दिले असल्यास त्याची प्रत व समितीतील अधिकाऱ्यांची नावे, वय, शैक्षणिक पात्रता, पदनाम व कालावधी इत्यादीबाबतची दि. १.१.१९८८ ते २८.४.२००८ पर्यंतची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती - त्यांचे कार्यालय जातनिहाय किंवा एखाद्या विशिष्ट प्रवर्गनिहाय ठेवत नसल्याने अपिलार्थीस पुरविता येणे शक्य नसल्याचे - त्यांना कळविले व त्याचबरोबर अपिलार्थीस काही विशिष्ट उमेदवारांची माहिती हवी असल्यास त्यांची नावे, पत्ते, इत्यादी तपशील कळविल्यास संबंधित उमेदवारांची संमती घेऊन अपिलार्थीस कागदपत्रे देण्याची तयारी देखील दर्शविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

-                                   -

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे आयोगास लेखी स्वरुपात युक्तिवाद सादर करण्यात आला. त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही विशिष्ट कागदपत्रांच्या स्वरुपात त्यांच्याकडे नाही.तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे जातनिहाय माहिती ठेवली जात नाही. मात्र अपिलार्थीस काही विशिष्ट उमेदवारांची माहिती हवी असल्यास ती पुरविण्याची जन माहिती अधिकारी यांनी तयारी देखील दर्शविली आहे. या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांचे जात प्रमाणपत्र त्यांच्या समितीकडून अवैध ठरविण्यात आले, त्यामुळे त्यांनी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र. ६९८१/०८ व ७६१७/०८ दाखल केल्या आहेत. यासंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे दि. २४.१.२००८ ते दि. ३.२.२००९ या कालावधीमध्ये माहिती अधिकार तरतुदीखाली एकूण ११ अर्ज केले असून, या अर्जास त्यांनी समर्पक उत्तरे दिली आहेत. अपिलार्थी हे समितीतील अधिकाऱ्यांची वैयक्तिक माहिती मागवित असल्याने संबंधित अधिकाऱ्यांना मानसिक त्रास होतो व ही बाब त्यांनी मा.उच्च न्यायालय,औरंगाबाद येथील विशेष समुपदेशी यांच्या दि. २३.१.२००९ रोजीच्या त्यांच्याकडील पत्राद्वारे मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणले आहे. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रकरणाशी संबंधित सर्व नस्ती पहाणीसाठी उपलब्ध करुन दिली असून या नस्तीमध्ये ज्या कागदपत्रांची अपिलार्थी यांना आवश्यकता होती त्यांच्या प्रती देखील त्यांनी अपिलार्थीस दिल्या आहेत. त्यांच्या या युक्तिवादासोबत त्यांनी अपिलार्थीचे दि. १२.३.२००९ रोजीचे प्रती प्राप्त झाल्याचे निवदेन सादर केले आहे. या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील कार्यभाराची कल्पना देण्यासाठी असे नमूद केले आहे की, त्यांच्या जात पडताळणी कार्यालयात दरवर्षी साधारणतः ८ ते १० हजार प्रकरणे प्राप्त होत असतात व त्याचप्रमाणात ती निकाली काढले जातात. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही २० वर्षांच्या कालावधीची असल्याने दीड ते दोन लाख प्रकरणातून एका विशिष्ट जमातीच्या उमेदवाराची माहिती काढणे या कामासाठी त्यांना आपल्या कार्यालयाची

-                                   -

साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागेल व तसेच २००१ मध्ये औरंगाबाद समिती व २००७ मध्ये नंदूरबार समितीची निर्मिती झाली असल्याने व आता मराठवाडा विभागातील व धुळे, नंदूरबार व जळगाव या जिल्हयातील प्रकरणे अनुक्रमे औरंगाबाद व नंदूरबार यांच्याकडे पुरविण्यात आली आहेत. या सर्व कारणांमुळे व विशेषत: अपिलार्थीने मागणी केलेली माहिती २० वर्षांची असल्याने ती काढणे खूपच जिकीरीचे व अवघड असल्याने, ती अपिलार्थीस त्यांना देणे शक्य नाही, असे त्यांनी दि. १५.७.२००८ रोजी अपिलार्थीस कळविले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या या लेखी युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी व त्यांच्या अपील अर्जातील मुद्यांचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे त्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस ज्या स्वरुपात माहिती अपेक्षित आहे, त्या स्वरुपात मूळात ठेवली जात नसल्याने अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना ती देय होणार नाही. मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडील त्यांच्या मुद्यांशी संबंधित अभिलेख्यांची तपासणी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार करता येणे शक्य आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, ही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती प्रमाणेच असल्याचे दिसून येते. त्यामुळे या टप्प्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून एखाद्या विशिष्ट जमातीच्या उमेदवाराची माहिती हवी असल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे विशिष्ट संदर्भ देऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्यास त्यावर वेगळयाने कार्यवाही करता येणे शक्य आहे. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २८.४.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.७.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती

पाहता जन माहिती अधिकारी यांनी या पत्राद्वारे पुरविलेली माहिती आयोगास सर्वसाधारणपणे सुसंगत वाटते. या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे हेतुतः नाकारले अथवा दुष्ट बुध्दीने ही माहिती नष्ट केल्याचे किंवा माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे याप्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची केलेली विनंती आयोग फेटाळून लावत आहे. मात्र अपिलार्थीस दि. २८.४.२००८ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.५.२००८ रोजी अगर तत्पूर्वी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित असलेला प्रतिसाद न दिल्याबद्दल त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीनुसार कार्यवाही करावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अभिजित सी. पुप्पाल,बिल्डींग नं.७,विवेकानंद हाऊसिंग सोसायटी, पाईपलाईन रोड,सावेडी,अहमदनगर-४१४ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११५
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संजय गंगाधर फुलमाळी,<br>मु.पो.सोनई, ता.नेवासा,<br>जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपनिबंधक सहकारी संस्था, नगर तालुका,<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,<br>अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १०.०९.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयामार्फत औरंगाबाद खंडपीठाच्या कार्यालयात दि.१३.०३.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेताना त्यांनी विनंती करुनही त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न देता त्यांचे प्रथम अपील नामंजूर केले, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे,महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ च्या नियम ८५(३) नुसार अपिलार्थीच्या प्राप्त झालेल्या नोटीसच्या अनुषंगाने एकूण सहा मुद्यांद्वारे सन २००६-२००७ या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१२/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने दि. २८.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरद्वारे रु.१२/- पाठविले. सदर मनीऑर्डर प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ८.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे अपिलार्थीस माहिती पुरविली. या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती समाविष्ट नव्हती. तसेच अपिलार्थीस त्यांनी भरावयाच्या शुल्काबाबत कोणताही खुलासा जन माहिती अधिकारी यांनी केला नसल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.६.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचे सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २२.०६.२००७ रोजीच्या आदेशाद्वारे फेटाळून लावले. अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी हे या अपील सुनावणीसंदर्भात संधी देऊनही गैरहजर राहिल्याने ते अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आले असल्याचे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीकडून त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या

- -

माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रु.१२/- इतके त्यांना दि. २८.५.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दि. ०८.६.२००७ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे माहिती पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. ही माहिती सहायक निबंधक सहकारी संस्था, नेवासा यांच्याकडे उपलब्ध होती. त्यामुळे ती माहिती त्यांना अपिलार्थीस पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या ६ मुद्यांवरील माहितीपैकी २ मुद्यांवरील माहिती (मुद्दा क्र. ३ व ४) त्यांना प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः माहितीसाठीचा अर्ज केला आहे, त्यांच्याकडे त्यावेळी ती उपलब्ध नव्हती, व त्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. कोणत्याही अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेल्या माहितीपैकी जर सदर माहिती किंवा या माहितीचा काही भाग जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर, कशाप्रकारे कार्यवाही करावी,याचे सुस्पष्ट विवेचन माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(एक) मध्ये केले आहे. त्यामुळे याप्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत अथवा त्यातील संबंधित भाग सहायक निबंधक, सहकारी संस्था, नेवासा जि.अहमदनगर यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत पाठवून, त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे त्यांना या प्रकरणी भाग होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही.

आज रोजी आयोगासमोर उपस्थित असलेल्या जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती सहायक निबंधक, सहकारी संस्था, नेवासा यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा

-                                                    -

क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस दि. ८.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या प्रतिसादाचे अवलोकन केले असता या पत्राद्वारे, अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती मागितली असताना देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात येऊन नियमानुसार फी भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे निश्चित शुल्क किती व ते त्यांनी कोणत्या शीर्षाखाली, कोठे भरावयाचे याचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(३)(क) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना या शुल्काच्या माहितीचा संपूर्ण तपशील कळविणे भाग आहे. मात्र अशाप्रकारची कृती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ८.५.२००७ रोजीच्या पत्रामध्ये केली नसल्याचे दिसून येते. थोडक्यात या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ६(३)(एक) व कलम ७(३)(क) चा भंग झाल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या चुकीच्या प्रतिसादामुळे अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त होण्यास पात्र ठरत आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना पुरविण्यात आलेल्या माहितीपोटीचे प्राप्त करुन घेतलेले शुल्क रु.१२/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत परत करावे.

प्रसंगावशात, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, केवळ अपिलार्थी हे सुनावणीसाठी गैरहजर राहिले म्हणून जन अपिलीय अधिकारी अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आले, ही त्यांची कृती चुकीची असून त्यांनी इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे दाखल होणाऱ्या अपील अर्जावर निर्णय घेताना अपिलार्थी हे

- -

त्यांच्याकडील सुनावणीस जरी गैरहजर राहिले तरी त्यांच्या अपील अर्जातील लेखी म्हणण्याची नोंद घेऊन, त्यावर आपले निर्णय घ्यावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ द्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व जन माहिती अधिकारी यांनी याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून या प्रकरणी स्विकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु.१२/- इतके अपिलार्थीस परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय गंगाधर फुलमाळी, मु.पो.सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,नगर तालुका,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५८
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विश्वंभर नामदेव गायकवाड,<br>ता. सिल्लोड, जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सिल्लोड,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, औरंगाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची द्वितीय सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०८.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी श्री. कोल्हे शाखा अभियंता यांच्या कालावधीत झालेल्या पूर्ण व अपूर्ण रस्त्याची आणि पूलाची तपशीलवार व संपूर्ण माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

- -

अधिकारी यांच्याकडे, "शाखा अभियंता श्री. एस.एस.कोल्हे यांच्या अखत्यारीतील संपूर्ण रस्ते व पूल यांची चालू कामे, पूर्ण झालेली कामे, याची संपूर्ण माहिती"- ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती व्यक्तिशः मागितली होती. मागितलेल्या माहितीचा कालावधी जानेवारी, २००६ ते जानेवारी, २००८ अशी होती.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे दि. ३०.३.२००९ रोजीचे त्यांना उद्देशून लिहिलेले एक पत्र आयोगास सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना अपील क्र. १५८/२००८ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही आणि ते आपली तक्रार मागे घेत आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात त्यांच्या दि. ६.५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अत्यंत मोघम स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, त्यामुळे याप्रकरणी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दि. ३०.३.२००९ रोजीच्या पत्रामध्ये कबूल केले आहे व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे या पत्रामध्ये म्हटले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपिलावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. . विश्वंभर नामदेव गायकवाड,ता. सिल्लोड, जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सिल्लोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९८
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संजय दामोधर धर्मरक्षक,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (प्रभाग 'ई' व 'फ')<br>पाणीपुरवठा दुरुस्ती विभाग,महानगरपालिका<br>औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>शहर अभियंता,<br>महानगरपालिका,औरंगाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०१.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे नाकारले असल्याने केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे महानगरपालिका क्षेत्रातील २००४-२००७ या कालावधीमधील बोअर-वेलसंदर्भात

- -

एकूण तीन मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "बोर पाडण्यात आलेल्या वॉर्डाचे नाव, किती फुट पाडण्यात आले त्याबाबतची माहिती, बोर पाडण्याचा ठेका देण्यात आलेल्या एजन्सीचे नाव व परवान्याची झेरॉक्स प्रत, ठेका मिळविण्यासाठी संबंधित एजन्सीने सादर केलेल्या दरपत्रक व त्यासोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची झेरॉक्स प्रत" - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती व तसेच या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी महानगरपालिकेची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचे सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.१०.२००७ रोजीच्या आदेशाद्वारे फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, महानगरपालिकेची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याने, पुरवता येत नाही, तथापि एखाद्या कामाची माहिती हवी असल्यास कार्यालयीन वेळेत अपिलार्थीस दाखविण्यात येईल, या त्यांच्या भूमिकेची युक्तिवादामध्ये पुनरावृत्ती केली व त्याचबरोबर आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जरी ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख केला असला तरी प्रत्यक्षात अशाप्रकारचा कोणताही वैध पुरावा अपिलार्थीने त्यांच्याकडे अर्ज करताना सादर केलेला नाही.

- -

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तीवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांची भूमिका,-अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी महानगरपालिकेची साधनसामग्री त्यांना प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती,त्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरविता येत नाही,-आयोगास मान्य नाही, कारण महानगरपालिका क्षेत्रामध्ये गेली अनेक वर्षे नियमितपणे अशाप्रकारची बोअरची कामे करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, वर्षाकाठी सर्वसाधारणपणे संपूर्ण १२ लाख रुपयांची अंदाजे ५० बोअरची कामे होत असतात. कामाची किंमत व बोअरची संख्या यावरुन जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस माहिती नाकारण्यासाठीचे दिलेले कारण किती फोल आहे याची कल्पना येते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत करुन दिलेल्या माहितीपैकी उर्वरित मुद्दा म्हणजे अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाबरोबर ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही पुरावा त्यांच्या अर्जासोबत जोडलेला नाही, हा युक्तीवाद मात्र आयोग मान्य करीत असून अपिलार्थीस असे अवगत करुन देण्यात येत आहे की, **माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना जर संबंधित अर्जदार हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असतील तर त्यांना या बाबतचा वैध पुरावा माहितीसाठीच्या अर्जाबरोबर जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करणे अनिवार्य आहे.** त्यामुळे त्यांना आता जर जन माहिती अधिकारी यांच्याकडून हीच माहिती हवी असेल तर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतच्या वैध पुराव्यासह नव्याने अर्ज करावा, म्हणजे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती प्राप्त होऊ शकेल, अन्यथा ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल.

-                    -

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर व विशेषतः अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना केलेल्या अर्जाबरोबर ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही वैध पुरावा त्यांनी सादर केला नसल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय दामोधर धर्मरक्षक, संपादक, सा.आमने-सामने, अंजली निवास,पडेगाव,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रभाग 'ई' व 'फ') पाणीपुरवठा दुरुस्ती विभाग,महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता,महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९९
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

१ श्री. पठाण आरेफ खॉ आय्युब खॉ, : अपिलार्थी
रा.भराडी, ता.सिल्लोड,
जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
आगार प्रमुख,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,सिल्लोड,
जि.औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती प्रमाणित करुन दिली नाही व त्यांच्याकडून जास्तीची फी आकारल्यामुळे केल्याचे नमूद केले आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२४.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे-मौजे भराडी बसस्थानक ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद येथील ठेकेदार व अतिक्रमणासंदर्भात सन २००७ ते दि. २४.६.२००८ या कालावधीची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - भराडी येथे जाऊन अतिक्रमणासंबंधी केलेल्या पंचनाम्याची संख्या व छायांकित प्रत व अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीस व संबंधित कार्यालयास दिलेल्या पत्राची छायांकित प्रत- या मुद्यांचा समावेश होता. तथापि अपिलार्थीने याबाबत त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी प्रमाणित करुन दिली नाही व प्रतिपृष्ठ रु.२/- शुल्काऐवजी प्रतिपृष्ठ रु.१०/- एवढी फीस आकारली त्यामुळे अधिनियमातील कलम १९(१) अनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस ते दि.६.९.२००८ रोजीच्या सुनावणीस हजर न राहिल्यामुळे अपील प्रकरण निकाली काढता आले नाही, असे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्राने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी अशाचप्रकारचा युक्तिवाद आयोगासमोर केला व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील चालविले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली आठ पृष्ठांची माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २४.६.२००८ रोजी म्हणजेच अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केला त्या दिवशीच दिली असून त्यांनी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या दि. ६.१०.२००६ रोजीच्या पत्राचा आधार माहितीपोटीचे शुल्क आकारण्यासाठी घेतला आहे. अपिलार्थीस प्रमाणित स्वरुपात माहिती न देण्याचे कारण,जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यानी

-   -

अपिलार्थीस "आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन" या सदरासमोर अपिलार्थीने तसा उल्लेख केला नसल्याने त्यांनी अपिलार्थीस प्रमाणित माहिती पुरविली नसल्याचे आयोगास सांगितले. या प्रकरणातील संपूर्ण घटनाक्रम व जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्या ज्या पत्राच्या आधारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देताना प्रतिपृष्ठ रु.१०/- इतके शुल्क आकारले आहे त्या पत्राचे अवलोकन करता जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे दि. ६.१०.२००६ रोजीचे पत्र हे जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडून त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभागप्रमुख, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, जि. औरंगाबाद यांना उद्देशून लिहिलेले असल्याचे दिसून येते. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या या पत्राचा विचाराधीन अपील प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचा अर्थाअर्थी कोणताही संबंध पोहोचत नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देताना प्रतिपृष्ठ रु.२/- इतकाच दर आकारावयास हवा होता. त्याचबरोबर अपिलार्थीच्या दि. २४.६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने माहितीसाठीचा विषय या मुद्यासमोर त्यांना प्रमाणित नक्कल हवी असल्याचा स्पष्ट उल्लेख केला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्रमाणित स्वरुपाची माहिती देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणाशी संबंधित त्रूटीस केवळ जन माहिती अधिकारी हेच स्वत: जबाबदार असल्याचे दिसून येते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीपोटी प्रतिपृष्ठ रु.२/- या दराने आकारणी करावी व उर्वरित शुल्क अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे व याचबरोबर अपिलार्थीस त्यांच्यातर्फे या प्रकरणासंदर्भात पूर्वी पुरविण्यात आलेली सर्व माहिती त्यांना विनामूल्य प्रमाणित करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

-　　-

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून प्रतिपृष्ठ रु.१०/- इतक्या दराने स्वीकारलेल्या एकूण शुल्कामधून,अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रु.२/- या दराने शुल्क आकारणी करुन उर्वरित शुल्क अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या अपिलासंदर्भात पुरविण्यात आलेली सर्व माहिती याच कालावधीमध्ये प्रमाणित करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पठाण आरेफ खॉ आय्युब खॉ मु.पो.भराडी, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४३९
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विलास धुळप्पा काकनाळे,<br>रा.उदगीर, जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सहा. शिक्षण संचालक,<br>उपसंचालक कार्यालय, लातूर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक,<br>लातूर. | | |

**त्रयस्थ पक्ष :-** १) श्री.शेटे
२) श्री.जालनापूरकर

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व संबंधित संस्थेचे सचिव उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २०.९.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे दिनांक १४-०९-२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये त्रयस्थ पक्ष श्री.काकनाळे, श्री.शेटे व श्री. जालनापुरकर यांची शिक्षण सेवक मान्यता व २००२ पासून सेवा ग्राहय धरुन कायम करण्याबाबत संबंधित शिक्षण संस्थेने शिक्षण उपसंचालक यांच्याकडे पाठविलेल्या प्रस्तावातील सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतींची मागणी अपिलार्थीने कायम ठेवली आहे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १३.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीसंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मूळ अर्ज केला होता. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास दि. १७.७.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे त्यांना सूचित केले व त्यांच्या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी हे महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत, असे त्यांना अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर यांच्याकडे माहिती मागितली असता, संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी दि. २५.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली माहिती दिल्यास ग्रिव्हन्स कमिटीच्या औरंगाबाद ब्रँच या न्यायालयाच्या कामकाजात दखल दिल्यासारखे होईल, असे वाटल्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. मात्र न्यायालयाच्या निकालानंतर माहिती पुरविण्यात येईल, असे अपिलार्थीस त्यांनी आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी,उदगीर यांच्याकडे दि. ०८.०८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर संस्थेच्या सचिवांनी दि. १६.८.२००७ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेल्या भूमिकेप्रमाणेच भूमिका घेऊन, आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली नाही. या सर्व प्रकारामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहितीसाठीचा मूळ अर्ज शिक्षण उपसंचालक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला होता, त्यामुळे त्यांना या प्रकरणी ज्या माहितीची आवश्यकता आहे, ती माहिती शिक्षण

-                                                  -

उपसंचालक कार्यालयातूनच त्यांना प्राप्त होणे गरजेचे आहे. कारण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, उदगीर यांनी त्यांना याच विषयावर दिलेली माहिती त्यांच्या मागणीशी विसंगत व अपूर्ण आहे.

आज रोजी सुनावणीस शिक्षण उपसंचालक कार्यालयातील जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित असून त्यांच्याकडे संबंधित शिक्षण संस्थेने सदर कार्यालयातील त्रयस्थ पक्षाच्या मान्यतेचे प्रस्ताव मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत असे दिसून येते. ही नस्ती अपिलार्थीने अवलोकन केली असून अपिलार्थीस संबंधित शिक्षण संस्थेने यातील काही माहिती पुरविली नसल्याचे सिध्द झाले आहे. शिक्षण उपसंचालक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती आता तीन दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे, हे पाहता, आता अपिलार्थीस विचाराधीन अपील प्रकरणी संपूर्ण माहिती प्राप्त होत असल्याचे दिसून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

- -

प्रत,

१. श्री. विलास धुळप्पा काकनाळे, द्वारा ढगे निवास,शिवनगर,बिदर रोड,उदगीर जि,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहा. शिक्षण संचालक,उपसंचालक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५९४
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. डी. जे. पाटील,<br>रा.देवपूर जि.धुळे. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>मोलगी, ता.अक्कलकुवा,जि. नंदुरबार | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,शहादा,<br>जि. नंदूरबार. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १५.०५.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.०५.२००७ रोजी नोंद झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीसाठीचा अर्ज करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, माहिती पुरविली नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०३.२००७ रोजी निर्णय देऊनही अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील करेपर्यंत त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्याने त्यांनी हे विचाराधीन अपील सादर केले असल्याचे म्हटले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी या

- -

अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे. याचबरोबर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावण्याची व शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे आदेशित करण्याची अपिलाच्या अखेरीस आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.११.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००७ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयातर्फे करण्यात आलेल्या चार रस्ते विकास कामांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये रस्त्यांची नावे नमूद करुन संबंधित रस्त्याच्या अंदाजपत्रकाच्या प्रती, सुरु असलेल्या रस्ते विकास कामांची यादी, अंदाजपत्रकीय मंजूर रक्कम, काम सुरु झाल्याचा व पूर्ण झाल्याचा दिनांक अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार संबंधित शिक्षण संस्थेच्या सचिवांकडे दि. १९.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०३.२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. १४.३.२००७ पूर्वी विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले व त्याचबरोबर ही माहिती अपिलार्थीस दि. १४.३.२००७ पूर्वी न दिल्यास पुढील कार्यवाहीसाठी माहिती अधिकारी हे जबाबदार राहतील, असे त्यांनी आदेशामध्ये निर्देशित केले. तथापि ही मुदत व्यपगत होऊनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे श्री. आर.जे. ठाकरे, कनिष्ठ लिपीक हे हजर आहे. त्यांनी कार्यकारी अभियंता यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि २६.३.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये कार्यकारी अभियंता यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीस जन माहिती

-   -

अधिकारी यांनी दि. १९.५.२००७ रोजी आवश्यक ती माहिती दिली असून, ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे व त्यावरुन अपिलार्थीचे समाधान झाल्याचे अपिलार्थीचे पत्र कार्यकारी अभियंता यांच्या या पत्रासोबत जोडले आहे. अपिलार्थीचे दि. १९.५.२००७ रोजीचे पत्र उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग मोलगी, श्री. पी.व्ही. मोराणकर यांनी सत्यप्रत, साक्षांकित केले आहे. यावरुन अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या मूळ अर्जातील माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते.

अपिलार्थीस जरी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याचे व त्याने जरी अपिलार्थीचे समाधान झाले असले तरी अपिलार्थीने त्यांच्या दि. २१.११.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जी त्यांना दि. २०.१२.२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत आहे, ती त्यांना दि. १९.५.२००७ रोजी म्हणजेच अंदाजे पावणेपाच महिने इतक्या विलंबाने प्राप्त झाली आहे, ही बाब येथे दुर्लक्षित करुन चालणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, या माहितीचे स्वरुप सोपे व व्याप्ती अत्यंत मर्यादित अशी होती. ही माहिती अपिलार्थीस देण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती, अशातील बाब येथे कोणत्याही प्रकारे संभवत असल्याचे आयोगास आढळून येत नाही. याही उपर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही, अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेशित करुनही, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही, ही बाब येथे विशेष प्रकर्षाने जाणवत आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यातील प्रचलित कार्यपध्दती पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहज उपलब्ध असणे आवश्यक आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याच्या या प्रकरणातील जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेबद्दल त्यांच्या आयोगाकडील आज रोजीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही किंबहुना अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्यासाठी पावणे पाच महिन्याच्या, जन

- -

माहिती अधिकारी यांनी लावलेल्या विलंबाचे कोणतेही समर्थन मूळात अस्तित्त्वात असूच शकत नाही, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याच्या त्यांच्या या कृतीमुळे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निश्चितपणे पात्र ठरविले आहे. सबब सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एस.बी.चंदेल यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एस.बी.चंदेल यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. डी. जे. पाटील, संपादक, साप्ता. 'लोकसमर'९४, फॉरेस्ट कॉलनी,, नगाव हिल, देवपूर,जि.धुळे - ४२४ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,मोलगी, जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,शहादा,जि. नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

- -

कार्यवाहीसाठी.

४. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५९५
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

१ श्री. जुलाल बळीराम वाघ, : अपिलार्थी
धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
महानगरपालिका, धुळे.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक आयुक्त,
महानगरपालिका, धुळे.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रकल्प अधिकारी,
धुळे महानगरपालिका, धुळे.
जन अपिलीय अधिकारी : सहायक आयुक्त,
धुळे महानगरपालिका, धुळे.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १०.७.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.७.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीतर्फे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे दि. ३०.३.२००९ रोजीचे प्रतिज्ञापत्र आयोगास सादर केले असून सदर पत्र आयोगाच्या कार्यालयास दि. ३०.३.२००९ रोजी फॅक्सद्वारे देखील प्राप्त झाला आहे, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना धुळे, महानगरपालिकेकडे मागणी केलेले काम सुरु झालेले असल्यसाने विचाराधीन अपील

चालविण्यामध्ये त्यांना स्वारस्य नाही व ते स्वेच्छेने विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे, नमूद केले आहे.

अशाप्रकारे खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे विचाराधीन अपील मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. २५९५/०७, दि.१७.०७.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जुलाल बळीराम वाघ, राऊळवाडी, चित्तोड रस्ता, धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,धुळे महानगरपालिका, धुळे. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,धुळे महानगरपालिका, धुळे. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५९६
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

१ श्री. शफीक अहमद मोहंमद शफी, : अपिलार्थी
मालेगाव जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापिका,
मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल,
मालेगाव, जि.नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल,
मालेगाव, जि.नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०३.९.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या या प्रकरणी देण्यात आलेल्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त झाला नसल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) व ७(२) चे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची व

अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये अंतिमतः विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल, मालेगाव येथे शासनाच्या आदेशान्वये व मा.मुंबई उच्च न्यायालय यांचे निर्देशानुसार शाळेमध्ये स्थापन केलेल्या पालक-शिक्षक संघाची २००१-२००२ व २००६-०७ या शैक्षणिक वर्षाशी संबंधित एकूण ८ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल,मालेगाव, जि.नाशिक यांच्याकडे दि. २०.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याचे अपिलार्थीने म्हटले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी निवेदन हाच त्यांचा युक्तिवाद असल्याचे गृहित धरुन सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी तयार नव्हती. अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ही माहिती तयार केली असून आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेल्या आठही मुद्यावरील माहिती त्यांनी सोबत आणली आहे. त्यांच्या या विधानाच्या पृष्ठयर्थ

-                -

त्यांच्याबरोबर आणलेली माहिती आयोगास दाखविली. तथापि सदर माहिती पूर्णपणे ऊर्दूमध्ये असल्याने अपिलार्थीच्या अर्जातील माहितीशी सुसंगत आहे किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही.

अपिलार्थीस विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न देण्याचे किंवा त्यांना कोणतीही माहिती न पुरविण्याच्या कृतीबद्दल, उपस्थित जन माहिती अधिकारी या त्यांना आयोगाने पुरेपूर संधी देऊनही, योग्य तो खुलासा आयोगासमोर करु शकल्या नाहीत.

जन अपिलीय अधिकारी तथा संबंधित संस्थेचे अध्यक्ष यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचे दि. २०.७.२००७ रोजीचे अपील त्यांना दि. २५.७.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासा मागितला असता, जन माहिती अधिकारी यांनी कोणताही खुलासा सादर न केल्याने त्यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्यात आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती मूलतः माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत आहे. त्यामुळे त्यातील 'खुलासा'हा भाग वगळता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णतः देय होत आहे.

आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील शेवटचा मुद्दा वगळता उर्वरित सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांनी ऊर्दूमध्ये तयार करुन ठेवली आहे व ती मराठी भाषेमध्ये रुपांतरित करुन अपिलार्थीस देण्यास त्या तयार आहेत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यातील "खुलासा" हा भाग वगळता त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

-                                                                                                    -

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना, आयोगाने पुरेपूर संधी देऊनही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाचे कोणतेही समर्थन त्या करु शकल्या नाहीत. त्यांच्या अपिलार्थीस माहिती न देण्याच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीच्या रकमेचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त दहा हप्त्यात पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारामध्ये करावा.

**" ००७० इतर प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१ "**

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यातील 'खुलासा'हा भाग वगळता त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना एकूण रुपये २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शफीक अहमद मोहंमद शफी,घ.नं.७७२,रसुलपुरा, रविवार वॉर्ड, मालेगाव, जि.नाशिक-४२३ २०३.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल,मालेगाव, जि.नाशिक. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (आर.पी.ए.डी.द्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष,मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल,मालेगाव, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपकोषागार अधिकारी, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

- -

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५९७
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख मुस्तफा शेख चाँद,<br>मालेगाव जि.नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका,<br>मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल,<br>मालेगाव, जि.नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष,<br>मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल,<br>मालेगाव, जि.नाशिक. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०३.०९.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन महिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही, त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करुन त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देण्याचे आदेशित करावे.

- -

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल, मालेगाव या शाळेशी संबंधित शैक्षणिक वर्ष १९९९-२००० ते दि. २२.६.२००७ च्या कालावधीतील संबंधित शाळा समिती व समितीच्या सभेविषयी एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल,मालेगाव, जि.नाशिक यांच्याकडे दि. २४.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी निवेदन हाच त्यांचा युक्तिवाद असल्याचे गृहित धरुन सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी तयार नव्हती, आता ती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे तयार आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मागितला तथापि त्यांनी तो न दिल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही.

-                                                                                          -

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले होते, परंतु त्यांनीही केवळ जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मागवून, जन माहिती अधिकारी यांनी योग्य तो खुलासा यांच्याकडे सादर न केल्याने, या अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही. अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने अधिनियमातील कलम ७ प्रमाणे ती अपिलार्थीस देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करणे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत आहे.तथापि जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीमध्ये अपेक्षित असलेली कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवल्याची कारणमिमांसा, संबंधित जन माहिती अधिकारी या, आयोगाने त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेपूर संधी देऊन देखील करु शकल्या नाहीत. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअन्वये कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती न पुरवून, त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे याप्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. सबब अध्यक्ष, मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल, मालेगाव, जि. नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न देण्याची त्यांच्या युक्तिवादामध्ये केलेली कारणमिमांसा देखील आयोगास अमान्य आहे, कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अपिलावर सुनावणी घेताना साधारणपणे जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना एकत्रित बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून, ते नोंदवून त्यावर आपले निश्चित स्वरुपाचे

निर्णय देणे हे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अभिप्रेत होते. परंतु त्यांनी देखील अशाप्रकारची कोणतीच कृती न करता ते जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलाशाची वाट पाहत राहिले, ही त्यांची कृती चुकीची आहे. इतःपर अशाप्रकारची पुनरावृत्ती त्यांनी करु नये, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे, त्यांनी ती आयोगास दाखविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेली माहिती ही ऊर्दूमध्ये आहे,त्यामुळे ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही, सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती जर अपिलार्थीच्या अपेक्षेप्रमाणे नसेल तर त्यांनी यासंदर्भात अधिनियमातील कलम १८ प्रमाणे पुढील कार्यवाहीसाठी आयोगाकडे वेगळयाने तक्रार करावी. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना मराठी भाषेमध्ये हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना मराठी भाषेत रुपांतरित करुन हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.
३. अध्यक्ष, मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल, मालेगाव जि.नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार

- -

यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख मुस्तफा शेख चाँद, घ.नं.३२४, मंगलवार वॉर्ड, मुल्लाबाडा, मालेगाव, जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल,मालेगाव, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष,मौलाना आझाद गर्ल्स प्रायमरी स्कूल,मालेगाव, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५९८
निर्णय दिनांक ३१-०३-२००९

१ श्री. नेहाल बाबा मो.हारुन, : अपिलार्थी
रा. मालेगाव,जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
नगररचना विभाग,
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव,
जि.नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
नगररचनाकार,
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव,
जि.नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : इमारत पर्यवेक्षक,
नगररचना विभाग,
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव,
जि.नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०४.०९.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०९.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेल्या दि. २४.३.२००९ रोजीच्या निवेदनाची प्रत आयोगास सादर

केली असून सदर निवेदनामध्ये अपिलार्थीने आयोगास विचाराधीन अपील क्र. २५९८/०७ रद्द करण्याची विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या अपिलार्थीच्या सदर निवेदनातील मुद्यांचे खंडन करण्यासाठी आज सुनावणीस अपिलार्थी उपस्थित नाहीत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. २५९८/०७, दि.०७.९.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नेहाल बाबा मो.हारुन, सर्वे नं.१५९/६६,मुस्लिमनगर,नयापुरा, मालेगाव, जि.नाशिक,४२३ २०३.

२. जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक,नगररचना विभाग,मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नगररचनाकार,मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

- -